**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एकतर प्रश्न विचारले होते त्या अगोदर मी राजू मिसाळ यांनी जी भूमिका याठिकाणी घेतली आहेतर माझी सर्वच सभागृहाला विशेषतः पक्षनेत्याला विनंती आहे, आपण सत्ताधारी पक्षाचे नेते आहात. नामोल्लेखा मागे एक वेगळी भावना असते त्या पाठीमाग. कुठलही उदयान असेल, ब्रीज असेल, सांस्कृतीक भवन असेल, व्यायामशाळा असेल त्या त्या परिस्थितीनुसार त्या त्या कालखंडामध्ये तो तो निर्णय घेतला जातो. आपल्या कालखंडामध्ये अशी कोणती संधी मिळालीतर आपण घ्यावी त्यासाठी कोणाचा विरोध असण्याच कारण नाही. पण कुणाच्यातरी भावनेवर अशा पध्दतीने आपण एकदम निर्णय घेवून काहीतरी धक्कातंत्र वापरुन तसा संदेश आणि विचार आपल्या विरोधात वेगळया पध्दतीने बाहेर जातात. मा.महापौर साहेब, या विषयाच्या संदर्भात समिती असावी, आपल्या अध्यक्षतेखाली एक समिती असावी. एखादया नावाबद्दल जर समजा नाव देवून सुध्दा कालांतराने ते नाव चुकीच आहे असं आपल्या ध्यानात आलतर तो समितीने निर्णय घ्यावा म्हणजे सभागृहामध्ये वाद होणार नाही. काही मंडळीच सामाजीक योगदान, राजकीय योगदान काहीच नसत पण त्यांनी जागा उपलब्ध करुन दिलेली असते मग त्याच नाव दिलतर काय हरकत आहे. मला असं म्हणायच आहे की उदया जशी सत्ता येईल तशी नाव बदलत गेलीतर तो फार चुकीचा एक वादंग शहरात निर्माण होईल. केशवराव घोळवे यांना माझी नंम्र विनंती आहे की, आपण विषय दया पण तुम्ही ज्या भावनेनी दिला असेल त्या भावनेला आमचा विरोध नाही पण ते योग्य आहे का अयोग्य आहे हे समिती मार्फत तुम्ही सिध्द करा, म्हणजे तुम्ही निर्णय घ्या. तुमच्या पध्दतीनुसार तुम्ही निर्णय घेतला असेल त्याला आमचा विरोध नाही. पण जे नाव दिलं आहे त्या नावासंदर्भात कोर्टामध्ये त्याची काही चर्चा चालू आहे का. अशी परिस्थिती येवू नये की एका नावासाठी नाव रद्द झाल म्हणून न्यायप्रविष्ठ ती घटना झाली आणि त्याचे पडसाद संपुर्ण आपल्यावर होऊ शकतात. मा.महापौर साहेब, मी मागच्या सभेमध्ये तुम्हांला प्रश्न विचारले होते त्यावेळेस पहील्यांदा असं झाल की माझा प्रश्न पंचवीस वर्षाखाली आपण घेतला नाही. परंतु आपल्या भावनेला मी धन्यवाद देतो, आपले आभार मानतो की तुम्ही मला संधी देता. मी आपल्याला एक विनंती करतो की प्रश्न खूप झाले तर आपण एक सर्व गटनेत्यांच्या

,

माध्यमातून त्या त्या नगरसेवकांनी त्या त्या पक्षाच्या पध्दतीने ते प्रश्न योग्य आहेत का अयोग्य आहेत. कारण महानगरपालिका म्हणजे अजेंडा आणि उपसूचना म्हणजे महानगरपालिका संपली असं त्याच स्वरुप नसाव. या शहरामध्ये अशा पण आमच्या माध्यमातून आपल्या समोर काही घटना येतात की ते प्रश्नरुपाने येतात त्यातून चर्चा होते आणि सभागृहातील सर्वच नगरसेवकांना शहरामध्ये नेमक काय चाललेल आहे आणि काय असायला हवं, काय बदल करायला हवेत आणि काहीतरी स्टॅटेजी ठरवली जावी. मागील मी आठ महीन्यापुर्वी प्रश्न दिला होता पाणीपुरवठयाच्या संदर्भात आठ ते नऊ हजार नळकनेक्शन्स अनधिकृतपणे सापडलेले आहेत. असे काही प्रश्न असतात म्हणून मी सभागृहाला धन्यवाद देतो, महापौर साहेब, आपल्याला देखील धन्यवाद देतो की मी त्या प्रश्ना संदर्भात याठिकाणी बोलणार आहे. प्रश्न विशेषतः सभागृहाने देखील गांभीर्याने ऐकावेत कारण की हा प्रश्न हेतूपुरस्सर किंवा काहीतरी डोळयासमोर उद्दीष्ठ ठेवून केणतेही प्रश्न मी आजपर्यंत आणलेले नाहीत. परंतु लोकशाहीमध्ये कोणताही राजकीय पक्ष असेल मग यापुर्वी आम्ही असो किंवा आता तुम्ही आहात एक ती पध्दत आहे की निवडणूकीच्या तोंडावर आपण चांगल्या पध्दतीने कोणत्याही प्रश्ना संदर्भात घोषणा करुन लोकांना आकर्षीत करण्याच काम सातत्यान अनेक वर्षापासून चालू आहे ती काही वेगळी प्रथा आहे अशातल मी म्हणत नाही. परंतु याठिकाणी जो प्रश्न परवा दिवशी चाळीस हजार बांधकामे होणार नियमीत या वीस वर्षाच्या राजकारणामध्ये मी पाहतो दोन लोकसभा आणि एक विधानसभा याच मुदयावर निवडणूका लढवल्या गेल्या. त्यातून आंदोलन झाली त्यातून काय परिणाम व्हायचे ते झाले ज्यांना ज्या पध्दतीने फायदा घ्यायचा तो फायदा घेतला परंतु आपण विश्वस्त म्हणून या शहराच्या दृष्टिकोनातून आपल काय भल झाल या नागरीकांच्यासाठी हा देखील फार मोठा महत्वाचा विषय आहे. त्यामुळे मी पक्षीय किंवा राजकीय विषय याठिकाणी घेणार निश्चित नाही पण त्या पाठीमागची जी पार्श्वभूमी आहे आणि ती वास्तवरुपी सत्य असेलतर ती आपण नाकारुनही चालणार नाही. कारण की प्रत्येकवेळेस या शहरात अनधिकृत प्रश्न, शास्तीकर आणि प्राधिकारणाच्या हद्दीसंदर्भात वातावरण तयार करुन त्यावर निर्णय घेतले जातात त्यातून काहीही उत्तर आपल्याला प्राप्त झालेल नाही, गेल्या वीस वर्षात मोर्चे निघाले आणि त्यावेळेस मी इतिहास सांगत असताना त्या पाठीमागची माझी भूमिका ही नाही की आम्ही काय काय केलं होत म्हणून. पण काय घडल होत हे देखील सभागृहाला समजल पाहीजे. माझी भूमिका जर चुकीची असेलतर कोणीही पाठींबा देवू नका. पण या शहराच्या

,

हितासाठी काही निर्णय सर्वपक्षीय बाजूला ठेवून एक विश्वस्त म्हणून या शहराच्या सर्वांगीन हितासाठी किंबहूना या शहराला योग्य पध्दतीने न्याय देण्यासाठी आपण काहीतरी धाडसी पाऊल उचलण देखील सभागृहाच अदय् कर्तव्य आहे असं मी मानतो. याठिकाणी १९७२ साली आण्णासाहेब मगर या दुरदृष्टी नेत्यांनी या शहराची निर्मिती केल्याच्यानंतर प्राधिकरण त्याठिकाणी झालं. मी विशेषतः सदाशिव खाडेना एका गोष्टीचे निश्चितपणे धन्यवाद देईल की त्यांनी १९८५ किंवा १९८२ च्या अगोदरच्या शेतक-यांना परतावा देण्याच्या दृष्टीकोनातून हालचाली केल्या किंबहूना आडीच वर्षे प्रलंबीत असलेला प्रश्न त्यांनी मार्गी लावण्यासाठी प्रयत्न देखील केले. अध्यादेश आला का नाही हे मला माहित नाही परंतु त्यांनी ती घोषणा केली, निश्चितपणे जे चांगल घडलय त्यासाठी अभिनंदन देखील मी करतो. कारण ती भूमीका ही राजकीय नाही कारण या सगळया परिस्थितीच भान ठेवून आपण याठिकाणी शहराचा जवळ जवळ चाळीस चाळीस टक्के भाग हा प्राधिकरणामुळे व्यापलेला आहे. आयुक्त हे तीन वर्षात जात असतात जास्त वशीला असेलतर पाच वर्षे राहतात. परंतु या शहराचा पुर्व इतिहास नेमक काय घडलय याचा ऊहापोह जाहीररीत्या होत नसतो. प्राधिकरण, प्राधिकरण, प्राधिकरण म्हणजे काही शहरापासून शंभर कि.मी. प्राधिकरण नाही. प्राधिकरण पिंपरी चिंचवड शहराचा एक अविभाज्य भाग आहे. परंतु याठिकाणी मी आयुक्तांना पण सांगू इच्छितो की मी माझ्या कालकिर्दी मध्ये म्हणण्यापेक्षा जो कालखंड सत्तेच्या माध्यमातून होता, २००१ साली ज्यावेळेस प्राधिकरण समिती निर्माण झाली ज्यावेळेस या अगोदर याठिकाणी या शहरामध्ये प्राधिकरण वाल्हेकरवाडी, थेरगाव, काळेवाडी फाटयापासून भोसरीपासून निगडी, चिखली, मोशी, रावेत, थेरगाव, वाकड संपुर्ण भाग हा याच्यातून बाधीत झालेला आहे. मा.महापौर साहेब, आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की २००१ च्या पुर्वी मला वाटत की त्या टाईमाला नामदेव ढाके १९९७ साली निवडणूकीत माझा पराभव झाल्याच्यानंतर त्या टाईमाला तानाजी वाल्हेकर यांनी त्यांच्या परिसरामध्ये रोड करण्यासाठी आपण परवानगी घेतली होती. त्यामुळ त्या कालखंडापासून त्यानंतर तानाजी वाल्हेकर असतील, शामराव वाल्हेकर असतील आमचे चिंचवडे असतील आणि मधुकर आण्णा पवळे हे त्याच नेतृत्व करत होते. मधुकर चिंचवडे आणि धोंडूतात्या चिंचवडे त्याकाळात होते या सर्व मंडळीनी याठिकाणी फार मोठ आंदोलन केलं. सभागृहाला याची आठवण मी का करुन देतो की हे काही घडतयना त्या मागे काही लोकांचा त्याग आहे, समर्पणाची भावना आहे. म्हणून ती अनधिकृत घरे टिकलेली आता ती अधिकृत करायच त्यासाठी आंदोलन चालले आहे तर

,

ती घर त्यांच्यामुळ निर्माण झालेली. त्या परिस्थितीमध्ये त्यांना न्याय दिला, त्या संदर्भात काय परिस्थिती होती त्या परिस्थितीला ते कसे सामोरे गेले आणि त्यातून कशा कशा पध्दतीने घटना घडत गेल्या हे जर माहिती नसेलतर आपण कोणत्याही विषयाला मंजूरी देतो. मी स्वत: २००१ साली प्राधिकरण सदस्य झालो. नंतर महापालिकेच्या निवडणूका झाल्या त्यावेळेस पण मी नगरसेवक झालो. मला फायदा असा झाला की मी प्राधिकरण हाद्दीतला भाग होता तेथून नगरसेवक झालो. त्या काळामध्ये निर्मलकुमार देशमुख प्राधिकरणाचे सीईओ होते. त्यावेळेस प्राधिकरणाच्या हद्दीतील कोणत्याही विकास कामाला अडथळा निर्माण करायचा नाही असा ठराव पास करुन घेतला. आज २००१ पासून २०१९ पर्यंत मी असे प्रश्न विचारले होते की पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या स्थापनेपासून प्राधिकरणामध्ये निवासी नोंद किती. त्यातून मिळकत कर, घरपट्टी, पाणीपट्टी रुपाने किती महसूल जमा होतो. तसेच २००२ पासून ते २०११ पर्यंत महानगरपालिकेचे प्राधिकरण हद्दीमध्ये विकास कामासाठी किती खर्च केला. २०११ पर्यंतच्या अधिकृत नोंदीची माहिती २०११ नंतर काही बांधकामे झाली आहेत का. असल्यास माहिती दयावी. या पलीकडची भूमिका अशी होती, मला एक समजत नाही की केवळ निवडणूका डोळयासमोर आल्यात म्हणून आपण घोषणा करणार असालतर तुमच सगळ चांगल चाललेल आहे आता. तीन्ही मतदारसंघात तुम्हांला बहुमत आहे. आपण शहर म्हणून काहीतरी निर्णय घ्या. शहराच्या दृष्टीकोनातून हे नागरीक ज्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात आपण वारंवार त्याच भांडवल तुम्ही असेल, आम्ही असेल सर्व मंडळीन भांडवल करुन म्हणजे चेष्टेचा विषय झालेला आहे त्यांच्या दृष्टीकोनातून त्यांचा आत्मसन्मान जो आहे त्याचा पार काथ्याकुट झालेला आहे सगळया परिस्थितीतून आणि त्याचा आपण कधी सन्मान करणार आहोत. गमंत चालली आहे पुर्ण. २००१ साली मी एनओसी घेतल्यानंतर वाल्हेकरवाडीचा भाग जो होता, राजन पाटील साहेब आहेत ते आता सिटी ईंजिनीअर आहेत. ते त्या वेळेस पाणीपुरवठयाच काम बघत होते. सेक्टर २९, ३०, ३१ मामुर्डी, किवळे, पुनावळे, ताथवडे हा सगळा भाग विलीन झाल्यानंतर एका पाण्याच्या टाकीवर त्याच संपुर्ण नियोजन होतं. प्राधिकरण हद्दीत आपल्याला जागा मिळत नव्हती, योगायोगाने मी तीथ सदस्य होतो. ५२ गुंठे जागा आपण १ रुपया स्क्वे.फुटाने दिली. जुना जीआर काढला त्यावेळेस अतीरीक्त आयुक्त होते त्यांनी १७ गुंठे जागा १७ लाखात घेतली मी ५२ गुंठे जागा रावेत मध्ये सेक्टर २९ मध्ये ५२०० रुपयात जागा घेतली. राजन पाटील इथे आहेत त्यांनी त्यावेळेस माझ कौतूक

,

केलं होतं. या सगळया परिस्थितीमध्ये त्यांनी त्याठिकाणी पाणीपुरवठयाला जागा घेतली जागा त्यांनी दयायची विकास आपण करायचा. अंडरग्राऊंड ड्रेनेज, भूयारी गटार योजना आपण करायची, संपुर्ण पाण्याची लाईन आपण टाकायची, विदयूतपुरवठा आपण करायचा, टॅक्स आपण घ्यायचा. उत्पन्न आणि गुंतवणूक यामध्ये तफावत एवढी मोठी मग आता प्राधिकरणाने काय सांगीतल जानेवारी २०११ किंवा त्यापुर्वी केलेले निवासी बांधकाम. म्हणजे २०११ नंतर एकपण घर झालेल नाही का. बरं ठिक आहे, याना तुम्ही जर अधिकृत केलतर २०११ नंतरची घर काढून टाकणार का. कमाल १५०० स्क्वे.फुटाचे बांधकाम, म्हणजे तीन गुंठयात बारा फ्लॅट बांधलेत ५००-५०० स्क्वे.फुटाचे. आणि एक कुटूंब आहे त्याच्या घरी त्यांनी २ हजार स्क्वे.फुट बांधल आहे त्याच्या नावावर घर होणार नाही. म्हणजे ५०० स्क्वे.फुट तुम्ही पाडणार का. डोंगरउतार, सीआरपीझेड असे अतिक्रमण नियमीत केले जाणार नाहीत. आहो, आहे हे नियमीत करता येणार नाहीत तुम्हांला. मग ही कसली तुम्ही नियमीत करायची भाषा करुन बसले. बांधकाम करताना पती व पत्नी अशा दोघांची नाव समाविष्ठ केले जातील. एका घरामध्ये तीन भाऊ असतील ते १२०० स्क्वे.फुटामध्ये रहात असतीलतर त्याची कशी विभागणी करणार. नियमीत करण्यासाठी नियोजन ५०० चौ. फुटा पर्यंत जागा संबंधितांच्या नावावर मोफत केली जाणार. हे सगळे जे चालले आहेना ते तुम्हाला काहीच करायची गरज नाही. मी उपाय जो सांगणार आहे हा जर उपाय चुकीचा असेलतर तुम्ही माझ्यावर टिका करा. मी प्राधिकरणामध्ये तीन वर्षे होतो. आता हा जो राजकीय मुद्दा आहे तो बाद झाला आहे, वीस पंचवीस वर्षे तेच तेच तेच आपण करत असतो. आयुक्त साहेब माझ्या माहिती प्रमाणे किमान खरी माहिती आली असती म्हणून हे प्रश्न आहेतना प्रशासनाचे आहेत आणि आपण भांडत असतो. अनधिकृत घर झाली, घर कोणी होऊ दिली. हाप्ते कुणी घेतले आणि त्याच प्रायश्चित कोण करतं, आजचे बसलेले राज्यकर्ते. कोणत्याही प्राधिकरणामध्ये ज्यावेळेस आपण विषय घेतोना आर्थिक विषय येतो त्यावेळेस असं ठरल जातं की महानगरपालिकेनी एवढा खर्च करायचा आणि त्यांनी एवढा खर्च करायचा. पण प्राधिकरणाने रेडीरेकनर प्रमाणे त्यांनी पैसे कोणत्यानी भरायचे. मी तर सर्व प्राधिकरण हद्दीतील लोकांना सांगेल कारण त्या ठिकाणचे नगरसेवक काम करतात भोसरी पासून रहाटणी, काळेवाडी, वाकड पर्यंत. रेडीरेकनेरप्रमाणे काहीही रक्कम भरायची गरज नाही प्राधिकरणाकडे. माझ असंच मत आहे की हजारो कोटी रुपये विकासासाठी खर्च केले असतील आणि रेडिरेकनेरचे प्राधिकरणाला पैसे भरायचे. कोणता नियम आहे हा. ६७ हजार न्यायप्रविष्ठ

,

जी महापालिका हद्दीतील घर आहेत त्याच्यावर आपण पर्याय म्हणून शास्तीकर लावलेला आहे तो प्रश्न आजून तसाच प्रलंबीत आहे. प्राधिकरण हद्दीतील जी घर आहेत जे नियम काढलेले आहेत त्या नियमामध्ये काही तथ्य नाही. त्याला एकच पर्याय आहे आणि मा.महापौर साहेब, सभागृहाने तो ठराव करावा. पक्षनेते साहेब तुम्ही ठराव मांडा, तुमच क्रेडीट आहे तुमच शहर आहे, तीन्ही मतदारसंघाची तुम्ही चिंता करु नका, तुम्ही काही चिंता करत  नाहीत. हा विषय मतदारसंघाचा नाहीतर या शहराचा आहे. तुम्ही ठराव मांडा, तुम्ही निर्णय घ्या. वर्तमानपत्रामध्ये तुमची प्रेसनोट करा. जो प्राधिकरण बाधीत आता भाग आहे तो या प्राधिकरणातून वगळावा. यापुर्वी सुध्दा काही भाग वगळलेले आहेत. आणि ते वगळलेले नसतीलतर माझा शब्द मी परत मागे घेतो. पण हे जे प्राधिकरणाचे शोषण चालू आहे, आहो, असलेल्या नोक-या बंद झालेल्या आहेत. टेल्कोची परिस्थिती आज काय आहे, बजाज टेम्पोची परिस्थिती काय आहे, मारुती सुझूकीची परिस्थिती काय आहे. त्याठिकाणी राहणारा जो कामगार वर्ग आहे त्याची दयनीय अवस्था होईल. प्राधिकरणाचे अधिकारी त्यावेळेला जबाबदार नव्हते का, तुम्हांला वाटत असेल आता मोकळी जागा आहे घ्या ताब्यात पण ज्या ठिकाणी बाधीत झालेलं आहे त्याठिकाणचा तो संपुर्ण भाग वगळावा कारण विकास महानगरपालिकेनी केलेला आहे. हजारो कोटी हे महानगरपालिकेचे खर्च झालेले आहेत, टॅक्स महानगरपालिका घेते. सगळया प्रकारचे टॅक्सेस महानगरपालिका घेते कारण विकास आपण केलेला आहे. प्राधिकरणाचा काही संबंध नाही. प्राधिकरण फक्त कागदावर राहतय म्हणून त्यांनी रेडीरेकनेरप्रमाणे रेट लावायचा, अजिबात नाही. रिंगरोडचही अजून काही नाही. मला असं वाटतय की या सर्व भागावर परत एक काहीतरी कार्यक्रम होवून जायचा. वीस वर्षापासून हे कार्यक्रम झालेले आहेत. हा सर्वपक्षीय निर्णय घ्या. तुम्ही क्रेडीट घ्या, तुमची प्रेसनोट करा. एका वाक्यात ठराव करा. जे सर्व्हे नं. अधिकृतरीत्या बाधीत आहेत ते सगळे वगळा. याच्यापुर्वी वगळलेले आहेत. थेरगावचा पुर्व भाग देखील वगळलेला आहे. गरीब लोक आहेत, दहा दहा आणि पंधरा पंधरा लाख रुपये भरायची कोणाचीही ताकद नाही. एकतर होवू दयायच नव्हत, त्याच प्रायश्चित एकटयानी केल नाही पाहीजे सगळयानीच प्रायश्चित केल पाहीजे आणि म्हणून काहीतरी पॉलीसी डिसीजन घ्या. नाहीतर आपण जो विकास केला त्या सर्व विकासाचे प्राधिकरणातून पैसे वसूल करा. तो भाग आपण विकसीत केलेला आहे. मी प्राधिकरणाला सभागृहाच्या वतीने मागणी करतो. सदाशिव खाडे यांच अतीशय चांगल काम चालू आहे. कोणतरी त्यांना सांगत असेल अशा पध्दतीने करा, तशा

,

पध्दतीने करा. अमुक अमुक गोष्टी जवळ आलेल्या आहेत, तमुक तमुक गोष्टी आहेत. राजकारण राजकारणी पध्दतीनेच करायच असतं. मी स्वतः देखील काँग्रेसचा अध्यक्ष होतो त्यावेळेस आमच्या भागातून मोर्चा निघाला त्यावेळेस मला आमच्या पक्षश्रेष्ठीनी विचारल, मी म्हणालो ज्या गोष्टीचा निकाल लागलेला नाही त्या मोर्चामध्ये मी सहभाग घेणार नाही त्यावर माझ्यावर खुप पक्षश्रेष्ठीनी आगडपाकड केली. त्यावेळेस राष्ट्रवादीची याठिकाणी सत्ता होती पण नगरविकास खात काँग्रेसकड होतं. त्यावेळेस मी काँग्रेसला सांगीतल की हे तुम्ही ताबडतोब करा ते म्हणाले तुम्ही मोर्चा का नाही काढत, मी म्हणालो मी मोर्चा काढणार नाही लोकांची फसवणूक मी करेल पण मला इथच रहायच आहे. आमच्या स्मशानभूमी ईथच आहेत, इथ लोकांना तोंडाला तोंड दयाव लागणार आहे. सारख सारख फसवणूक चालणार नाही. आणि म्हणून मला अस वाटतय की त्या टाईमाला देखील मी काँग्रेसचा अध्यक्ष असून कॉग्रेसवर टिका केली होती आणि त्याच प्रायश्चित सुध्दा मी घेतल आहे. आणि म्हणून त्या टाईमाला राष्ट्रवादीचा दोष नव्हता. अजीतदादानां देखील त्यावेळेस बोललो होतो की दादा हे काम तुम्ही का करत नाहीत तर ते म्हणाले नगरविकास खात तुमच्याकड आहे. माझी बोलती बंद झाली आणि त्यावर तो निर्णय घेतला नाहीतर आज काँग्रेसची परिस्थिती काय झाली हे तुम्ही पाहता आणि म्हणून माझी नंम्र विनंती आहे हा खेळ आता बास झाला, सर्वानी त्या लोकांच्या भावनीक प्रश्न आहे, आहो, प्रत्येकाला खात्री नाही की माझ घर वाचल का नाही ते. तणावमुक्त करु, भिती मुक्त करु आणि जो बाधित भाग आहे तो बाधित भाग आपल्या महानगरपालिकेच्या वतीन प्राधिकरणाचे हद्दीतून वगळून टाकावा एवढी मी मागणी करतो आणि मी एका वाक्यात तुम्हांला ठराव करायला सांगतो की हा प्राधिकरण बाधित भाग वगळण्यात यावा. मा.महापौर साहेब आपल्याला मनापासून धन्यवाद देतो की तुम्ही विषय जरी नाही घेतलातरी मला मुद्दे मांडू दिलेत त्यामुळे तुम्हांला धन्यवाद देतो. कदाचित असंही असेल परमेश्वरी संकेत की दोन महीने तुम्हांला वाढवून मिळू देत. कदाचित हा विषय रद्द करण्यासाठी तुम्हांला वाढवून मिळाले असतील. गणपतीचे दिवस आहेत गणपती तुम्हांला पावेल आणि आम्ही मोरया गोसावीच्या गावचे आहेत. गणपती बप्पा मोरया म्हणल्यानंतरच गणपतीच नाव पुर्ण होतं. गणपती बप्पा मोरया म्हणून हा जो बाधित भाग आहे तो वगळावा अशी तुम्ही घोषणा करा. तुमची आम्ही चिंचवड गावामध्ये मिरवणूक काढू, तुमच महापौर पद गेल्यावर. दुसरी एक गोष्ट सांगतो नावाच्या संदर्भात आता जो घोळ झालेला आहे तो घोळ दुरुस्त करावा कारण त्यांच्याही भावना समजून घ्या. ज्यांच नाव आहे त्यांच्याही

,

भावना समजून घ्या. तुम्ही त्यांना दालनामध्ये बोलवा, आमचे विरोधीपक्षनेते नाना काटे यांनाही बोलवा आणि समन्वयानी विचार करावा. त्या नावाची इथ चर्चा करुन त्या नावाची वर्तमानपत्रामध्ये काहीतरी चुकीची माहिती येईल असं चित्र होवू देवू नका. ते प्रकरण कोर्टात आहे का नाही याची शहानिशा करा. कोर्टात असेलतर ते थांबाव लागेल. नाहीतर सगळयांचाच कार्यक्रम चालू होईल. मंजूरी दिली आताही कार्यक्रम चालू होईल विनाकारण. त्यामुळ तुम्ही तुमच्या दालनात बोलवून हा प्रश्न सोडवा. प्राधिकरण बाधित भोसरी मतदार संघात सुध्दा आहे. पिंपरी मध्ये सुध्दा आहे. चिंचवडमध्ये सुध्दा आहे. तरी तो बाधित भाग वगळावा आणि सर्वांना मान्य असेलतर मला पाठिंबा दयावा अशी मी मागणी करतो.

**मा.सुलक्षणा धर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर मा.महापौर साहेब, मगाशी पहीली जीबी झाली आणि त्याच्यामध्ये अतीशय सगळयांच्या जिव्हाळयाचा विषय हा वायसीएमचा होता. त्याच्यावर मला काही प्रश्न मांडायचे होते, काही समस्या होत्या त्या सभागृहामध्ये सगळयांच्या जिव्हाळयाच्या आहेत. जुलैचा विषय क्रमांक ५ होता त्याच्यामध्ये सागर आंगोळकर आणि राहूलजी कलाटे यांनी प्रस्ताव मांडला होता की महानगरपालिकेमध्ये वायसीएम रुग्णालयामध्ये मृत झालेल्या रुग्णांना बील माफ करण्यात याव त्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी. हा विषय खुप चांगला आहे. राहूलजी आणि सागरजी यांच मी अभिनंदन करते. परंतु वायसीएम या रुग्णालयामध्ये बरेचसे रुग्ण हे रुग्णसेवा घेण्यासाठी येत असतात. वायसीएमचा उद्देश आपण बील माफ करण याच्यासाठी आपण हॉस्पिटल काढलेल नाही तर त्याच्यासाठी लागणा-या उपाययोजना आपल्याकडे पुर्तता आहे का, त्याची उपलब्धता आहे का हा खरा प्रश्न निर्माण होतो. ब-याच महीन्यांपासून आपण वायसीएमचा कारभार पाहत आहोत आणि त्याच्यामध्ये प्रामुख्याने आढळत असलेल्या डॉक्टरांची संख्या आपल्याकडे प्रमाणापेक्षा कमी आहे. जे आहेत त्यांना असिस्टंट उपलब्ध नाहीत. नर्सेस आहेत त्यांच प्रमाण खुप कमी आहे ज्या सहा महीन्याच्या कालावधीसाठी आपण नर्सेस घेतलेल्या आहेत त्यांचही प्रमाण खुप कमी आहे. त्याचप्रमाणे आपल्याकडे मशिनरी चालू बंद प्रमाणात आहे. परंतु ज्या चालू मशिनरी आहेत त्यांना ऑपरेट करायला आपल्याकड ऑपरेटर्स नाहीत आणि ज्या बंद आहेत त्याच्याकडे आपल अजीबात लक्ष नाही. आपल्याकडे महत्वाचा प्रश्न जो निर्माण होतो तो सातत्याने आपल्याकडे औषधाचा पुरवठा कमी होत आहे. म्हणजे अगदी थंडी-ताप आलातरी आपल्याकडे पॅरासेटीमॉल जे ३० पैशाला

,

मिळतं ते सुध्दा औषध आपल्याकडे अव्हेलेबल नाही. बीपीसाठी औषध असेल किंवा मधुमेहा साठी औषध असेल ते सुध्दा आपल्याकडे अव्हेलेबल नाहीत हे अनेक महीन्यांपासून आपण बघतो. आयुक्त साहेब मी आपल्याला मध्यंतरी एक पत्र दिलं होत आणि त्या पत्राने प्रामुख्याने नर्सेसची कमतरता आणि औषधाची कमतरता याचा उल्लेख केला होता. त्याच्यावर अजूनपर्यंत कुठल्याहीप्रकारचा फॉलोअप घेवून आपण तीही पुर्तता कमी करु शकलो नाहीत. खरतर या विभागामध्ये काम करणा-या अधिका-यांची मानसीकता काय आहे हेच कळत नाही. औषध हा खुप प्रमुख भाग आहे आणि आपल वायसीएम हे सुरवातीपासून रुग्णांना मोफत औषध देतं. हे रुग्ण आपल्याकडे पिंपरी चिंचवड मधुनच नाहीतर संबंध महाराष्ट्रातून रुग्णसेवा घेण्यासाठी येत असतात. आपण अगदी तो पाच का दहा रुपयाचा केसपेपर काढतो आपले रुग्ण डॉक्टरांकडे जातात, डॉक्टर प्रिस्क्रीप्शन देतात आणि ते प्रिस्क्रीप्शन घेवून ते रुग्ण जेव्हा स्टोअरमध्ये जातात तेव्हा स्टोअरमधून त्यांना सांगण्यात येत की हे औषध आपल्याकडे अव्हेलेबल नाहीत आणि तुम्हांला ती बाहेरुन विकत घ्यावी लागतील. त्यामुळे नाईलाजास्तव रुग्णांना ती औषध बाहेरुन विकत घ्यावी लागतात. ब-याचदा डॉक्टर रेफर करतात की हे औषध बाहेरच्या मेडीकलमधुन घ्या. मग तो इन्प्लॉन्ट असो किंवा ती औषध असो किंवा ट्रिटमेंट घेण्यासाठी सुध्दा रुग्णांना आपण ब-याचदा बाहेर पाठवतो. या सगळया परिस्थिती महापौर साहेब, आयुक्त साहेब आपल्याला वारंवार कानावर घातलेल्या आहेत. पत्रकारांनी या उघडकीस आणलेल्या आहेत. परंतु त्याच्यावर आपल्याकडून कुठल्याही प्रकारचा फॉलोअप घेतला गेलेला नाही. हे कन्टीन्यूएशन आपल्याकडे चालूच आहे. मध्यंतरी एकप्रकार उघडकीस आला होता. पेपरमध्ये आल होतं की एका पेशंटला आपण गरज नसताना डायलेसिस केलं आणि पेपरची बातमी वाचल्यानंतर शहरात सगळीकड खळबळ उडाली आणि प्रत्येकानी आपआपल्या परीने त्या परिस्थितीची चौकशी केली तेव्हा निदर्शनास आल की तो पेशंट आपल्याकडे वायसीएम मध्ये आला, वायसीएम मध्ये आल्यानंतर आपण त्याची तपासणी केली जे नॅट्रॉलॉजिस्ट होते त्यांनी पेशंटचे सिम्टन्स पाहीले आणि त्याचा रिपोर्टस पाहील्यानंतर त्यांना निदर्शनास आल की त्याच्या चेह-यावर सुज होती, हातापायावर सुज होती, ताप होता सिम्टन्स बघीतल्यानंतर वय लहान होत आणि मग डॉक्टराना वाटल की रिस्क फॅक्टर वाढू नये म्हणून डॉक्टरानी त्याच्यावर डायलेसीस हा ऑप्शन्स निवडला. कारण की तो पर्याय निवडला नसतातर त्यांच्याशी केलेल्या चर्चेतन असं आढळून आल की त्याला ब्रेन इन्ज्यूरड झाल असतं किंवा सोडीएम पोटॅशिअम इन्बॅलन्स

,

होवून त्याला आणखी काही क्रिटीकल सिच्यूएशनला फेस कराव लागल असतं. अशा परिस्थितीमध्ये त्या संबंधित डॉक्टरांनी डायलेसीस हा ऑप्शन निवडला आणि आपण त्याच डायलेसीस केल. काही दिवसानी तो रुग्ण हॉस्पिटलमधुन डिस्चार्ज होवून दुसरीकडे गेला. बाहेर गेल्यानंतर प्रायव्हेट क्लिनीक मध्ये त्यांनी जेव्हा त्याची तपासणी केली तेव्हा त्याच क्रियाट लेव्हल ०.६ होतं. म्हणजे आपल्याकडे केलेल्या तपासणीमध्ये चाचणीमध्ये २४ टक्के क्रियाट होत आणि बाहेर एकाच सायकलमध्ये ते क्रियाट केल ते एवढ कमी कसं झालं याची चौकशी केल्यानंतर अशा पध्दतीचे रिपोर्टस कसे काय आले. म्हणजे त्या डॉक्टरनी केलेल काम चुकीच आहे का किंवा मग आपल्याकडचे रिपोर्ट चुकीचे आहेत. मला एकच सांगावस वाटत की इथे हे जे रिपोर्टस आपण करुन घेतलेले आहेत ते मे.माहेश्वरी सेल्स कॉर्पोरेशन, याठिकाणी नाव अवर्जुन घेण्यामागच कारण एक आहे आयुक्त साहेब २०१६ आणि २०१८ चे जे आपण टेंडर काढल होत केमिकल इन्स्ट्रूमेंट परचेसच तर ते टेंडर कॅन्सल कराव असं तत्कालीन आयुक्त वाघमारे साहेबांनी आदेश काढले होते. त्वरीत ते टेंडर कॅन्सल करुन रि-टेंडर कराव असेही त्यांचे आदेश होते. परंतु आपल्या संबंधित अधिका-यांनी आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आणि ते टेंडर परत आठरा महीन्यासाठी ते पंधरा महीन्यासाठी कन्टीन्यू करण्यात आलं. जेंव्हा पहील्यांदा ते टेंडर काढल होत तेव्हा ते तीन टक्के बीलोनी होत आणि त्याच्यावर १५ टक्के एक्स्टेन्शन दिल्या नंतर त्याच्यामध्ये साडेआठ कोटीची खरेदी झाली आणि नंतर जेव्हा आठरा महीन्याने जेव्हा त्याच्यामध्ये आपण रि-टेंडर केल तेव्हा तेच टेंडर त्याच कंपनीला साडेआठरा टक्के बिलोनी लागलेल आहे. म्हणजे पहील्या टेंडरमध्ये आपण रिंग केली होती का. पहील टेंडर आपण कशासाठी एक्स्टेंशन केल होतं आणि आठरा टक्के बिलोनी सुध्दा त्या व्यक्तीला जर दोन वर्षानंतर परवडतय तर पुर्वीच्या काळात पण त्याला तेच टेंडर त्या किमंतीनी परवडत नव्हतं का. नंतर जीएसटी वगैरे ब-याचशा गोष्टी आल्या तरी सुध्दा त्यांनी आठरा टक्के बिलोनी ते टेंडर कसं काय ॲक्सेप्ट केल. तरी या सगळया गोष्टी खुप आश्चर्यजनक आहेत. आयुक्त साहेब याठिकाणी आपल्याला सांगावस वाटतय की त्याच्यामध्ये साडेआठ कोटीची खरेदी झाली आणि दिड कोटीच महानगरपालिकेच आर्थिक नुकसान झाल आहे. हे नुकसान करदात्यांच आहे, करदाते आपल्याला पैसे देतात आणि महानगरपालिकेचे विश्वस्त म्हणून आमचा अधिकार आहे या गोष्टींची शहानिशा करणं, खात्री करणं. याठिकाणी जेव्हा आपण औषधाची चौकशी करतो तेव्हा आम्हांला काही माहिती नाही मॅडम टेंडर पब्लिश झालेल आहे, रेट

,

मागवले, कोटेशन येतात आणि भंडार विभागाकड आहे. एवढ सांगून प्रत्येकवेळेस आपले हात वर करतात. नर्सेस, डॉक्टरच्या बाबतीत कालावधी संपल्यानंतर पण जाहीराती काढतो त्याच्यानंतर आपण परीक्षा घेतो त्याच्यानंतर आपण नियुक्ती करतो. नियुक्तीच्या अजूनही ऑर्डर दिलेल्या नाहीत. बरेचसे डॉक्टर्सचे टर्मस संपलेले आहेत, नर्सेसचे टर्मस संपलेले आहेत. इन्टरव्हिव झाल्यात, लिस्ट पण फायनल आहेत परंतु त्यांना आपण ऑर्डर दिलेली नाही. मग या सगळया गोष्टीमध्ये आपण दिरंगाई का करतो. याच्यामध्ये कोणाला गांभीर्य आहे की नाही. अशा पध्दतीने जर आपण काम करणार असेलतर वायसीएम सारखा हात्ती आपण सांभाळतो तो उदया इथे आपल्याकडे डॅट्रॅक्से जास्त वाढत चालले आहेत त्याच्याकडे कोणाच लक्ष नाही. आपल्याकडे अव्हेलेबल असलेल्या मशिनरी त्या किती चालू आहेत, कशा परिस्थितीत आहेत. अगदी आऊट डेटेड मशिनरी आपण आजही वापरतो. आयुक्त साहेब, आपण आपल्या पालीकेच्या लॅबमध्ये टेस्ट केलेले रिपोर्टस आपण जेव्हा प्रायव्हेट लॅबमध्ये घेवून जातो तेव्हा तीथल्या डॉक्टर्सला त्याची शंका येते आणि ते म्हणतात आम्हांला तुमच्या वायसीएमच्या लॅबवर विश्वास नाही आपण परत टेस्ट करु आणि डेफिनेटली रेजीएशन्स येतात, मग आपण निकृष्ट दर्जाचे हे वापरतोय का, त्याची क्वॉलीटी आपण इम्प्रूव्ह का करत नाहीत. असं ब-याचवेळा मी निदर्शनास पण आणुन दिलेल आहे. अशा अती संवेदनशील गोष्टी आहेत परंतु इथ आपल्या कोणाचच लक्ष नाही. त्याच त्याच पदावर अनेक वर्षे काम करणा-या अधिका-यांची सुध्दा मानसीकता होत नाही की आपण अत्यावश्यक सेवेमध्ये काम करतो. कुठलीही गोष्ट आपण प्रायोरीटीने देतो तेव्हा त्यामध्ये वायसीएमच्या बाबतीत फक्त खरेदीला प्रायोरीटी देतो. खरेदी करणं हा प्रत्येकाचा इन्टेन्शन झालेला आहे. म्हणजे आता माझ्या माहीती प्रमाणे तालेरा रुग्णालय अजून सुरु झालेले नाही. त्याच बरोबर भोसरी रुग्णालय पण सुरु झालेल नाही आणि आयसीयूही त्याच्यामध्ये नाही. तरी सुध्दा तिथे आपण व्हेन्टीलेटर्स सुरु केलेले आहेत. इथे वायसीएम मध्ये आपल्याला व्हेन्टीलेटर्स लागतात तिथे व्हेन्टीलेटर्स अभावी पेशंटचा जीव दगावतो तिथे आपण व्हेन्टीलेटर देवू शकत नाहीत परंतु इथले व्हेन्टीलेटर धुळखात पडलेत. मग हे खरेदी करण्यामागच इन्टेन्शन काय होतां अशा ब-याच गोष्टी आहेत की आपल्याकडे व्हेन्टीलेटर झाल, डायलेसिस मशिन झालं साध बीपी ऍंथ्रेटस पण आपल्याकडे आऊट डेटेड आहे. आपल्याकडे व्हिल चेअर्स नाहीत, आपल्याकडे स्ट्रेचर्स नाहीत, आपल्याकडे ब-याचशा गोष्टी नाहीत. स्वच्छता बघीतलीतर अगदीच आऊट डेटेड म्हणजे बाजूला आपल्याकडे डी.वाय.पाटील हॉस्पिटल आहे तिथेही हीच

,

एजन्सी काम करते आणि आपल्याकडेही हीच काम करते पण तीथल्या स्वच्छतेमध्ये आणि आपल्या स्वच्छते मध्ये बराचसा जमिन आसमानचा फरक आहे या गोष्टीकडे कोणाच लक्ष नसतं. आरोग्यसेवा, रुग्णसेवा ही ईश्वरसेवा मानतो परंतु आपल्या इथे खरेदी हा इन्टेन्शन डोळयासमोर ठेवतो. पी.जे.इन्स्टिटयूटला ब-याच जणांचा विरोध आहे. परंतु पी.जे. इन्स्टिटयूटसाठी लागणा-या इन्स्ट्रूमेंटस खरेदीसाठी मात्र प्रत्येकाचा इन्ट्रेस्ट आहे. पी.जे. चे डॉक्टर्स आणि वायसीएमचे डॉक्टर्स यांच्यामध्ये वाद हा नेहमीच आहे परंतु त्यांच दोघांचही मेन इन्टेन्शन आणि प्रथम कर्तव्य हे रुग्णसेवा आहे हे आपण यांना वारंवार जाणीव करुन दिली पाहीजे. इन्पलान्टस जे आहे ते काही डॉक्टर्स लोकांना सुचवतात की तुम्ही याच कंपनीचे घ्या. जर नाही वापरलेतर जी काही रिऍक्शन्स होईल त्याला आम्ही जबाबदार नाहीत. आयुक्त साहेब, वारंवार या गोष्टी मी तुमच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. परंतु आजही तोच प्रकार आपल्या वायसीएममध्ये राजरोषपणे चाललेला असतो. अगदी ठेकेदाराला हवे असेल त्याच पध्दतीने जर आपण काम करणार असेलतर या वायसीएमच आपल्याला जे अपेक्षीत आहे की आपण खरच इथे खुप रुग्णांची सेवा करतो तर, तस काही होत नाही, रुग्णसेवेमध्ये कोणालाही इन्ट्रेस्ट नाही. फक्त महत्वाच्या खुर्चीवर बसून आपण खरेदी करणं एवढाच इन्ट्रेस्ट मात्र प्रत्येकाचा आहे. ही कुठेतरी मानसीकता बदलली पाहीजे. ठरावीक अधिकारी जर आपण या पदावरुन बदलले आणि प्रत्येकाला रोटेशन दिलतर नक्कीच या पध्दतीची त्यांची मानसीकता हाटवून जाईल आणि चांगल्या पध्दतीच काम होईल. आपल्याकडे जे सिक्यूरीटीज आहेत सिक्यूरीटीज आणि कमांडो यांच प्रमाण कमी आहे आणि जे आहेत ते पण कुपोषीत आहेत. म्हणजे त्यांनाही ऍक्च्यूएली प्रोटीनची गरज आहे. अगदी त्यांच कोणी ऐकत नाहीत, जे सिक्यूरीटीज आहेत ते पण लोकांना दिसत नाहीत. जेव्हा मॉप येतो तेव्हा ते कंट्रोल करु शकत नाहीत. त्याही गोष्टी सुधारण्याची गरज आहे. कारण ब-याचदा रुग्णांचे नातेवाईक डॉक्टर्सच्या अंगावर धावून जातात आणि त्यावेळेस या सिक्यूरीटजचा आपल्याला काहीच फायदा होत नाही. अशा पध्दतीने आपल्याला सिक्यूरीटज मध्ये इम्प्रूमेंट होणं गरजेच आहे. सीएमओचे जे डॉक्टर्स आहेत ते मोस्टली आपले रुग्ण बाहेर पाठविण्यामध्ये त्यांना जास्त इन्ट्रेस्ट असतो. त्यांच्यावरही वचक घालण गरजेचे आहे. आपल्याकडे औषधाचा जो साठा आहे त्याच्यामध्ये आपण क्वॉलीटी मेन्टेन करत नाही, म्हणजे दर्जेदार औषध जर दिलीतर नक्कीच आपल्या रुग्णाला जे पंधरा वीस दिवस जी औषध घ्यावी लागतात, नक्कीच आपण ब्रॅन्डेड औषध जर प्रेफर केलीतर ऍटलीस्ट चार ते

,

पाच दिवसात त्यांना फरक पडेल अशा पध्दतीची औषध आपण प्रेफर केली पाहीजेत. आणि इनप्लांट जास्तीत जास्त वायसीएमकडूनच देण्यात याव्यात अशा पध्दतीच्या जर काही उपाययोजना केल्यातर आपल्या गरीब जनतेला त्याचा नक्कीच फायदा होईल. त्याच्याबरोबर ओटी ही आपली मॉडीलर प्रणाली झाली पाहीजे. आता आपण त्याला फरशा लावून ठेवलेली आहे रंगवून ठेवलेली आहे पण त्याच्यातली मशिनरी ही तशीच आहे ती अतीशय आऊट डेटेड पध्दतीची आहे त्याच्यामध्ये आपण मॉडयूलर प्रणालीन केलतर रिझल्ट ओरिएण्टेड काम आपल्याकडे होईल. आयसीयूची परिस्थिती अशी आहे की तिथे अगदी वरच पीओपीच पॅनल आहे ते पडल आहे त्याच्यातून पाणी पडत आणि त्या पाण्याच्या खाली बादली लावलेली आहे. म्हणजे एवढी भयंकर परिस्थिती आहे. वीस दिवसापासून ब-याचदा  आपण निदर्शनास आणून दिलेलं आहे.  ब-याच पत्रकारांनी त्याचे फोटोही काढले पण अजूनही तीथे कुठल्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. तरी याही गोष्टीकडे अगदी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. त्याच बरोबर आपल्याला प्रायव्हेट बेडस आणि सेमीप्रायव्हेट बेडस वाढविण गरजेच आहे. कारण ब-याचदा प्रायव्हेट बेडच्या डिमांड खुप असतात. त्यासाठी आपल्याकडे अव्हेलेबिलीटी कमी असते. आयसीयू आपला रेडी झालेला आहे परंतु त्याच्यामध्ये इक्वीपमेंट नाही म्हणून तो वापरात देत नाहीत. त्याच्यामध्ये आपण साधारण वीस पंचवीस बेड जर अव्हेलेबल करु शकलोतर आयसीयू नाही म्हणून ज्यांचा जीव दगावतो अशा रुग्णांना आपण सेवा देवू शकू. असे काही प्रश्न आहेत आणि अशा काही सुधारणा होणे अपेक्षीत आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण वारंवार वायसीएमला भेट देतात. परंतु त्याच्यातन निष्पन्न असं काहीच होत नाहीतर  रिझल्ट ओरिएण्टेड काम व्हाव अशी अपेक्षा व्यक्त करते. याठिकाणी अवर्जून सांगावेसे वाटत की महानगरपलिकेच्या एका इमारतीमध्ये एका केबीनमध्ये मी काही दिवसापुर्वी वाचल की संस्था ही कोणतीही असो, सरकारी, सहकारी, खासगी, संस्थेत ठरावीक तास काम करणे हा झाला कायदा. पण कामात स्वतःला झोकून देणे ही झाली नैतीकता, मी पगार घेतो म्हणून काम करतो हा झाला व्यवहार, संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची योग्य काळजी घेणेचे कार्य मला पार पाडावयाचे आहे हि झाली अपुलकी, संस्थेची प्रगती आहे तोवरच माझे अस्तित्व आहे, माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला हनिकारक ठरेल अशी कृती मी कधीही करणार नाही पण सामाजीक ऋण फेडण्याच्या भावनेनी स्वतःला कामात वाहून घेईल ही प्रत्येकांची भावना असली पाहीजे त्यातच संस्थेचा विकास व स्वतःचा उद्दार आहे. एवढे छान विचार आपल्याकडे महानगरपालिकेत केबीनमध्ये लावलेले असतात. हे

'

प्रत्येकाच्या केबीनमध्ये जर लावलेतर नक्कीच आपली महापालिका ही आशिया खंडात एक आदर्श महानगरपालिका म्हणून होईल. कारण बाकीचे प्रश्न तर आपण नाहीच सोडू शकत, रस्ते, पाणी आणि आरोग्य या गोष्टी आपण नाही करु शकत पण रुग्ण सेवा ही वैदयकीय सेवा तरी आपण चांगल्या पध्दतीने करु शकतो अशी अपेक्षा व्यक्त करते कारण आपण ही योजना जी आणली ही लाभदायी योजना नक्कीच नाही. एखादयाला आर्थिक सहाय्य देवू शकतो पण याच्यातला लाभ नाही त्यामुळ रुग्ण हा बरा होवून घरी कसा जाईल या इन्टेन्शनं आपण काम करण याठिकाणी अपेक्षीत आहे अस व्यक्त करते आणि मा.महापौर साहेब आपण बोलण्यास संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानते, धन्यवाद.

**मा.अभिषेक बारणे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पत्रकार मंडळी पाठीमागे बसलेले आहेत. जे सभागृहात घडत ते लोकापर्यंत त्यांच्या माध्यमातून पोहचत. आज सभागृहामध्ये काही आमच्या भागातील प्राधिकरणाच्या विषयावर चर्चा झाली. प्राधिकरण बाधित घर ज्या प्रभागामध्ये मी नगरसेवक आहे तीथ पंच्याहत्तर टक्के प्राधिकरण बाधित घर आहेत. प्राधिकरण बाधित असल्या कारणाने त्याठिकाणी अनधिकृत बांधकाम झाली. आपल्या शहराचे कार्यसम्राट आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रयत्नातून आमच्या भागातील अनधिकृत बांधकाम प्राधिकरण भागातील बांधकाम नियमीत होण्यासाठी आता एक जीआर आला त्या जीआरमध्ये दिड गुंठयाच्या आतली बांधकाम ही नियमीत होणार आहे. मी सांगू इच्छितो की आम्हांला पुर्वी गरज होती की पहीली जागा आमच्या नावावरती व्हावी त्यासाठी हा जीआर आहे. या जीआरमध्ये दिड गुंठयाच्या आतमधील जे क्षेत्रफळ आहे ते नागरीकांच्या नावावरती होणार आहे. मा.महापौर साहेब, मी तुम्हांला सांगू इच्छितो की इथ शास्तीकरांची चर्चा झाली. शास्तीकराबद्दल मी सांगतो की ७५ हजार बांधकामाना शास्तीकर शहरामध्ये लागला होता. त्या ७५ हजार शास्तीकरांपैकी ५२ हजार लोकांना फायदा झाला. दिड हजार स्क्वे.फुटाच्या आतला शास्तीकर माफ झाला. म्हणजे शंभर टक्के शास्तीकरापैकी ७५ टक्के बाधित घरांना याठिकाणी फायदा झाला. उर्वरीत जे २५ टक्के घर असतील याच्यामध्ये काही बांधकाम निवासी आहेत. जे निवासी बांधकाम आहेत ते निश्चितपणे सांगीतल्याप्रमाणे कोणाचे कुटूंब मोठे होते, कुटूंबप्रमुखाच्या नावान घर होतं. मी सरकारच आभार मानतो की त्यांनी एक हजार स्क्वे.फुटा पर्यंतच शास्तीकर माफ केला. आपण एखादा फ्लॅट एक हजार स्क्वे.फुटाचा घ्यायला गेलोतर किमान ५० लाखात तो

,

मिळतो. जर ५० लाखाच्या फ्लॅट मध्ये एखादा माणूस राहत असेलतर निश्चित तो गरीब नाही. आता ज्याठिकाणी जी बांधकाम दोन हजार स्क्वे,फुट. तीन हजार स्क्वे.फुट, चार चार कुटूंब आहेत ते तेथे राहतात त्यामुळ एकाच्याच नावावरती नोंद राहीली. त्याच्यामुळे ते शास्ती करात आडकलेले आहेत. परंतु आता जो प्राधिकरणाच्या जागेचा निर्णय झाला आज ते वाटून घेतात की या भावाच्या नावाने एक हजार स्क्वे.फुट दुस-या भावाच्या नावाने एक हजार स्क्वे.फुट जेणेकरुन त्यांना शास्तीकरामध्ये येथून पुढच्या वेळेस त्याला निश्चित फायदा होईल. मी पुन्हा एकदा लक्ष्मण भाऊ यांच, सदाशिवराव खाडे यांच अभिनंदन करतो, आभार मानतो की त्यांनी हा जो निर्णय घेतला आता २०११ पुर्वीची बांधकाम याच्यामध्ये दिड गुंठयाची जागा त्याच्या नावावरती होणार आहे. आतापर्यंत जेवढी बांधकामाची नोंद झालेली आहे त्या सर्वच त्यांनी घ्यावी याच्यासाठी देखील आम्ही त्यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांनी जेवढ केल त्याच्यासाठी स्वागत. पत्रकारांना विनंती करतो की छापतानी असं छापाव की दिड गुंठयाच्या आतील बांधकाम २०११ च्या पुर्वीची बांधकाम आता नियमीत व्हायला चालू झालेली आहेत. तुम्ही असं छापू नका की २०११ नंतरच्या बांधकामाच नाही. जेवढ होतय तेवढ पहील करुन घेऊ. तेथून पुढच्यासाठी आम्ही निश्चितपणे मागणी करणार आहेत. हे पण छापा की येथून पुढ आम्ही मागणी करतो, फॉलोअप घेतोय आणि ते देखील येणा-या काळामध्ये होईल. एवढ सांगून थांबतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. भाऊसाहेबांनी जो मुद्दा याठिकाणी मांडला तो विषय खरे म्हणजे विषयपत्रीकेवर नव्हता तरी पण मा.महापौर साहेबांनी भाऊसाहेबांच्या विनंतीला मान देवून त्यांना त्या विषयावर बोलायला संधी दिली. आयुक्त साहेब या शहराचा इतिहास आपल्यालाही ब-या पैकी माहिती झालेला असेल. याठिकाणी कारखानदारी आल्यानंतर नगरपालिकेची पिंपरी चिंचवड महानगरपालिका झाली. कारखानदारी आल्यामुळे या भागांचा विकास झाला आणि विकास होत असताना प्राधिकरणाची निर्मीती झाली. त्याच्या मागची भूमीका अशी होती की याठिकाणी कारखान्यामध्ये जो कामगार वर्ग काम करण्यासाठी येणार आहे या कामगाराला स्वस्त दरामध्ये अधिकृत प्लॉट मिळावा, त्याच अधिकृत बांधकाम व्हाव या हेतूने याठिकाणी आमच्या मुळ शेतक-यांच्या जमिनी याठिकाणी शासनाने भूसंपादन करुन त्याठिकाणी प्राधिकरणाची निर्मीती झाली. ती होत असताना याठिकाणी मोठया प्रमाणात कामगार

,

राहायला येत होता. त्याप्रमाणात याठिकाणी प्लॉट देण्यासाठी शासन कमी पडत होत. त्याच्यामुळे या शहरात अनधिकृत बांधकाम त्यावेळेस झाली. त्यावेळेस अर्बनलॅण्ड, सिलींग कायदा आला त्याच्यामुळे शेतक-यांनी एक गुंठा, अर्धा गुंठा जमिनी विकल्या आणि कामगारानीही त्यावेळी गरजेपोटी त्या घेतल्या. हे होत असताना अनधिकृत बांधकाम मोठया प्रमाणात शहरात झालेली दिसतात. तीच परिस्थिती प्राधिकरणाने शेतक-यांच्या ज्या जागा ऍक्वायर केलेल्या आहेत त्या जागेमध्ये सुध्दा बांधकाम झाली त्याच कारण असं की, आता आमच्या भोसरीमध्ये धावडेवस्ती, लांडगे नगरचा भाग आहे तो भाग प्राधिकरणाने ऍक्वायर केला परंतु आमच्या मुळ शेतक-यांनी तीथल्या जमिनीचा मोबदला प्राधिकरणाकडून घेतला नाही. आज रवि लांडगे, राजाभाऊ लांडगे ज्या भागातून काम करतात तो भाग मॅजोरीटीने त्या ऐरीयामध्ये येतो. त्याठिकाणी त्यांनी त्या जागेमध्ये स्वत:च्या खोल्या बांधल्या किंवा काही लोकांनी त्याठिकाणी कामगारांना जागा विकून छोटी छोटी घर झाली. आता अभिषेक बारणेनी जो मुद्दा मांडला की खरच लक्ष्मणभाऊनी, खाडे सारांनी प्रयत्न केले. शासनाने निर्णय घेतला, भाऊसाहेबांच सुध्दा तेच म्हणण होतं की चांगला निर्णय झाला परंतु त्याच्यामध्ये आणखीन काही त्रुटी आहेत. त्या त्रुटी जर दुर झाल्या असत्यातर शंभर टक्के याचा सगळयांना बेनिफीट झाला असता. त्यांनी अजून एक मुद्दा मांडला की प्राधिकरणाच्या ऍक्वीझेशन मधली जी काही मोठी क्षेत्र होती ती वगळण्यात आली. तसच जर केल असतंतर हे क्षेत्र जर प्राधिकरणातून वगळण्यात गेल असतंतर, आपल्या महापालिकेच्या अंडर ते घेतल्या गेलं असतंतर ते अधिक सोईच आणि सोप झाल असतं आपल्याला अधिकृत करण्यासाठी. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दुसरी एक बाजु अशी पण आहे आपल्याला शासनाने मागच्या काळामध्ये महापालिकेच्या हद्दीतील अनधिकृत बांधकाम नियमीत करण्याचा निर्णय घेतला. परंतु प्रत्यक्षात किती बांधकाम नियमीत झाली याच सुध्दा आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. निर्णय चांगला झाला परंतु त्याचा फायदा खरोखर किती लोकांना झाला. मला वाटत मोजून चार ते पाच बांधकाम त्या नियमातन अधिकृत झालेली आहेत. म्हणजे त्याचा लाभ जो लोकांना व्हायला पाहीजे होता तो झाला नाही. कारण असं की त्याच्यामध्ये ज्या काही त्रुटी राहील्या, जी काही पैसे भरायची अट आहे ती खुप जाचक आहे आणि लोकांना ती शक्य नाही. शास्तीकराची माफी झाली परंतु जो पुर्वीचा शास्तीकर भरायचा तो भरण्याची सुध्दा लोकांची त्याठिकाणी तयारी नाही कारण की लोकांची ती आर्थीक परिस्थिती आज नाही. आज आपण पाहतो संपुर्ण देशामध्ये मंदीची लाट

,

आहे आणि आपल शहर ही कामगारांची नगरी आहे. आणि आपल्या येथील कामगारांच्या नौक-या जातात. त्याला खायची मारामार आहे. अशा परिस्थितीमध्ये त्याला हे जे पैसे भरायला लागणार आहेत ते निश्चितपणे भरता येणार नाहीत त्यामुळ याच्यामध्ये ज्या त्रुटी राहील्या आहेत त्या त्रुटी दुर केल्या पाहीजेत. कारण २०११ पर्यंतचा निर्णय तो जर आतापर्यंत घेतलातर त्याचा सगळयांना फायदा होईल. ते करत असताना सगळयांना आर्थिक बोजा पेलावला पाहीजे अशाप्रकारचा निर्णय होणं अपेक्षीत आहे. आणि त्या प्रमाणे आपण तो निर्णय घ्यावा. आम्ही विरोधात जरी असलोतरी या चांगल्या निर्णयाच्या पाठीशी शंभर टक्के आहोत. अस जर चांगला निर्णय होत असेलतर निश्चितपणे आमच सहकार्य तुम्हांला या कामात राहील. एकनाथजी खर म्हणजे या सभागृहामध्ये विषय मांडत असताना हा जो विषय होता याच्या अगोदर सुध्दा या सभागृहात बंद पाईपचा विषय होता परंतु त्या विषयावरती अनेक नगरसेवकांना बोलायच होतं. परंतु सचिन चिंचवडे साहेब याठिकाणी पिठासिन प्राधिकारी म्हणून बसले होते त्यांनी घाईघाईमध्ये तो विषय मंजूर केला. पाण्याचा प्रश्न सगळयांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. आपल्या शहरामध्ये पाण्याचा तूटवडा जाणवतो. या परिस्थितीमध्ये जर आपली मत मांडली आणि त्याच्यातूनच काही चांगल्या सूचना आल्यातर निश्चितपणे आपल्या येथे नागरीकांना चांगल आणि मुबलक पाणी मिळेल. त्यामुळ प्रत्येक विषयावर बोलत असताना एकनाथराव आणि महापौर साहेब आपल्याला आमची विनंती आहे की तुम्ही सगळया विषयावरती सदस्यांना बोलू दयात. त्याच्यातून निश्चितपणे चांगल काहीतरी पुढे येईल आणि शहराचा फायदाच होईल. दुसरा उपसूचनेचा विषय या ठिकाणी आमच्या समोर आला. खर म्हणजे ती उपसूचना घाईघाईत वाचली. आम्हांला कुणालाही ती उपसूचना कळली नाही. मुळात या ज्या प्रथा आहेत त्या चुकीच्या आहेत. मोरे सरांच्या नावान नाटयगृह आहे त्याठिकाणी जर अचानक कोणी नाव बदलण्याचा ठराव आणलातर आणि अशा पध्दतीने उपसूचना वाचलीतर तो ठराव मंजूर झाला तर ते चुकीच होईल. त्या त्या काळामध्ये या लोकांनी या शहरासाठी योगदान दिलेलं आहे, देशासाठी योगदान दिलं आहे. ज्यांच्या जमिनी या विकास कामासाठी गेलेल्या आहेत त्यां लोकांची नाव दिलेली आहेत. आजजर तुम्ही अचानकपणे असा काही निर्णय घेत असालतर, मला माहिती नाही उपसूचनेमध्ये नेमक काय होतं. परंतु उपसूचना अशा पध्दतीची वाचत असताना ती जर प्रॉपर वाचली गेलीतर, सगळया सदस्यांना जर ती उपसूचना कळालीतर निश्चितपणे त्याच्यातून काहीतरी चांगल निर्माण होईल. मगाशी आयुक्त साहेबांना आम्ही विचारल, साहेब

'

म्हणाले सभागृहात अशाप्रकारची उपसूचना दिली गेली आणि सभागृहाने मंजूर केलीतर आम्हांला त्याची अंमलबजावणी करावी लागते. याच्यातून एक वेगळया प्रकारच वादळ निर्माण होऊ शकतं. या परिस्थितीच भान ठेवून आमच्या प्रभागामध्ये, प्रत्येक प्रभागामध्ये अशाप्रकारचे विषय येतात. मागे ई प्रभागामध्ये अशाप्रकारचा एक विषय आला होता. त्याहीठिकाणी विरोध झाला. नाव देणा-याच त्याचा वैयक्तिक स्वार्थ त्याच्यामध्ये नसतो. तरी मा.महापौर साहेब, पक्षनेते तुम्ही सगळया गटनेत्यांना विश्वासात घ्या आणि याच्यासाठी एखादी समिती स्थापन करा. नवीन नाव दयायच असेल किंवा जुन नाव बदलायच असेलतर त्याच्यामाग एक धोरण निश्चित असलं पाहीजे आणि त्या धोरणातनच काम झाल पाहीजे. अन्यत: प्रभागामधल्या बैठकामध्ये जे वाद होतात ते वाद पुढच्या काळामध्ये अनेक होतील आणि सभागृहामध्ये जर तुम्ही असा पायंडा पाडलातर याला चुकीच वळण लागेल. तरी माझी आपल्याला नंम्र विनंती आहे की, या चुकीच्या प्रथा तुम्ही पाडू नका. पक्षनेते याच्यावरती आपण गंभीर्याने विचार करावा आणि ती जी उपसूचना वाचली गेली होती ती पुन्हा एकदा सभागृहासमोर पुन्हा एकदा नीटपणे वाचण्यात यावी जेणेकरुन सभागृहाला कळेल आणि त्याच्यावरती योग्य तो निर्णय होईल अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर –** या विषया संदर्भात भाऊसाहेबांनी सांगीतल्याप्रमाणे गटनेते, विरोधी पक्षनेते या सर्वजणांची मिटींग होईल, विषय क्रमांक १ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ४४० विषय क्रमांक – १
दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.राजेंद्र गावडे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५०२९ दि.१२/७/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकरिता खाली नमूद केले प्रमाणे तरतूद उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

,

| अ क्र | कामाचे नाव | पान क्र. | अक्र | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकिय रक्कम | सन २०१९-२० ची तरतूद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकातील संक्षिप्त गोषवारा मधील अखेरची शिल्लक र.रू. | १ | | सन २०१९-२० मधील संक्षिप्त गोषवारा अखेरची शिल्लक | | ३०,२४,१२,६००/- (सन २०१९-२० ची अखेरची शिल्लक) | | २,००,००,०००/- |
| २ | विद्यार्थी शालेय खेळणी | ३०६ ३०७ | ५७ | विद्यर्थी शालेय खेळणी | | २,५०,००,०००/- | २,००,००,०००/- | |
| | एकूण | | | | | | २,००,००,०००/- | २,००,००,०००/- |

तरी वरील प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच ड प्रभाग मधील मनपाच्या सन २०१९-२०२० च्या नविन अंदाजपत्रकात नागरिकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने विशेष योजना या लेखाशिर्षातील कामांची प्रशासकीय मान्यता व तरतूद अंत्यत कमी असल्याने प्रभागातील विशेष योजनेतील कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे खालील समावेश केलेल्या कामांची सन २०१९-२०२० मध्ये खर्च होणारी आवश्यक तरतूद वाढवुन देणेस तसेच अंदाजपत्रकातील रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखा शिर्ष | अंदाजपत्रक | | मुळ प्रशासकीय मान्यता | सुधारित प्रशा. मान्यता | सन २०१९-२०२० ची मुळ तरतुद | वाढ | घट | सन २०१९-२०२० साठी लागणारी आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पा क्रं. | अनु. क्रं. | | | | | | | |
| १ | प्रभाग क्र.२५ ताथवडे येथील शनि मंदीराकडून मारूंजी गावाकडे | विशेष योजना | ३५ | २०७ | २०००००००० | ३०००००००० | १००००० | १००००००० | ० | १०१००००० | |

,

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जाणारा ३०.०० मी. रूंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | | | | | | | | | |
| २ | भूसंपादन निधी | विशेष योजना | 4 व 5 | ११ | ० | ० | १४०००००००० | ० | १००००००० | १३९००००००० | |
| | एकूण | | | | २००००००००० | ३०००००००० | १४००१००००० | १०००००००० | १००००००० | १४००१००००० | |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१९-२०२० च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता व सुधारीत तरतुद करुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | सन २०१९-२० मधील तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १२, त्रिवेणीनगर चौक ते तळवडे चौक मुख्य रस्त्याचे फुटपाथ व डांबरीकरण करणे. | ३१ | १२० | ९००,००० | २०,०००,००० | ० | २०९००००० |
| २ | भूसंपादन निधी | ४ व ५ | ११ | १,४००,०००,००० | | २०,०००,००० | १३८०००००००० |
| | एकूण | | | १४००९००००० | २०००००००० | २०००००००० | १४००९००००० |

,

एकूण र.रु.२,००,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन कोटी फक्त) इतके वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपाचे बापुजीबुवानगर येथील दिलीप वेंगसकर अकॅडमीचे पॅव्हेलियनची उर्वरित विद्युत विषयक कामे करणेसाठी खालीलप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पा. क्र. | आ. . | लेखाशिर्षक | अंदाजपत्रकीय रक्कम | २०१९-२० ची तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकातील संक्षिप्त गोषवारा मधील अखेरची शिल्लक र.रु | १ | | सन २०१९-२० मधील संक्षिप्त गोषवारा अखेरची शिल्लक | | ३०२४१२६०० (सन २०१९-२०ची अखेरची शिल्लक) | | २००००००० |
| २ | विद्यार्थी साहित्य खेळणी | ३०६ ३०७ | ५७ | विद्यार्थी शालेय खेळणी | | २५०००००० | ७५००००० | ० |
| ३ | मनपाचे बापुजीबुवानगर येथील दिलीप वेंगसकर अकॅडमीचे पॅव्हेलियनची उर्वरित विद्युत विषयक कामे करणे | नविन | नविन | विद्युत | १६०००००० | ० | १२५००००० | ० |
| | एकुण | | | | | | २०००००००० | २०००००००० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील नावामध्ये खालील प्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

,

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील अनु.क्र/ पान क्र. | लेखाशिर्ष | सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील नाव | सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील बदल करावयाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ६२/१२७ | विशेष योजना | प्रभाग क्र.९ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते नेहरूनगर हॉकी स्टेडीयम चौकापर्यंतच्या रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण करून रस्ता विकसीत करणे | प्रभाग क्र.९ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते नेहरूनगर हॉकी स्टेडीयम चौकापर्यंतच्या रस्त्याचे व ठिकठिकाणी खराब झालेल्या भागाचे डांबरीकरण करणे . |
| २ | १४/१२ | विशेष योजना | कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम पी. पी. पी. तत्वावर विकसित करणे. | कै. अण्णासाहेब मगर स्टेडीयम पी.पी.पी.तत्वावर विकसित करणे या कामा अंतर्गत प्रभाग क्र. ९ मधील कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयमची धोकादायक इमारत पाडणे. |
| ३ | ३११/३६ | सार्वजनिक सुरक्षितता (कप्रभाग) | क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत खराळवाडी येथे विविध चौकात सी.सी.टि.व्हि.यंत्रणा बसविणे. | प्रभाग क्र. ९ मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टि.व्हि.यंत्रणा बसविणे. |

तरी सदर कामांच्या नावामध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख मध्ये नागरी वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने खालील नमुद केलेली विकास कामे करणे गरजेची आहेत. त्यामुळे खालील नमुद केलेल्या विकास कामांचा समावेश सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकात “विशेष योजना” या लेखाशिर्षकात नव्याने समावेश करुन आवश्यक तरतुद मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

,

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक तरतुद रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख येथील आरक्षण क्र. ३८८ व क्र. ३८९ “दुकान केंद्र” विकसित करणे. | ७००००००० | १००००००० |
| २ | प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख येथील आरक्षण क्र. ३८० “ भाजी मंडई व दुकान केंद्र” विकसित करणे. | ८००००००० | १००००००० |
| | एकुण | १५००००००० | २००००००० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, महापालिका सभा ठराव क्र. ४२२ अन्वये खाली नमुद केलेल्या कामांचा नव्याने समावेश करणेत आलेला असून सदर कामाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | ठराव क्र. ४२२ अन्वये अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत प्रशासकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ८ येथील संत नगर चौक येथे अंडरपास बनविणे | १२००००००० | २०००००००० | |
| २ | प्रभाग क्र. ८ येथील स्पाईन सिटी चौक येथे अंडरपास बनविणे | १२००००००० | २०००००००० | |
| ३ | प्रभाग क्र. २ चिखली जाधववाडी मधील आरक्षण क्र. १/१३७ विकसीत करणे. | ४००००००० | १०००००००० | |
| ४ | मुंबई – बेंगलोर द्रुतगती महामार्गालगत व पिंपरी | ९८००००००० | १३००००००००० | |

,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | चिंचवड मनपा हद्दीतील १२.०० मी रुंद सेवा रस्ता विकसित करणे व अनुषंगिक कामे करणे | | | |

तरी वरील प्रमाणे कामा समोर नमुद सुधारीत प्रशासकीय रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच स्थापत्य ई प्रभागाकडील सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात खालील कामाकरिता उपलब्ध असलेली तरतूद अपुरी आहे. सदर काम पूर्ण करणे साठी पुरेशी तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे वाढ/घट करून तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र.अ.क्र. | सन २०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र. रु | वाढ.र.रु | सन २०१९-२० चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे आळंदी रस्ता ते दाभाडे वस्ती ४५ मी.डी. पी. रस्ता विकसित करणे. | विशेष योजना | | | | | |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५००००००० | ६०००००० | | |

तसेच स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात खालील कामाकरिता उपलब्ध असलेली तरतूद अपुरी आहे. सदर काम पूर्ण करणे साठी पुरेशी तरतूद उपलब्ध करणे आवश्यक असल्यान वाढ/घट करून तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

,

| अ क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | सन २०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र.रु | वाढ र.रु | सन २०१९-२० चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टेल्को रस्त्यावरील यशवंतनगर चौक ते नाशिक हायवे पर्यंतच्या रस्त्याचे डाबंरीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | विशेष योजना | ४४/८० | ५०००००० | - | ५०००००० | ५५०००००० |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५०००००० | ५०००००० | - | - |

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु काम करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन तरतुद वर्गीकरणास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करावीत व कामास प्रशासकीय मान्यता मिळणेस व आवश्यक तरतुदीस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अनु. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१९-२० तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०१९-२० एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ मोशी येथील गट क्र. ६९१,६९२,६९३ येथील नाला बंदिस्त करुन रस्ता विकसित करणे | | | २००००००० | ० | १०००००० | ० | १०००००० |
| २ | महापौर विकास निधी | ५० | १८ | ० | ५०००००० | ० | १०००००० | ४०००००० |
| | एकुण | | | २००००००० | ५०००००० | १०००००० | १०००००० | ५०००००० |

,

तसेच स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील सन २०१९-२० च्या अंदाजपत्राकामध्ये अपुरी तरतूद असलेल्या कामाकरिता वाढ/घट करुन तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र.अ.क्र. | सन २०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र.रु | वाढ र.रु | सन २०१९-२० चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी-किवळे रस्त्यावर बीआरटीएस बस स्टेशन जवळील बस डॉकीच्या जागेचे मजबूतीकरण करणे. | विशेष योजना | ४३/५६ | १००००००० | - | ४०००००० | १४०००००० |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५०००००००० | ४०००००० | - | |
| ३ | प्रभाग क्र .४ कृष्णानगर येथे शरदनगर शिवाजीपार्क ला जोडणारा स्पाईन रस्त्यावर पादचारी भुयारी मार्ग बांधणे | विशेष योजना | १४७/ | ५०००००० | ० | १०००००००० | १५०००००० |
| ४ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५०००००००० | १०००००००० | ० | |
| | **एकुण** | | | | १४०००००० | १४०००००० | |

तसेच सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामाचा विशेष योजने अंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. उपरोक्त विषयास अनुसरुन प्रभाग क्र. १० मध्ये

,

सुविधा भुखंड पिंपरी येथील स.नं. ३६/१० सि.स.नं. ५८४२ विकसित करणे या कामाचा चालु आर्थिक अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत यत आहे. सदर भुखंड विकसित केल्याने नागरिकांची होणारी गैरसोय टाळणे शक्य होईल. सदरील प्रकल्पांतर्गत ओपीडी व व्यायामशाळा विकसित करणेचे मानस आहे. सद्यस्थितीत मोरवाडी भागात मनपाचे ओपीडी व व्यायामशाळा अस्तित्वात नाही. सबब खालील प्रमाणे नविन कामाचा अंदाजपत्रकात समावेशास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र. १० मध्ये सुविधा भुखंड पिंपरी येथील स.नं. ३६/१० सि.स.नं. ५८४२ विकसित करणे | ५,००,००,०००/- |

तसेच सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात नवीन कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र. २० मध्ये एच.ए मैदानासमोर महापालिकेची मोकळी जागा आहे. सदर जागेवर ब-याच वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा उभारणेची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. सदरचा चौक हा रहदारीचा व वर्दळीचा असल्याने त्या ठिकाणी शिवाजी महाराजांचा पुतळा करून चौकातील मोकळ्या जागेत शिवसृष्टी उभारून चौक सुशोभित करणेस मान्यता देणेत येत आहे. जेणेकरून सदर ठिकाणी लागणारे अनधिकृत फलक लागणे बंद होऊन नागरिकांना सदर चौक वावरण्या योग्य होईल सबब खालील प्रमाणे नविन कामाचा अंदाजपत्रकात समावेशास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र.२० येथील महेशनगर चौकात मनपाच्या जागेत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व इतर आवश्यक कामे करणे. | ८,००,००,०००/- |

,

तसेच २०१८-१९ चे सुधारीत २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकात खालील कामासाठी प्रशासकीय मान्यतेची रक्कम वाढवुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे. ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागामधील खालील नमुद कामासाठी सन २०१८-१९ च्या सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये अंदाजपत्रकीय रक्कम कमी असुन सदरच्या रक्कमेमध्ये वाढ करुन प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सबब खालील नमुद कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्षक | पान क्र. | अनु. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १८ मधील मोरया हॉस्पिटल ते यशोपुरम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसित करणे. | विशेष योजना | ४९ | ३७ | ३००००००० | २०००००००० | |
| २ | सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरुस्ती (स्वच्छ भारत अभियान) | सच्छ भारत अभियान | ५१३ | १७-३ | ० | ७५०००००० | |
| | | | | | ३००००००० | २७५०००००० | |

तरी वरील नमुद कामासाठी सन २०१८-१९ च्या सुधारीत व २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच खालिल नमुद प्रमाणे नवीन कामांसाठी सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षात अंतर्गत कामे करण्यासाठी प्रशासकिय मान्यता वाढ करणे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे सदर कामात वाढ करुन प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

,

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राधिकरण भागातील नाल्यांचे सुशोभिकरण करणे. | २६ | ८ | विशेष योजना | १०००००० | ५०००००० | |
| एकुण | | | | | | ५०००००० | |

तसेच सन २०१९ - २० च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामाचा विशेष योजने अंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्र.क्र. १५ अंतर्गत निगडी प्राधिकरण से.क्र. २३, २४, २५, २६, २७, २७अ, २८, निगडी गावठाण व आकुर्डी गावठाण या भागांचा समवेश होतो. सदर भागामध्ये नागरिकांच्या सोयीसाठी खालील आवश्यक कामे करणे अत्यंत गरजेचे आहे.

सबब खालील प्रमाणे नवीन कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (कोटी) |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १५ मधील बेलेश्वर मंदिर ते रेल्वे लाईन पर्यंतच्या नाल्याची खोली वाढविणे व अनुषंगिक कामे करणे. | ५००००००० |
| २ | प्रभाग क्र. १५ मधील अग्रसेन महाराज पुतळा असलेल्या परिसराचे सुशोभिकरण व अनुषंगिक कामे करणे. | २००००००० |
| ३ | प्रभाग क्र. १५ मधील से.क्र. २४ येथील अंतर्गत रस्त्यांची उंची कमी करून मजबुतीकरण करणे. | १५००००००० |
| ४ | प्रभाग क्र. १५ मधील संजय काळे मैदान येथील जागेवर जेष्ठासाठी विरंगुळा केंद्र बांधणे. | २००००००० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, महापालिका सभा ठराव क्र. 309 दि. 31/10/2018 अन्वये प्रभाग क्र. 2 पुणे नाशिक महामार्ग ते ग.क्र. १०६२ पर्यंतचा १८ मी.

,

DP रस्ता विकसीत करणे या कामास र.रू. १५ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात पान क्र. २९ अनु.क्र. ६५ वर या कामास रक्कम रूपये १,५०,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता आहे. परंतू सदरच्या कामाची दि. 31/10/2018 अन्वये मान्यता मिळाले प्रमाणे निविदा काढणेत आलेली आहे. तरी या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 15,00,00,000/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्रं. | सन 2019-20 च्या अंदाजपतत्रकानुसार प्रशासकिय मान्यता | आवश्यक वाढ असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. 2 पुणे नाशिक महामार्ग ते ग.क्र. १०६२ पर्यंतचा १८ मी. DP रस्ता विकसीत करणे | २९ | ६५ | 15,000,000 | 150,000,000 | |

तरी वरील प्रमाणे कामा समोर नमुद केलेल्या आवश्यक वाढ असणारी अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन 2019-20 चे अंदाजपत्रकात पान क्र. ३४ अ.क्र. १८० नुसार प्रभाग क्र. २ चिखली मधील आरक्षण क्र. १/१२८ येथे नाट्यगृह बांधणे या कामाचा समावेश आहे. या कामाचे नावामध्ये खालील प्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्रं. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. 2 चिखली जाधववाडी येथे आरक्षण क्र. १/१२८ मध्ये टाऊन हॉल (Town Hall) बांधणे. | ३४ | १८० | 500,000,000 |

,

तसेच स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील सन २०१९-२० च्या अंदाजपत्राकामध्ये अपुरी तरतुद असलेल्या कामाकरिता वाढ/घट करुन तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | सन २०१९-२० ची तरतूद र.रु. | घट र.रु | वाढ र.रु | सन २०१९-२० चा सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डांगे चौकापासून ते मुकाई चौकापर्यंत बी.आर.टी.एस. मार्गावरील मध्ये विविध सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेले चर बुजविणे फुटपाथची दुरुस्ती करणे. | विशेष योजना | ५९४/६ | १३०००००० | - | ५०००००० | १८०००००० |
| २ | | महापौर विकास निधी | ५०/१८ | ५००००००० | ५०००००० | - | |
| | एकुण | | | ६३०००००० | ५०००००० | ५०००००० | |

तसेच सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात नवीन कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर मधील महेशनगर चौक ते एस.टी.स्टँड पर्यतचा रस्ता सध्या डांबरी असून सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर (heavy) वाहतूक सुरू असते. त्यामुळे सदर रस्त्याचे अद्यावत पध्दतीने करणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र.२० मधील महेशनगर चौक ते वल्लभनगर एस.टी.स्टँड पर्यंतच्या रस्त्याचे अदयावत पध्दतीने विकसित करणेच्या कामाचा समावेश अंदाजपत्रकात करणेस मान्यता देणेत येत आहे.

,

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | अंदाजपत्रकीय र. रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर मधील महेशनगरचौक ते एस.टी.स्टँड पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | नविन काम | | २०००००००० |

तसेच सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात नवीन कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र. २५ मधील प्रमुख जिल्हा मार्ग ३१ रस्त्यावरील भूमकर चौक येथे सब वे / उड्डाणपूल बांधणे या कामाचा नव्याने समावेश अंदाजपत्रकात करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | अंदाजपत्रकीय र. रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | UF | प्रभाग क्र. २५ मधील प्रमुख जिल्हा मार्ग ३१ रस्त्यावरील भूमकर चौक येथे सब वे/ उड्डाणपूल बांधणे | नविन काम | | १००००००००० |

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु काम करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणे तरतुद वर्गीकरण करणे व प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. खालिल नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन व आवश्यक तरतुदीस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

,

| अ.क्रं. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्रं. | लेखाशिर्ष | सन 2019-20 ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन 19-20 साठी एकूण आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. २५ मधील प्रमुख जिल्हा मार्ग ३१ रस्त्यावरील भूमकर चौक येथे सब वे / उड्डाणपूल बांधणे | | | UTF | 0 | २००००००० | - | ० | |
| २ | प्रजिमा ३१ या रस्त्यावर भुमकर चौकाजवळ वाय जक्शंन येथे सब वे बांधणे | ५०६ | २१ | UTF | ३००००००० | | २००००००० | | |

तसेच खालीलप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ | सुधारित |
| १ | मनपा हद्दीबाहेरील खडकी कॅन्टोन्मेंट क्षेत्रात बोपखेल गावासाठी पोहोच रस्ता बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | स्थापत्य विशेष योजना | ४७/१३७ | १२.०० कोटी | १८.०० कोटी |
| | एकुण | | | | |

तसेच सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामाचा विशेष योजने अंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र. १० मध्ये शाहुनगर हा दाट

,

लोकवस्तीचा भाग असुन या ठिकणी बरेचसे नागरीक बाहेरुन स्थायिक झाले आहेत. सदरचा भाग कारखाना कामगार वसाहत म्हणुन सुध्दा ओळखले जाते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळकडून सदरील भाग विकसित करणेत आला आहे. पिंपरी चिंचवड ही कामगाराची व कष्टकरयांची नगरी म्हणुन ओळखीले जाते.

त्यामध्ये शाहुनगर वसाहत ही मोलाची ठरते. शाहुनगर वसाहतीची भव्य स्वागत कमान मनपामार्फत उभारलेस शहराच्या लौकिकात भर पडणेस मदत होईल तरी खालील प्रमाणे नविन कामाचा अंदाजपत्रकात समावेशास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १. | विशेष योजना | प्रभाग क्र. १० मध्ये शाहुनगर येथे स्वागत कमान उभारणे. | ५,००,००,०००/- |

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.ज्ञानदेव थोरात-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४४१ विषय क्रमांक – २

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/११/मोशी/२०६/२०१९ दि.१७/०७/२०१९
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.७ दि.२४/७/२०१९

मौजे मोशी, ता. हवेली येथील गट नं ६४६ पै (जुना गट नं ६४९ पै) मधील ५ एकर गायरान क्षेत्र मुस्लिम दफनभूमीसाठी आरक्षीत ठेवणेचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांना पत्र क्र नरवि/कावि/३क/१४०/२०१०, दि.०१/१२/२०१० अन्वये सादर करणेत आला होता. मा.जिल्हाधिकारी, महसुल शाखा, पुणे यांनी त्यांचेकडील

,

पत्र क्र पमह-१/कावि/६०३/२०१९, दि.०५/०३/२०१९ अन्वये मौजे मोशी, ता.हवेली येथील ग.नं. ६४६ (जुना ग.नं. ६४९) मधील ५ एकर क्षेत्र मुस्लिम दफनभूमीसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेस कब्जेहक्काने मंजुर करणेबाबत शासन ज्ञापनाव्दारे मंजूरी दिली असून सदर जागेचे मुल्यांकन रक्कम रूपये ८,३४,०१,५००/- शासन जमा करणेबाबत कळविले आहे. मौजे मोशी भागामध्ये मुस्लिम दफनभूमि नसल्यामुळे स्थानिक नागरिकांमार्फत दफनभूमिसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत वारंवार मागणी होत आहे. नागरिकांच्या मागणीचा विचार करता, सदर बाब तातडीची असल्याने मौजे मोशी, ता. हवेली येथील गट नं ६४६ पै (जुना गट नं ६४९ पै) मधील ५ एकर क्षेत्र मुस्लिम दफनभूमिसाठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मा. महापालिका सभेची मान्यता घेऊन शासनाकडे मान्यतेकामी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावातील निवासी विभागातील जागा सार्वजनिक उपयोगासाठी दफनभूमीसाठी आरक्षित करणेच्या शासनाच्या मान्यतेनंतर विनामोबदला आरक्षणाची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेणे उचित होईल व महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे होईल असे इकडील विभागाचे मत आहे. तरी, मौजे मोशी, ता. हवेली येथील गट नं ६४६ पै (जुना गट नं ६४९पै) मधील निवासी विभागातील शासनाच्या ताब्यातील ५ एकर क्षेत्र मुस्लिम दफनभूमिसाठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मा. महापालिका सभेची मान्यता घेऊन, फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राजेंद्र लांडगे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

,

विषय क्रमांक – ३

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र

क्र.नरवि/कावि/९/११७/२०१९ दि.१८/०७/२०१९

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.८ दि.२४/७/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस - १८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०७।नवि-१३, दि. ९ जुलै २००८, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०९।१९८५/प्र.क्र. १८९३।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२।१६०।प्र.क्र.५८।१२/पुर्नबांधणी क्र.२७।१२/ई.पी.- मंजूरी/नवि-१३ दि. ०२।०३।२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेमध्ये मौजे वाकड ता. मुळशी येथील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै. मधील आ.क्र.४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो हे आरक्षण प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे वाकड मधील स.नं.१११ पै.,११२ पै., १२२ पै. मधील आ.क्र.४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो चे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. सदर आरक्षणाचे एकूण जागेपैकी ६००० चौ.मी. (६० गुंठे) जागा टी.डी.आर.चे मोबदल्यात मनपाच्या ताब्यात आलेली आहे. उर्वरीत जागा लवकरात लवकर मनपाचे ताब्यात घेणेकरीता मौजे वाकड मधील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै. मधील आ. क्र. ४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो या आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त मौजे वाकड मधील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै.मधील आ. क्र. ४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो या आरक्षणाखालील जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाखालील जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई

मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम– २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, पुढीलप्रमाणे मी उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये प्रभाग क्र. १८ मधील चिंचवडगाव येथे मनपा मार्फत विकास आराखड्यातील ९ मी. ते १८ मी. पर्यंत रुंदीचे रस्ते विकसित करणेचे काम हाती घेणेत आली आहेत. सदर रस्त्याने बाधीत जागा अद्यापी पुर्णतः मनपाचे ताब्यात आली नसल्याने रस्ते विकसित करणेकामी अडथळा येत आहे.

चिंचवडगाव येथील ९ मी. ते १८ मी. रुंदीच्या डी.पी. रस्त्यांचे प्रयोजनाने बाधीत जागा भूसंपादीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार रस्त्याची आवश्यक्ता व निकड लक्षात घेता रस्त्याने बाधीत जागा भूसंपादनाने ताब्यात घेणेबाबत मा. उपसंचालक नगररचना यांचेमार्फत कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. सदरचे भूसंपादन कार्यवाही सुरु करणेस मान्यता देणेत यावी.

त्यानुसार प्रभाग क्र. १८ मधील डी.पी. रस्ते विकसित करणेकामी रस्त्याने बाधीत जागा भूसंपादनाने ताब्यात घेणेस मान्यता देणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शहरीकरण व त्याअनुषंगाने वाढणा-या लोकसंख्येचा विचार करता मौजे कासारवाडी येथील रस्ते रूंदीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. मौजे कासारवाडी येथील भागात ४.०० मी पेक्षा रस्त्यांची रूंदी कमी असल्यामुळे सदर भागात आगीमुळे अपघात झाल्यास आग विझवण्यास अग्निशामक बंब पोहचणे शक्य होत नाही. तसेच कमी रूंदीच्या रस्त्यामुळे शाळेच्या बसेस पोहचणे शक्य होत नाही. तसेच कमी रूंदीच्या रस्त्यामुळे हॉस्पिटलची अँम्ब्युलन्स पोहचणे शक्य होत नाही. सदरबाबत जागा संपादनासाठी नगररचना विभागामार्फत कॅम्प लावणेत आला होता परंतू जागा मालकांनी प्रतीसाद दिला नाही. त्यामुळे मौजे कासारवाडी येथील अंतर्गत खालीलप्रमाणे मंजूर विकास आराखड्यामधील रस्त्यांची रूंदी वाढविणेसाठी जागा संपादन भूसंपादन कायद्यान्वये करणे आवश्यक असल्याने मान्यात देणेत यावी.

१. मौजे भोसरी (कासारवाडी) मनपा शाळा ते पार्श्वनाथ सोसायटी ते नाशिक फाटा १२.०० मी रूंद रस्ता

'

२. मौजे भोसरी(कासारवाडी)येथील ७.५० मी ,६.० मी व आ.क्र.१६ लगतचा ९.०० मी.रूंद रस्ता

३. मौजे भोसरी(कासारवाडी) मुंबई-पुणे रस्त्याने मनपा.शाळेकडे जाणारा ७.५० मी रस्ता व आ.क्र. १५ उद्यान यास ५.० मी रूंद पोहच रस्ता

४. मौजे कासारवाडी येथील स.नं.४१४,४१५ ते ४२० पर्यंत मुंबई –पुणे रस्त्यापर्यंतचा सी.एम.ई. हद्दीलगतचा ९.०० मी रूंद रस्ता

सदर वरील रस्त्यांच्या जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर भूसंपादनचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी.

तरी प्रस्तूत जमीनींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेच्या सदर वरील रस्त्यांच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

तसेच मौजे बो-हाडेवाडी येथील मंजूर विकास योजनेतील ग.नं.१०८७ पै ते ग.नं.९९८ पै मधील १८ मी रस्त्याचे प्रयोजनाखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस व सदर भूसंपादनास येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर सहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता–

,

ठराव क्रमांक -४४२ विषय क्रमांक – ३

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/९/११७/२०१९ दि.१८/०७/२०१९
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.८ दि.२४/७/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस - १८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०७।नवि-१३, दि. ९ जुलै २००८, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०९।१९८५/प्र.क्र. १८९३।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२।१६०।प्र.क्र.५८।१२/पुर्नबांधणी क्र.२७।१२/ई.पी.-मंजूरी/नवि-१३दि. ०२।०३।२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेमध्ये मौजे वाकड ता. मुळशी येथील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै. मधील आ.क्र.४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो हे आरक्षण प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे वाकड मधील स.नं.१११ पै.,११२ पै., १२२ पै. मधील आ.क्र.४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो चे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. सदर आरक्षणाचे एकूण जागेपैकी ६००० चौ.मी. (६० गुंठे) जागा टी.डी.आर.चे मोबदल्यात मनपाच्या ताब्यात आलेली आहे. उर्वरीत जागा लवकरात लवकर मनपाचे ताब्यात घेणेकरीता मौजे वाकड मधील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै. मधील आ. क्र. ४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो या आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त मौजे वाकड मधील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै.मधील आ. क्र. ४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो या आरक्षणाखालील जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाखालील जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम– २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड

,

महानगरपालिकेमध्ये प्रभाग क्र. १८ मधील चिंचवडगाव येथे मनपा मार्फत विकास आराखड्यातील ९ मी. ते १८ मी. पर्यंत रुंदीचे रस्ते विकसित करणेचे काम हाती घेणेत आली आहेत. सदर रस्त्याने बाधीत जागा अद्यापी पुर्णतः मनपाचे ताब्यात आली नसल्याने रस्ते विकसित करणेकामी अडथळा येत आहे.

चिंचवडगाव येथील ९ मी. ते १८ मी. रुंदीच्या डी.पी. रस्त्यांचे प्रयोजनाने बाधीत जागा भूसंपादीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार रस्त्याची आवश्यकता व निकड लक्षात घेता रस्त्याने बाधीत जागा भूसंपादनाने ताब्यात घेणेबाबत मा. उपसंचालक नगररचना यांचेमार्फत कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. सदरचे भूसंपादन कार्यवाही सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

त्यानुसार प्रभाग क्र. १८ मधील डी.पी. रस्ते विकसित करणेकामी रस्त्याने बाधीत जागा भूसंपादनाने ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शहरीकरण व त्याअनुषंगाने वाढणा-या लोकसंख्येचा विचार करता मौजे कासारवाडी येथील रस्ते रूंदीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. मौजे कासारवाडी येथील भागात ४.०० मी पेक्षा रस्त्यांची रूंदी कमी असल्यामुळे सदर भागात आगीमुळे अपघात झाल्यास आग विझवण्यास अग्निशामक बंब पोहचणे शक्य होत नाही. तसेच कमी रूंदीच्या रस्त्यामुळे शाळेच्या बसेस पोहचणे शक्य होत नाही. तसेच कमी रूंदीच्या रस्त्यामुळे हॉस्पिटलची अँम्ब्युलन्स पोहचणे शक्य होत नाही. सदरबाबत जागा संपादनासाठी नगररचना विभागामार्फत कॅम्प लावणेत आला होता परंतू जागा मालकांनी प्रतीसाद दिला नाही. त्यामुळे मौजे कासारवाडी येथील अंतर्गत खालीलप्रमाणे मंजूर विकास आराखड्यामधील रस्त्यांची रूंदी वाढविणेसाठी जागा संपादन भूसंपादन कायद्यान्वये करणे आवश्यक असल्याने मान्यात देणेत येत आहे.

१. मौजे भोसरी (कासारवाडी) मनपा शाळा ते पार्श्वनाथ सोसायटी ते नाशिक फाटा १२.०० मी रूंद रस्ता

२. मौजे भोसरी(कासारवाडी)येथील ७.५० मी, ६.० मी व आ.क्र.१६ लगतचा ९.०० मी.रूंद रस्ता

३. मौजे भोसरी(कासारवाडी) मुंबई-पुणे रस्त्याने मनपा.शाळेकडे जाणारा ७.५० मी रस्ता व आ.क्र. १५ उद्यान यास ५.० मी रूंद पोहच रस्ता

,

४. मौजे कासारवाडी येथील स.नं.४१४,४१५ ते ४२० पर्यंत मुंबई –पुणे रस्त्यापर्यंतचा सी.एम.ई. हद्दीलगतचा ९.०० मी रूंद रस्ता

सदर वरील रस्त्यांच्या जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर भूसंपादनचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रस्तूत जमीनींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेच्या सदर वरील रस्त्यांच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे बो-हाडेवाडी येथील मंजूर विकास योजनेतील ग.नं.१०८७ पै ते ग.नं.९९८ पै मधील १८ मी रस्त्याचे प्रयोजनाखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस व सदर भूसंपादनास येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.माऊली थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ४

दिनांक ७-९-२०१९ विभाग –मा.आयुक्त

संदर्भ १) मा.कैलास बारणे ,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.९ दि.२४/७/२०१९

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडुन विकास आराखडयामधील १९९७ साली त्याचे फक्त विकास आराखडा मधील नियोजन नियंत्रणाखालील क्षेत्र सुध्दा

,

महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेले आहे. त्यापैकी रावेत येथील सर्व्हे नं.२१९, २२०, २२१, २२२, २२३ तसेच सर्व्हे नं.१२३ ते १३१ या मधील जागा हया हरीत व शेती व ना.विकासामध्ये आहेत. परंतु हया जमिनी वाल्हेकरवाडी ते रावेत ३४.५० मी रुंद रस्त्याचे उत्तरेला व दक्षिणेला असणा-या जमिनी तीनही बाजुंनी निवासी व रहिवासी झोन आहे. त्यामुळे आजुबाजूस सद्यपरिस्थितीत येथील शेतक-यांना शेती करणे शक्य होत नाही. शेतक-याची मानसिकता पाहता तेथे झोपडपट्टी होऊ शकते. तरी रावेत नाल्याच्या पश्चिमेकडील व पवना नदीच्या पुर क्षेत्राच्या (ब्ल्यु-लाईन) बाहेरील मौजे रावेत येथील सर्व्हे क्र.१२३ ते १३१ पैकी तसेच सर्व्हे नं.२१९ ते २२३ शेती ना विकास विभाग व हरित विभागातील जागांचा वापर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन रहिवास विभागात समाविष्ट करणेस व आवश्यक ती सर्व कार्यवाही (फेरबदलाची कार्यवाही) करुन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, मा.महापौर साहेब, या सभागृहाचे सिनियर नगरसदस्य आदरणीय भाऊसाहेब यांनी एक विषय याठिकाणी मांडला आणि ख-या अर्थानं मला असं वाटत की, त्यांनी थोडसं जरी अभ्यासपूर्ण बोलले असते तर बरं झालं असत त्या संदर्भामध्ये भारतीय जनता पार्टी केंद्रामध्ये, राज्यामध्ये किंवा या महापालिकेमध्ये काम करीत आहे आणि त्या संदर्भामध्ये सर्वसामान्यांना डोळयासमोर ठेवुन कामे केली जात आहेत आणि जसं बाहेर राज्यामध्ये बोललं जातय,केंद्रामध्ये बोललं जातय याठिकाणी ज्या पक्षाचे सदस्य आहेत त्यामुळे त्यांनाही बोलणं उचित आहे.त्याअनुषंगाने त्यांनी याठिकाणी भाष्य केललं आहे त्यासंदर्भामध्ये मी याठिकाणी बोलतोय. खरं म्हणजे आदरणीय महापौर साहेब ज्यावेळेस शास्तीकर लावला गेला त्यावेळेला तर आम्ही सत्तेमध्ये नव्हतो.भारतीय जनता पार्टी सत्तेवर आल्यानंतर आम्ही ६०० स्के.फुटापर्यंत, १००० स्के.फुटापर्यंत शास्तीकर माफ केलेला आहे. आणि १००१ ते २००० स्के.फुटापर्यंत .५ केला. म्हणजे ख-या अर्थाने आम्ही सर्वसामान्यासाठी काम करणारे भारतीय जनता पार्टी पक्ष आहे.

**मा.महापौर** – मा.नामदेवराव विषयाला धरुन बोलावे.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, विषयाला धरुनच बोलतोय, भाऊसाहेबांनी प्राधिकरण भूखंडाच्या शास्तीकराच्या संदर्भात त्यांनी विषय मांडला. ५०० ते १००० आणि १००१ ते १५०० स्के.फुट खरं म्हणजे या भागाचे आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप असतील,प्राधिकरणाचे

,

अध्यक्ष असतील, आदरणीय मा.मुख्यमंत्री साहेब असतील कारण ज्यावेळेस आम्ही भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता म्हणुन प्राधिकरणाच्या संदर्भात आंदोलने केली त्यावेळचे भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे मोर्चाला आले होते. आणि त्यांनी शब्द दिला होता की,आम्ही सत्तेमध्ये आल्यानंतर या विषयाला न्याय देऊ. आणि त्या संदर्भामध्ये आम्ही वेळोवेळी आम्ही मागणी केली आणि ख-या अर्थाने गोरगरीबांच्यासाठी जो ५०० स्के.फुटापर्यंतचा भूखंड आहे आजही आमच्या घराचं वर बघितलं तर तो भूखंड पूर्णपणे नवनगरविकास प्राधिकरणाच्या नावाने आजही ७/१२ दिसतो आहे. आणि मग ज्याठिकाणी आमचं सरकार ५०० स्के.फुटापर्यंत भूखंड त्यांच्या नावावर करीत असेल किंवा १००० स्के.फुटापर्यंतचा भूखंड रेडीरेकनर दराच्या १० टक्के दंड असेल, आणि १५०० स्के.फुटापर्यंतचा भूखंड २५ टक्के दंड रेडीरेकनर दरानुसार असेल आणि त्यातही एससी,एसटी,ओबीसी,आर्थीक दुर्बल घटकांना मोफत करुन देणार असेल तर मला वाटते हे जे सरकार आहे ते सर्वसामान्यांना डोळयासमोर ठेवून त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे आणि याठिकाणी कुठल्याही प्रकारच्या निवडणुका किंवा कुठल्याही प्रकारचा हे न करता निर्णय घेतलेला आहे.२००८ साली जो शास्ती कर लावला तो मिळवून दिला नसता परंतु आज जर बघितलं तर २०१९ चा जो आदेश आहे त्यामध्ये २०२२ पर्यंत सर्वांना घरे मिळावं हा जो २०१९ चा जो आदेश आहे तो आदेश याठिकाणी पारीत केलेला आहे. आणि आजही प्राधिकरणाच्या भागामध्ये राहणारे जे गरीब लोक आहेत,सर्वसामान्य कामगार वर्गातील लोक आहेत यांच्या घरावरती आजही बघीतलं तर पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचा ७/१२ वरती उल्लेख आहे. आणि ते लोक अतिक्रमण बाधीत आहेत. येणा-या काळामध्ये प्राधिकरणाच्या माध्यमातून ही घरे नियमीत होणार आहेत आणि ख-या अर्थाने ही घरे अधिकृत होणार असतील तर सर्वसामान्यांना दिलासा देणारी गोष्ट आहे मला वाटते या संदर्भामध्ये भाऊसाहेबांनी २०१९ च्या आदेश वाचला तर हे जे भूखंड आहेत ५००,१०००, आणि १५०० स्के.फुट आणि त्याच्यावर असणारे बांधकाम हे नियमीत करण्याचे काम यांच्या माध्यमातून होणार आहे. गेली अनेक वर्षापासून आपण प्राधिकरणाचे सदस्य होता आपण चांगला विषय याठिकाणी मांडलेला आहे प्राधिकरणातून हा भाग वगळणेचा विषय झाला तर तो एका अर्थाने तो भाग महानगरपालिका त्याठिकाणी विकसीत करील आणि ख-या अर्थाने त्याचा फायदा होणार आहे आणि मगाशी त्यांनी उल्लेख केला की, रोडमधील किंवा रिंगरोडच्या संदर्भामध्ये मला आठवलं की,दत्ता काका साने हे नगरसदस्य होते आणि त्यांनी शरदनगर

,

मधील रस्ता, रिंगरोड मधील बाधीत होणा-या लोकांना रस्ता बाधीत होत असताना रस्त्याच्या लगत करुन घेतला त्यावेळेस मला असं वाटतं की,सदस्य असताना भाऊसाहेबांनी सुध्दा अशा पध्दतीने त्यावेळेस काम केलं असत तर माझ्या सारख्या कार्यकर्त्याला वाटतं की, आजही तुम्ही आमच्या भागामध्ये आला नसला तरी परंतु सन्मा.भाऊसाहेब भोईरांनी महाराष्ट्र शासनाचा जो जी आर आहे तो समजुन घ्यावा आणि पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण हे महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत आहे हा विषय आपण महाराष्ट्र शासनाकडे पाठवून पाठपुरावा करणार आहोत. परंतु त्यामध्ये १०००स्के.फुट, १५०० स्के.फुटापर्यंतचे जे भूखंड आहेत अधिकृत करण्याच्या संदर्भात सभागृहाला माझ्यामते दिशाभूल करणारे वक्तव्य केलं आहे त्यासंदर्भात मी या सभागृहाला माहिती दिलेली आहे, धन्यवाद.

**मा.मंगला कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, मला वाटते की, कॉर्पोरेशनमध्ये सभा आणि सभागृह याला काही अर्थ राहीलेला नाही. आता यांनी काय वाचन केलं आहे, काय सुंदर वाचन केलं आहे आम्हांला काही कळत नाही, का कोणाला समजत नाही. याच्यासाठी वाचन केलं याठिकाणी भाऊसाहेब तर काय कालच जन्माला आले. त्यांना राजकारण काय असते हे माहितीच नाही. एक मिनिटं, मी तुम्ही बोलत असताना बोलले नाही. त्यामुळे मगाशी भाऊसाहेबांच नांव घेतलं म्हणुन तुम्हांला मगाशी सांगितलं की, भाऊसाहेबांना याठिकाणी समजत नाही, का त्यांना हे कळालं नाही म्हणुन तुम्हांला सांगते एवढं सुंदर वाचन केलं की,जे भाऊसाहेब किती वर्षापासून राजकारणात आहेत परंतु भाऊसाहेबांचा त्या राजकारणात काही उपयोग नाही मला वाटतं कालच जन्माला आले आणि आज सभागृहात आले आहेत. अभ्यास करुन येण्याची जरुरत नाही. अभ्यास करुन येणारा माणुस वाचुन दाखवत नाही. हे कोणी वाचुन दाखविलं हे स्वतः त्यांनी आत्मपरिक्षण करावं. मा.महापौर,सभा म्हणजे नेमकी काय असते. सभा नियमाप्रमाणे कशी चालवायची अहो मगाशी शिक्षण मंडळाचा विषय होता त्या विषयाच्या संदर्भात काहीही चर्चा न करता विषय मंजुर केला.त्याच्यामध्ये विषय क्रमांक १ शिक्षण मंडळाच्या विषयावर चर्चा न करता मंजुर केला विषय क्रमांक १ वरती चर्चा करण्यासाठी हात वर केला होता त्यावर तुम्ही बोलू दिले नाही. म्हणजे शिक्षण मंडळाच्या विषयावर बोलायचे नाही. ऊठ-सुठ ज्याला जसं वाटेल तसे त्यांनी सभागृहामध्ये बोलायचं अशी जर प्रथा असेल तर तसे फर्मान द्या. मग सभागृह कशाला पाहिजे.मा.महापौर,सत्तेचा वापर १०० टक्के करा पण सत्तेचा वापर करीत असताना आपण जे काम केलेलं आहे त्याच क्रेडीट घ्या. नाही तर आज माझ्या प्रोसिडींगमध्ये लिहून

,

घ्या मगाशी जो नामकरणाचा विषय झाला  त्यामध्ये कमिशनरसाहेबांनी खुलासा असा दिला की, सभेमध्ये जर असा विषय झाला तर मला त्याची कार्यवाही करावी लागेल. आताच्या या प्रोसिडींग मध्ये लिहुन घेण्यात यावं की, ज्यावेळेला हे सभागृह मंजुरी देईल त्यावेळेला त्या सभागृहामध्ये जे लोक असतील त्यावेळी सभागृहामध्ये  यांच्या कारकीर्दीत केले.आमच्या प्रभागामध्ये कैलास चांदगुडेच्या नामकरणाचा विषय आला कैलास चांदगुडेचाही मी फार मोठा आदर करते. कारण कैलासनी पुर्वी खुप सुंदर काम केलेलं आहे. तुमचे वडीलही ज्येष्ठ आहेत त्यांचाही मी आदर करते परंतु पुढच्या काळामध्ये जर आम्ही असं ठरवलं सत्ता ही घडयाळाच्या काटयाप्रमाणे फिरत असतं आज आपण सत्तेत आहात उद्या आम्ही सत्तेत असु हे कोणीही वाटता कामा नये. आणि म्हणुन आजच्या या प्रोसिडींगमध्ये कमिशनरच्या नावासह लिहुन घ्या,कमिशनरांनी असा खुलासा केला होता की, सभेमध्ये असा निर्णय झाल्यानंतर आम्हांला कार्यवाही करावी लागेल. मुळात म्हणजे त्या ठरावाच्या संदर्भात कोर्टाची २३ तारीख पडलेली आहे.२३ तारीख तो विषय  अ प्रभागामध्ये पण झालेला होता. ते शेवटी बोलले तुम्हांला तुमच्या आदरणीय वडीलांचा स्वाभिमान आहे की,नाही हे मला माहित नाही.परंतु एखादया व्यक्तींनी त्याच्या वडीलांच नांव दिलं असेल तर ते काढून शाहू महाराजांवर तर माझा स्वाभिमानचं आहे कारण मी त्या मातीची आहे मी त्या मातीत जन्माला आलेली आहे तो तसा विषय नाही त्यावेळेला सुध्दा मी तिथं अ प्रभागामध्ये त्या विषयावर आपण पडदा पाडला होता.असा विषय करण्यासाठी कोणाच्याही वडीलांचा अपमान होऊ नये उद्या नायर साहेबांच्या वडीलांच्या नावाचा कोणी  अपमान केला तर आम्हांला आवडणार नाही.कारण त्यांनी किती वर्ष खस्ता खातात,किती वर्ष काम करतात ज्या वडीलांना त्यांना जन्म दिला आहे त्यांनी त्यांच्या वडीलांच नांव एखादया वास्तुला एखादया रस्त्याला एखादी आठवण म्हणुन नांव दिलं तर त्यांच्याप्रमाणेच चालणं हे आपले  आद्यकर्तव्य आहे.तुम्ही नक्की चांगले प्रोजेक्ट तयार करा त्यांना नांव द्या आमच्या तुम्हांला शुभेच्छा आहेत पण ही कुठली पध्दत आली पहिलं नांव कॅन्सल करायचं आणि दुसरं नांव द्यायचं हे अ  प्रभागामध्ये पण झालं होतं त्याच्यावर कोर्ट मॅटर चालू आहे. आणि असं असताना सुध्दा चिंचवडेना एवढी काय घाई झाली हे मला कळत नाही.मा.महापौर तुम्ही कॅलेंडर बघुन सभा ठरवत जावा तुम्ही ग्रामीण भागातील मी खेडेगावातील आजचा दिवस कोणता,गौरी विसर्जनाचा दिवस आहे माहेरवाशीणी आज माहेरला  येतात,माहेराहून घरी जातात आजचा हा दिवस सभेसाठी का निवडला.

,

**मा.महापौर** –आचारसंहितेमुळे सभा आज घेतली आहे.

**मा.मंगला कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, म्हणुन माहेरवाशिणीला परत बोलावून घेतलं का. त्याबद्दल सुध्दा धन्यवाद. माहेरवाशिणना कळलं पाहिजे की, सभागृह चालू आहे. मा.महापौर, या सभागृहात सभेचे कामकाज अजिबात चांगल्या पध्दतीने चालत नाही.शिक्षण मंडळाच्या विषयावर दोन मिनीट सुध्दा बोलू दिलं नाही. हा विषय तुमच्या लोकांच्या तरी लक्षात येतय का कॉर्पोरेशनच्या शाळेमध्ये आपण काय केलं पाहिजे, काय नाही केलं पाहिजे. मगाशी पाणीपुरवठयाचा विषय होता त्याच्यावर बोलू दिलं नाही.मग तुम्ही जनरल बॉडी घेऊ नका. घ्या आम्ही पण देतो ठराव तुम्हाला पाहिजे तसे ठराव करुन घ्या जनरल बॉडी नको कार्पोरेशनचा पण एवढा खर्च, अधिकारी/कर्मचारी यांचा वेळ वाचेल लोकांच सगळ मानधन कॉर्पोरेशनला मिळेल. आम्ही आमच्या काळात असं नाही केलं म्हणुन महापौर साहेब, लक्षात घ्या हे असलं वागणं बरं नव्हं

**मा.महापौर** – तुमचंच शिकलोय.

**मा.मंगला कदम-** नाद खुळा करुन ठेवीन मग आमचं शिकलं ना मग नाद खुळा होईल. हे लक्षात घ्या असं वागू नका मी नाही असं शिकवलं.

**मा.महापौर** – सभागृह कसं चालवायचं ते शिकलो आहे मी.

**मा.मंगला कदम** - हा असं म्हणले पाहिजे. केशवजी असले विषय आणू नका. आपली ही कामगार नगरी आहे तुम्ही अ प्रभागात विषय दिले आम्ही काय बोललो का, तुम्ही नामकरणाचे ठराव केले आम्ही बोललो का, करा ना चांगलं असेल तर १०० टक्के करा हे काय ऊठ-सुठ नावाचे विषय आणता. कोणालाही एखादया समोरच्या माणसाने एखादया वास्तुला वडीलांचे नांव दिले असेल तर त्याचा स्वाभिमान वाटला पाहिजे. माझ्या वडीलांच नांव द्यायचं असेल तर मी नक्की चांगली संधी शोधली पाहिजे.आणि मला ते नांव देता आलं पाहिजे.मा.महापौर,अशी सभा चालवू नका काहीही उपयोग नाही.असं कोणीही तुम्हांला म्हणणार नाही की,छान सभा चालवली म्हणुन किंवा काय? अहो, उपसूचना सुध्दा कुठल्या वर्षीची कुठे काढतात. कोर्टात जाण्यासाठी म्हणजे २५,२५ वर्षापुर्वीचे कोर्टात काढतात. म्हणजे आता मिटींग संपली म्हणजे सगळं संपल असं काही नाही. हे नंतर सुध्दा सगळं काढता येईल. त्यावेळेस ज्यांनी,ज्यांनी हे विषय केलेले असतील त्यांना सुध्दा तिथं जावे लागेल. आणि म्हणुन चांगले विषय घ्या, त्यावर सर्वांना बोलू द्या त्या विषयाचं जे काही असेल ते

,

नीटनीटकं होऊ द्या. बोलल्याने,चर्चा केल्याने चांगलच होणार आहे. असं काही होणार नाही. मा.महापौर,सभाशास्त्राच्या नियमाप्रमाणे तुम्हांला काय करायचे ते कराख् परत सांगते तुम्हांला तुमच्या सत्तेच्या जोरावर तुम्हांला काय करायचे ते करा. परंतु नियमाप्रमाणे जे काही असेल ते तरी वापरा. अशा पध्दतीने तुम्हांला सभा चालू देणार नाही.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, मला मगापासून ताळमेळच लागत नव्हता नेमका कुठला विषय चालला आहे, कोण कुठल्या विषयावर बोलतंय,काय चाललंय आपण एका हिंदी चित्रपटा प्रमाणे आपण फ्लॅशबॅक मध्ये काय जातोय म्हणलं सगळे जातात आपण जायला काय हरकत आहे. विषय क्रमांक १ पासून सुरुवात करते महापौर साहेब, महानरपालिकेच्या शाळेमध्ये नेमकं काय चाललंय आपल्या सदसदविवेकबुध्दीला म्हणुन विचारलं पाहिजे की, नेमकं आपण काय करतोय. खेळणीसाठी आपण आता तरतुद केली आहे. एकीकडे मंगलाताई, भाऊसाहेब तुम्ही राग मानू नका मंगलाताईंनी विषय काढला म्हणुन बोलते शिक्षण मंडळ जेंव्हा अस्तित्वात होतं त्यावेळेस कॉन्ट्रॅक्टरला आपण आठ वर्षाचं टेंडर दिलेलं आहे. कायदयाने शिक्षण मंडळा संपुष्टात आलं त्यावेळेस त्याच टेंडर सुध्दा संपायला पाहिजे. अजुनही ते चालतंय आपण कोर्टात केस दाखल केली, कोर्टात आपण आपली बाजु नीट मांडली नाही. शिक्षण मंडळ हे राज्य शासनाच्या अखत्यारीत होतं त्यावेळेस त्याला स्वतंत्र अधिकार होते. ज्यावेळेस ते मंडळ संपल,समिती स्थापन झाली त्याचवेळेस खरेदीचे सगळे अधिकार स्टँडींग कमीटीकडे आहेत मग टेंडर कसं राहीलं ,मग त्याला वर्कऑर्डर कशी गेली. आपण या मुद्यावर बोललो नाही.कोर्टात पण गेलो नाही,दुर्दैव आहे या मुद्यांवर आपण कोर्टात सुध्दा जाऊ शकत नाही. कारण अशा प्रकारचे खोटे कामं चालणार असतील शिक्षण मंडळाच्या माध्यमातून कोणी इथं अधिकारी दिसत नाही त्यांनाही सांगा इथं हजर रहायला सगळी लोकं आमच्या डोक्यावर मिरेच वाटतात का? साहेब, त्यावेळेस सुध्दा आपण आपली बाजु का मांडली नाही हा माझ्यापुढे गहन प्रश्न आहे असं मला वारंवार वाटत होतं की, ते टेंडर रद्द होईल. आणि रद्दच करायचं नसेल तर पुढील काळात माझ्याकडुन कुठल्याही चांगल्या वागणुकीची अपेक्षा करु नये खास करुन शिक्षण मंडळाच्या बाबतीत मी काय गप्प बसणार नाही,मी काय ऐकणार नाही,आवाज उठवणार,जे कायदयाला धरुन नाही त्यासंदर्भात जर आपण कारवाई करणार असाल तर मी त्याच्या बाबतीत आवाज उठविणार.आमच्या नगरसेवकांना कळलं असतं तर आमचा विषय फेटाळला असता पण तुम्ही उच्चशिक्षीत आहात,सगळी माणसं सुशिक्षीत

,

आहात,आयएएस आहात,तुमच्या मागे बसलेली मंडळी उच्च विद्याविभुषीत आहेत. पाटील साहेब, बरोबर आहे ना, शिक्षण मंडळ तुमच्याकडेच आहे ना, वर्कऑर्डरवर साईन कोणी केली, बीलं कोणी दिली, काय करणार आहात साहेब तुम्ही त्याचबरोबर मा.महापौर साहेब,आपण विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणार असाल तर मला त्यावर बोलायचं आहे. आणि पास करणार असाल तर हा कुठला नियम आला आहे की,रस्त्याच्या पलीकडची बाजु रेड झोन मध्ये आहे त्यामुळे ग्रीन झोन सुध्दा यल्लो झोनमध्ये कन्वहर्ट करायच दूसरा एक विषय आहे, विषय क्रमांक ३, ६० गुंठे जागा टीडीआर मध्ये मोबदल्यात आली आहे १११,११२,१२२ . १११,११२ साहेब या जागा कुठे आहेत हे आपण बघितलेल्या आहेत का,याची हिस्ट्री आपल्या माहिती आहे का.याच्यावर कारवाई करण्याच्या आधी मा.आयुक्त साहेब आपल्याला अशी विनंती आहे की,या जागा एकदा प्रत्यक्षात जाऊन बघा. त्याठिकाणी काय परिस्थिती आहे. आणि मग अशा प्रकारचे प्रस्ताव पाठवा. आणि समजा ज्यावेळेस आपण जागा ताब्यात घेतली असेल त्यावेळेला आपण पैसे देणं लागतो. ज्यांच्या जमीनी आपण मागच्या दराने घेतलेल्या आहेत ज्यांच्या जमीनी आपण आधी घेतल्या आहेत आणि आता आपण काहींना टीडीआर दिला काहींना मोबदला दिला. स.नं.१ भोसरी सर्वांना माहिती आहे.आणि मग त्यांनी काय काम केलं त्यांनी द्यावं तुम्हांला अशा प्रकारचे विषय डोळे बंद करुन जर येत असतील तर हे पत्रकारांना सुध्दा कळू द्या. ही सदस्यांची भाषा नाही. प्रशासनाची भाषा आहे आणि प्रशासन आमच्या खांद्यावर बंदुक ठेवुन गोळया चालवतं यात बदनामी आमची आहे. शेती ना विकास विभाग व हरित विभागातील जागांचा वापर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन रहिवास विभागात समाविष्ट करणेस व आवश्यक ती सर्व कार्यवाही (फेरबदलाची कार्यवाही) करावयाची असेल आणि रेडीरेकनरप्रमाणे पैसे द्यायचे असतील तर अनेक लोक येतील तुमच्याकडे आणि आपल्याला पण पैसे द्यावे लागतील. रेट ऑफ इंटरेस्ट देवु शकतो का आपण त्यांना विचारणा केली पाहिजे. आणि अशा प्रकारच्या विषयावरती मा.महापौर म्हणतील आम्हांला सभागृह चालवायचं असत, सर्व सदस्यांना बरोबर घ्यायचं असतंय आम्हांला माहित नाही की, आपण त्या विषयांकडे गांर्भीयाने लक्ष देत नाही. एका विषयात दुसरा, दुसऱ्या विषयात तिसरा तीन/तीन विषय एकाच याच्यामध्ये असतात. मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणार आहात तर त्यावर फार बोलणार नाही. आणि अशा प्रकारचे विषय सभागृहाच्या पुढे आणण्याच्या आधी ज्यांना,ज्यांना असं काही करायचं असेल तर त्यांना

,

म्हणावं आपला डीपी येणाराच आहे ना त्यावेळेस तुम्हांला काय करावयाचे आहे ते करा पण अशा प्रकारचे विषय सभागृहापुढे आणु नये विनाकारण यामध्ये पक्षाची पण बदनामी होते आणि पेपरची रकानेची रकाने भरतात याकडे सुध्दा आपले लक्ष वेधु इच्छिते आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.
मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ४४३ विषय क्रमांक- ४
दिनांक – ७-९-२०१९ विभाग–मा.आयुक्त

संदर्भ १) मा.कैलास बारणे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.९ दि.२४/७/२०१९

विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो–

ठराव क्रमांक – ४४४ विषय क्रमांक- ५
दिनांक-७-९-२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.पअक/३/कावि/२२५/२०१९
दि.१५/०७/२०१९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधिचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल

,

शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल,अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१८-१९ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व आवश्यक माहिती संबंधित विविध विभागाकडून संकलित करुन त्यानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१८-१९ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल अवलोकन करुन मान्यता देणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की, अत्यंत महत्वाचा विषय पर्यावरण आणि त्यासंदर्भात हा अहवाल आपण यावर्षी सादर करणार आहोत. खरं तर मा.महापौर साहेब, तुम्हांला सांगण्यामध्ये अत्यंत खेद वाटतो की, पिंपरी चिंचवड शहराचं जर काय विस्तार आणि लोकसंख्या पाहिली तर हळु हळु वाढत चाललेला विस्तार पिंपरी चिंचवड शहराचा हा वाढत चाललेला हा पर्यावरणाचा भाग आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे दर महिन्याला दिवसाला २०० गाडया पिंपरी चिंचवड आरटीओला रजिस्टर होत असतात तर दर वर्षाला २ लाख गाडया रजिस्टर होत असतात. त्याच्यामध्ये दिड लाख गाडया या टु व्हीलर्स या शहरामध्ये येत असतात. आणि ५० हजार गाडया या ४ व्हीलर्स या पिंपरी चिंचवड शहरामध्ये येत असतात. आपण जर का पाहिलं पेट्रोल असेल, डिझेल असेल यामुळे वायु उत्सर्जनाची निर्मीती होत असते आणि त्या वायुमध्ये कार्बन हायड्रॉऑक्साईड असे वेगवेगळे विषारी वायु या प्रदुषणामध्ये मिसळले जातात एवढया मोठया प्रमाणात या वायु प्रदुषणामुळे सर्वसामान्य नागरीकांना स्वच्छ श्वास घेण्यासाठी बिल्कुल मिळत नाही कारण की, हवेच्या प्रदुषणामुळ धुळीकरणाचं प्रमाण जास्त वाढत चाललंय आणि दरवर्षी आपला अहवाल सादर होतो कोटयावधी रुपये खर्च करतो परंतु पिंपरी चिंचवड शहरवासियांना स्वच्छ हवा,आरोग्य देण्यामध्ये आपण कुठे तरी कमी पडतो. आपण जर नीट व्यवस्थित पाहिलं नद्या असतील,नाले असतील, आजुबाजुचे कारखाने असतील, त्याचप्रमाणे आपला ड्रेनेज विभाग असेल यांच्यामुळे नदी प्रदुषीत करण्यामध्ये सहभागी आहोत. आपण या सगळया गोष्टीची काळजी घ्यावी आणि आपण हा पर्यावरण

,

अहवाल सादर करीत आहोत हा अहवाल सादर करीत असताना मी निश्चितपणे सांगतो की, आम्ही असमाधानकारक आहोत यासंदर्भात या शहरवासियांकरीता चांगले काम करावे अशी अपेक्षा करतो जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.राहूल कलाटे** - मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पर्यावरणाचा अहवाल सभागृहामध्ये मंजुरीसाठी आलेला आहे. ३१ जुलै पुर्वी हा अहवाल सभागृहामध्ये सादर करावा असे या अहवालामध्ये उल्लेख आहे. परंतु हा अहवाल सादर करीत असताना आपण यामध्ये महापालिकेची ऍड केल्यासारखे वाटते. पर्यावरण म्हणजे पर्यावरण मी आता माहिती घेतल्यानंतर असं समजलं की, पर्यावरण अहवालामध्ये फक्त कचरा डेपो आणि एसटीपी याची माहिती घेतली तर आरोग्य आणि स्थापत्यकडे जाते. झाडांची माहिती घेतली तर उदयान विभागाकडे जातात. पर्यावरण याच्यावर काम करीत असताना या अहवालावर मुंढेताईंचा फोटो दिसत नाही. कुलकर्णी साहेबांचा फोटो आहे. आता आपण कोल्हापूरची पुरस्थिती पाहिलेली आहे. त्यामुळे पर्यावरणावर काम करीत असताना चांगल्या प्रकारे काम करावे लागेल. आपण या पुस्तकाचं खुप चांगल्या प्रकारे प्रिटींग केलेलं आहे आणि याच्यामध्ये बाकीच्याच ऍड जास्त आहेत यावर्षीचं किंवा मागच्या वर्षीचं किंवा यावर्षीचं पुस्तक पाहिलं तर यामध्ये प्लॅस्टिकचाच जास्त वापर झालेला दिसतो आहे. म्हणजे इथंच तुमचं पर्यावरण काय करतंय आयुक्त साहेब आपलं डिपार्टमेंट काय करतंय याच्यावर कंट्रोल आहे की नाही. पर्यावरणांवर खुप लक्ष देणं गरजेचं आहे. अहवालामध्ये काही,काही गोष्टी चांगल्या मांडलेल्या आहेत परंतु मला आपले काही गोष्टीकडे लक्ष वेधु इच्छितो की, आपलं उदयान विभाग असेल, स्थापत्य विभाग असेल, ड्रेनेज, एसटीपी या प्रत्येकाचं कॉऑर्डीनेशन करुन आपण चांगल्या प्रकारे करावे. आपण नवीन रस्ते करतो आहोत, डेव्हलपमेंट करीत आहेत, शहरातील गाडयांची संख्या , शहरातील एसटीपीच्या सगळया लाईन भरलेल्या आहेत आपण एसटीपी लवकर केलं नाही तर ब्लास्ट होईल. मागच्या वर्षी २२ कोटी रु.तरतुद केली होती आणि त्यातुन ८० ते ८५ टक्केच खर्च झाला आहे. आणि यावर्षी आपण ३५ कोटी रु.ची तरतुद ठेवली आहे पर्यावरण करीत असताना आपण या छोटया,छोटया गोष्टीकडे लक्ष द्यावं आणि आपण पर्यावरणाच्या संबंधित डिपार्टमेंटच कॉऑर्डीनेशन करावं जेणेकरुन या शहरातील आमच्या भागात गेले तर हवेच्या धुळीचे प्रमाण प्रचंड आहे. काही नागरीक आम्हांला सांगतात की, पाणी किती शुध्द आहे ते सांगतात, हवेमध्ये किती धुळीचं प्रमाण आहे ते सांगतात. याच्यावर आपणाला कंट्रोल करावयाचे असेल तर यावर बारकाईने लक्ष द्यावे

,

जेणेकरुन भविष्यातील पुढच्या पिढीला हे सहन करावे लागणार नाही. हा अहवाल मंजुर करीत असताना यावर खुप अभ्यास करणं गरजेच आहे. असे मी आपल्याला पुन्हा एकदा सुचित करतो आणि थांबतो.

**मा.नायर प्रेमकुमार शंकर उर्फ बाबू -** मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, शहराच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा भाग आहे. जसं आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि अनेक विषयावर चर्चा करीत असताना पर्यावरणाच्या संदर्भात पर्यावरणावर चर्चा करीत असताना याची सखोल माहिती सभागृहाला नसते. आणि प्रशासन वर्षाभरामध्ये एक चांगलं पुस्तक छापून सभागृहामध्ये देत असतात आणि आपण त्यांना मंजुरी देत असतो. पर्यावरणाच्या संदर्भात आज जगामध्ये चर्चा होत आहे. ग्लोबल वॉर्मीगच्या संदर्भात विषय आहे. देशामध्ये नरेंद्र मोदीजीच्या माध्यमातून कच-याच्या संदर्भात त्यांनी लक्ष घातलं आज केंद्रात आणि राज्यात स्मार्ट सिटीच्या बाबतीत आज आपण एक बाजु बघतोय पण या स्मार्ट सिटीच्या अंतर्गत हे सर्व विषय आहेत ते पर्यावरणाच्या संबंधित आहेत.या शहरामध्ये पर्यावरण एक चांगल्या पध्दतीने राबविता येईल. त्यासह एक चांगल आरोग्यदायी आणि एक चांगल ठिकाण रहाण्याचं होईल यादृष्टीने पर्यावरणांकडे बघणे गरजेचे आहे.पर्यावरणाच्या संदर्भात जी काही तरतुद करतो आहे पुढच्या वर्षी या पर्यावरणाच्या संदर्भात मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली जे पर्यावरण तज्ञ या देशामध्ये असतील किंवा या राज्यामध्ये असतील त्यांचा एक परिसंवाद या शहरामध्ये आणुन कमीशनर साहेब आणि तुम्ही एकत्र बसुन या पर्यावरणाच्या संदर्भात एक पॉलीसी डिसाईड करुन या शहरासाठी पुढच्या २५ वर्षासाठी वॉटर पोल्युशन असेल, एअर पोल्युशन असेल हे कसं काय थांबवता येईल चांगल्या पध्दतीच्या योजना कशा राबविता येईल. त्याचा अभ्यास करुन आपल्या येथील नागरीकांना विश्वासात घेऊन आपण पर्यावरणाचा उपक्रम राबविला तर मला वाटतं या शहराच्या दृष्टीकोनातून पर्यावरणाच्या रुपानं एक वेगळं नांव घ्यायला पाहिजे त्यादृष्टीने आपण पुढाकार घेऊन सर्व गटनेत्यांना विश्वासात घेऊन पर्यावरणाच्या संदर्भात उपक्रम राबविणे यावा एवढीच मी आपल्याला विनंती करतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर एक दोन /तीन विषय महत्वाचे आहेत. एक विषय पहिल्या जुलै महिन्याच्या विषयपत्रिकेवरचा होता पवना धरणातून थेट बंद पाईनलाईनने पाणी आणणे या प्रकल्पाच्या माध्यमातून एक विषय होता. तुमचं अभिनंदन करण्याचा ठराव होता पण आमच्या सत्तारुढ पक्षनेत्यांना काय होतंय

,

कळत नाही.चला पुढं चला,चला पुढं चला आज अतिशय चांगला प्रश्न आहे की, मला वाटतं २०१० पासून तो प्रकल्प बंद पडलेला होता कोर्टाचा आणि मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून एक चांगला निर्णय झालेला आहे प्रकल्प सुरु करण्यासाठी आपण पैसे टाकलेले आहेत हा आदरणीय नेत्यांना आणि पक्षाला धन्यवाद देतो की, त्यांनी सगळयांनी यासाठी पाठपुरावा केलेला आहे. आज उषाखाली पाणी आहे, शहरातील नद्या/नाले वहात आहेत आणि आपलं शहर पाणी,पाणी करीत  लोक ओरडतात अशा माध्यमातून पवना जलवाहिनीचा प्रकल्प मार्गी लागण्याच्या माध्यमातून हे पैसे  मार्गी लागणार आहेत त्याबद्दल अभिनंदन करतो. भाऊसाहेब भोईर यांनी चांगला विषय आपल्यासमोर मांडला होता. ६०० स्के.फुट असेल,१००० स्के.फुट असेल किंवा प्राधिकरणातील १५०० स्के.फुटाचे आतील घरे असतील यांच्या लिगल/ अनलिगलचा जो विषय आहे हा प्रश्न २००८ पासून आपल्यासमोर आलेला आहे आमची आपल्याला विनंती आहे की,हा प्रश्न खरंच मार्गी लावायचा असेल तर अधिकृत आणि अनधिकृत घरांची आणि त्यामध्ये प्राधिकरणाच्या हद्दीतील अनधिकृत घरांची माहिती देणेत यावी आणि महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत घरांची माहिती देणेत यावी.आणि यांच्या नोंदी लागल्यापासून किती लोकांनी अनधिकृतची अधिकृत करुन घेतलेली आहेत याची माहिती देणेत यावी. अनधिकृत घरे लिगल करायची नियमावली  असती तर आपल्याकडे रांग लागली असती. आपण ज्या अटी/शर्ती घातलेल्या आहेत ही सुध्दा साफ चुकीची आहे असे आम्हांला याठिकाणी सांगावेसे वाटते.जर आपल्याला हा प्रश्न मार्गी लावायचा असेल, शास्ती कराचा प्रश्न सोडवायचा असेल तर मुळासगट सोडवा जो प्रश्न आम्ही यापुर्वी २००८ च्या आधी  सोडवला होता. सरसगट शास्तीकर सर्वांना माफ करणेत यावा.  मग त्याठिकाणी कामगार असो, कारखानदार असो सर्वांना माफ करणेत यावा. आज प्रत्येक जण आमच्याकडे येतो या शास्तीकराचं काय झालं अशी विचारणा करतात. शास्तीकर माफीचा खरंच किती लोकांना लाभ झालेला आहे याची  आकडेवारी आपण आयुक्तांना देणेत यावी. आम्हांला असेही समजले आहे की, शास्तीकर माफ करायचा  असेल तर पहिलं थकबाकी भरावी लागते. आता आमच्याकडे थकबाकी भरण्यासाठीच पैसे नसतील तर तुमच्या शास्तीकराची माफी कुठली . जर निर्णय घ्यायचा भाजपाचा हेतू चांगला असेल , जर आपल्याला श्रेय घ्यायचं असेल तर सरसगट माफी देणेत यावी. थकबाकीसाठी कोणाला तरी लटकवत ठेवणं, नाही तर थकबाकी २,२ लाख भरा म्हणुन सांगता. आज आम्ही लोकांना जाहीर आव्हान केलं आहे की, १ रु.सुध्दा कोणी शास्तीकर भरायचा नाही. महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की, हा

,

गोरगरीब नागरीकांचा प्रश्न आहे तो मार्गी लावणेत यावा अशी आमची पक्षाकडे अपेक्षा आहे. शास्ती कर असेल, बंद पाईपलाईनचा प्रश्न असेल हे प्रश्न मार्गी लागावेत अशी विनंती करतो. आणि घोळवे साहेबांनी जो एक प्रसंग अचानक घडवून आणला महापौर साहेब, उद्या या सभागृहाचं सुध्दा नामकरण होऊ शकेल, या सभागृहाचं नांव यशवंतराव चव्हाण सभागृह याऐवजी उद्या दुसरं कोणी आले तर ते नांव बदलू शकतील. त्यामुळे असे जे काही चांगलं वाईट झालं असेल ते कोणीही करु नका. यासंबंधी कोर्टात केस आहे . याठिकाणी पर्यावरणाच्या ऐवजी या शहराचं सगळं भात वरण झालेलं आहे. पर्यावरणाचा शहरात रहास झालेला आहे. ज्यांच्याकडे हा विषय सोपवलेला आहे महापौर साहेब आपण ज्या भागात रहातो आहे त्या भागामध्ये प्रत्येक नदी-नाल्यामधुन काय,काय वाहतंय हे तुम्ही बघताय तुमच्या प्रभागातील किंवा माझ्या प्रभागातील जो नाला वाहतोय त्या नाल्याची किंवा त्या कुदळवाडीच्या परिसराची काय अवस्था आहे. एकीकडे आपण पर्यावरणाचा अहवाल एकदम थाटामाटात बनवलेला आहे त्या अहवालाप्रमाणे त्या पध्दतीने काम झालं असतं तर आज आमच्यावर ही वेळ आली नसती आज पवना नदी असो , इंद्रायणी नदी असो सगळया नद्यांची वाट लागलेली आहे. सगळया नद्या बुजवलेल्या आहेत आपल्याकडे जो पूर आला तो पर्यावरणाचा –हास झाल्यामुळे आलेला आहे. नद्या बुजवल्यामुळेच हे असं झालेलं आहे.आपल्या शहरातील पुर येण्याचं कारण म्हणजे हे सगळं नद्या,नाले बुजवल्यामुळंच झालेलं आहे. काही बिल्डर लोकांनी नाल्यावर स्लॅब टाकलेले आहेत असे अनेक उदा. आपल्या शहरामध्ये नाले बुजवुन बिल्डींगस् उभ्या केलेल्या आहेत त्यावेळेस आपल्या पर्यावरणाच कुठं गेलं आणि अशा काही गोष्टी आपल्या लक्षात आल्यानंतर आपण झोपेतून जागं होतो आणि मग ते कोणी,काय बोललं, कोणी आडवलं ते नंतर होतं आयुक्त साहेब, आपल्याला या शहराचं पर्यावरण खरंच चांगल ठेवायचं असेल तर आज वाढती लोकसंख्या आहे प्रदुषण वाढलेलं आहे त्यासाठी आपल्याला ज्या काही चांगल्या उपाययोजना करता येतील त्या कराव्यात. संजय कुलकर्णी सोडून दुसरा कोणी चांगला अधिकारी सक्षम नाही का असे आम्ही सभागृहामध्ये यापुर्वी अनेक वेळा बोललो होतो. जर त्या माणसाला हे काम जमत नसेल तर त्यांच्याऐवजी दुसरा एखाद्या अधिका-याची नेमणुक करुन आपल्या शहराचं पर्यावरण कसं चांगलं राहील या माध्यमातून आपण विचार करावा आणि आपण मला बोलायची संधी दिली त्याबद्दल आभार मानतो आणि थांबतो.

,

**मा.सुवर्णा बुर्डे** - मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पर्यावरणाचा विषय निघाला म्हणुन मी आपल्याला एसटीपी प्लँन्ट बद्दल सांगणार आहे मोशी ते च-होली हा इंद्रायणी नदीच्या कडेला जे मंदीर आहे त्याठिकाणी एसटीपी प्लँन्ट साकारला गेला आहे तर त्या एसटीपी प्लॅन्टची नदीच्या कडेने जी लाईन गेलेली आहे ती लाईन पूर्ण पणे लिकेज झालेली आहे त्यामुळे ते पाणी नदीमध्ये जात आहे जर असं पाणी नदीमध्ये जात असेल तर पर्यावरणाचा विषय घेऊन काय उपयोग आहे आज मी ग्रामीण भागामध्ये रहात आहे त्याठिकाणी शेती ही जास्त प्रमाणामध्ये आहे या शेतामध्ये ज्यावेळेस या नदीचं पाणी सोडलं जात त्या पाण्याचा वास खुप घाण येतो शेतकरी किंवा बाई ज्यावेळेस शेतामध्ये काम करतात तेंव्हा त्यांच्या हाताचा वास खूप घाण येतो. या हाताचा वास दोन,दोन दिवस जात नाही. आणि दुसरा एसटीपी प्लँन्ट आमच्याकडे साकारला आहे या एसटीपीची लाईन नदीच्या कडेने गेलेली आहे ती दुरुस्त करणेत यावी. याठिकाणी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.आशा शेंडगे-धायगुडे** - मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आज आपण याठिकाणी पर्यावरण अहवालाला मंजुरी देत आहोत खरं तर आम्ही मागचे ५ वर्ष ओरडायचो कुठं तरी या पर्यावरणाचा जो काही अहवाल त्या अहवालामध्ये आपल्याकडनं कितीही छान,छान लिहीलं असलं तरी या शहरातले राहणारे नागरीक तुम्ही आम्ही आहोतच पर्यावरणावर लिहीणं खुप सोप आहे परंतु तशी परिस्थिती शहरामध्ये आहे का हे बघणं तितकच महत्वाचं आहे आज अनेक सदस्यांच्या बोलण्यातून संजय कुलकर्णी करतात काय सन्मा.महापौर गेली ७ वर्ष मी या सभागृहामध्ये आहे नदी सुधार प्रकल्पामध्ये कासारवाडी,फुगेवाडी येथील नदीपट्टा नदी सुधार प्रकल्पामध्ये असा विषय आहे का असे जेंव्हा बोलायला गेलो तेंव्हा ते सांगायचे ताई डीपीआर करायचे आहे मला वाटायचे पुढच्या ६ महिन्यात, ४ महिन्यात, पुढच्या वर्षी नक्की आपल्याकडे कुठं तरी चांगल बघायला मिळेल असं करता,करता १ नाही,दोन नाही, तीन नाही तब्बत सात वर्ष गेले ७ वर्षामध्ये आपली डीपीआर च्या संदर्भात ऍटो क्लस्टरला मिटींग झाली त्याच्यानंतर पुन्हा एकदा डीपीआर काय आहे हे तुमच्या फडक्यामध्ये बांधुन ठेवलं हे मला काय माहित नाही. परंतु तो डीपीआर पुन्हा एकदा गुलदस्त्यामध्ये आहे. सन्मा.आयुक्त साहेब, डीपीआर ७ वर्ष होत नसेल तर संबंधित अधिकारी काय अडचण आहे ती सांगावी. नदी सुधार प्रकल्पाचा डीपीआर करण्यासाठी ७ वर्ष लागतात तर नदी सुधार प्रकल्पासाठी किती वर्ष लागतील. कागदावर

,

येण्यासाठी ७ वर्ष लागलेली आहेत अजुनही तो डीपीआर कम्पलीट नाही. आपण लोकांच्या सुचना घेऊन त्याची अंमलबजावणी करणार होतो अशा प्रकारे जर काम होणार असेल तर याच्यावर आपल्याला विचार करावा लागेल. नदीकाठी शहर विकसीत होत असतात तिथं लोक रहायला येतात त्यामुळे आपण त्या नदीची पूर्णपणे वाट लावतो. पर्यावरण विभाग हा स्वतंत्रपणे जिवंत असताना देखील पर्यावरणाची विल्हेवाट लागते आहे दुसरा महत्वाचा विषय जर आपण याठिकाणी पर्यावरण विभाग आहे म्हणतो आज आपल्या शहरामधुन मेट्रोची लाईन जात आहे आपल्या महानगरपालिकेसमोर अत्यंत मोठया प्रमाणात धुराळा उडत असतो, मोठया प्रमाणात ध्वनीप्रदुषण होत आहे सगळे प्रकार आपण पहातो आहे त्याच्यावरती आपल्या पर्यावरण विभागाने मेट्रो प्रकल्पाला पत्र दिलं का तो एक शासनाचा भाग असला तरी तो प्रकल्प आपल्या शहरात होत आहे त्यांना सुध्दा आपण काही रक्कम अदा करतो आहे. त्यांना काम करणं आपलं बंधन नाही शेवटी शहराचा विकास तुम्हांला आणि आम्हांला हवा आहे. परंतु तो विकास करीत असताना पर्यावरणाचा –हास होत असेल तर आपल्या विभागाकडुन सुध्दा कुलकर्णी साहेब, तुम्ही सांगा हो पर्यावरण विभाग प्रमुख म्हणुन आपण जबाबदारी पार पाडतो तर आजपर्यंत तुम्ही मेट्रो प्रकल्पाला किती पत्रं पाठविली आहेत. मेट्रोच्या कामाबद्दल का बोलत नाही. दापोडीपासून माझा प्रभाग सुरु होतो मेट्रो प्रकल्प आमच्या प्रभागापासून सुरु होतो तिथून पुढे आपल्या शहराचा मानबिंदू असलेली आपली महानगरपालिका आहे तिथे सुध्दा काम चालू आहे तिथे देखील अत्यंत मोठया प्रमाणात खडी पडलेली असते,कुठे उंचवटे आहेत, कुठे खड्डे आहेत या सगळया गोष्टी आपण बघितल्या पाहिजेत नां पर्यावरण विभाग काय करतो, फक्त पर्यावरण विभागापुरतं तिथं एसी मध्ये बसुन बाकीच्या सगळया गोष्टी पाहिल्या म्हणजे पर्यावरण विभाग होत नाही. तिसरा महत्वाचा विषय म्हणजे पर्यावरणाची सुस्थिती आणि दुरावस्था कशी आहे मागच्या दोन वर्षापुर्वी आपण एक अहवाल प्रसिध्द केला होता की, पर्यावरणाची सध्यस्थिती आणि दुरावस्था कशी आहे. त्याच्यामध्ये आम्ही सांगितले होते की, आपला जो कचरा डेपो आहे त्याठिकाणी किती चेकींग होतं त्याच्यावरती आपण काय अंमलबजावणी केली. तिथे आजही आम्ही म्हणतो की, आमच्याकडे प्लॅस्टिकपासून इथेनॉल तयार करतो आणि पेट्रोल तयार करतो हे सगळे प्रकल्प कागदावरच आहेत. मध्यंतरी आम्हांला कळालं होतं की, आपण गुजरातहून प्लॅस्टिक मागवतो आणि तो प्रकल्प राबवतो या सगळया चुकीच्या गोष्टी करणा-या अधिका-याला विभाग प्रमुख म्हणत असाल तर त्यांनी या ७ वर्षामध्ये स्वतः काय केलं

,

त्यांनी या शहरासाठी किती प्रयत्न केले हे त्यांनी आम्हांला सांगावे हे शहर जिवंत असले पाहिजे कुठे तरी आपण या गोष्टींना वाचा नाही फोडली तरी आणि या शहरासाठी काम केलं नाही तर आणि हे फक्त कागदावरच नाही तर त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. ही महापालिका आशिया खंडात सर्वात श्रीमंत महापालिका म्हणुन नांव आहे या नावावरती कुठं तरी चांगल्या प्रकारचा खर्च करीत असताना नागरीकांच्या विकासासाठी फक्त ब्रीज बांधणे, अंडरग्राऊंड केले ,प्रकल्प केले, नवीन प्रोजेक्ट आणले एवढयावर थांबणार नाही तर त्याच्यावरती ख-या अर्थाने ज्यावेळेस हे आकडे खरे सांगतात आज तुम्ही त्या अहवालामध्ये कितीही आकडे दाखवले तरी साहेब,तुम्ही आम्ही उघडया डोळयांनी पाहतोय की,या शहरामध्ये जे विविध प्रकल्प राबवतोय त्यामध्ये ड्रेनेजलाईन असेल, २४ बाय ७ ची लाईन असेल, त्याठिकाणी सुध्दा तुम्ही पर्यावरणाचे महत्व सांगितलं पाहिजे. आपण याठिकाणी फक्त टेंडर काढणं,ठेकेदार निश्चित करणं आणि पैसे देणं एवढंच काम करतो. तसेच आपण कच-यापासून खत निर्मीती किती करतो हे त्यांनी सांगावे आणि हे आपण जर का महापौर साहेब थांबवलं नाही तर पुढच्या वर्षीपासून तुम्हांला विनंती आहे की, त्यांना सांगून टाका की, आम्हांला कसलाही पर्यावरण अहवाल देऊ नका आम्हांला उघडया डोळयांनी जे दिसतंय ते चांगलं दिसू द्या अशी अपेक्षा मी व्यक्त करते धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे** - मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, महापौर साहेब, या पर्यावरणाच्या विषयाबद्दल सर्वांनीच बोलले आहेत. २६३ एमएलडी पाणी आपण ट्रीट करतोय असं आपण या अहवालामध्ये सांगतोय.४८० एमएलडी पाणी उचलतोय त्यापैकी आपण २६३ एमएलडी पाणी ट्रीट करतोय असे सांगतात. आपली स्काडा योजना ही खरंच ऍक्युरेट आहे का मी कासारवाडी एसटीपीला जाऊन परिस्थिती बघितली, भाटनगरच्या एसटीपीला गेलो किती पाणी येतंय, काय होतंय आणि आता कुलकर्णी साहेबांनी नवीनच शोध काढलाय की,एसटीपीच्या जागेमध्ये ४० ते ४५ कोटीचं टेंडर काढलयं साहेब, आपण कासारवाडीच्या एसटीपीला सकाळच्या वेळेस दोन तासच जाऊ तिथं तुम्ही किंवा मी फिरु शकतो का बघा तिथं पाण्याचा एवढा वास येतो की,जे पाणी फिल्टर करतो ते नीट होत नाही. मी हे स्वतः कुलकर्णी साहेबांना नेऊन दाखविलं आहे आज आपण पाणी पंप हाऊसला नेतो आणि ते एसटीपीला घेऊन जातो. बाय ग्रॅव्हीटीला नेलं पाहिजे हे मी आपल्याला वेळोवेळी सांगितलं आहे की, मी भाटनगर पासून कासारवाडी पर्यंत जवळपास ७ कि. मी. पर्यंत १ मीटर डायमीटरची पाईपलाईन काम चालू केल हे काम अमृतच्या माध्यमातून

,

अमृतच टेंडर १४८ कोटीचं त्याच्यामध्ये ४ एसटीपी २१५ कि.मी. ४५० ते ६०० ची लाईन मला सांगण्यात आलं की, १००० डायमीटरची लाईन आपण करु शकत नाही. साहेब,मग माझ्या इथं ६० कि.मी.लाईनचं काम कस चालू केलं जर त्या पध्दतीने याच्यामध्ये करु शकत नाही आता या कुलकर्णी साहेबांनी इंद्रायणी नदी आणि पवना नदीसाठी १४५ कोटी रु.चं टेंडर काढलं आहे ही व्यक्ती टेंडर काढण्यात एकदम माहीर आहे. माझा या व्यक्तीवर राग किंवा द्वेष नाही किंवा काय नाही. जर हे शहर सुधरायच असेल आणि अशा माणसांच्या हातात जर कारभार दिला आणि त्या व्यक्तीला आपण पोस्टमन करत राहीलो तर साहेब, ती व्यक्ती ९ वर्ष एकाच पदावर आहे. मी या सभागृहाला विनंती करतो की, याचं हे पद काढून घ्या आणि आहे त्या पदावर त्यांना प्रमोट करा आणि दुस-या एखादया चांगल्या माणसाला आपण हायर करु असं प्रत्येक ठिकाणी आपण एजन्सी करतो तसं आपण करा आज आपल्याकडे एनव्हायरमेंट प्रत्येक ठिकाणी राडारोडा टाकला जातो ते काम स्थापत्य विभागाने बघायचं, ड्रेनेजच काम ड्रेनेज विभागाने करायचं, इलेक्ट्रीकचं काम आज तुमच्याकडुन राहील तर ते पाणी डायरेक्ट नदीत जातं पर्यावरण विभाग वृक्षारोपणाचं काम कोण करतंय साळुंके साहेबांच काम आहे. अहो, साहेब त्यांनी चांगली झाडं लावली आहेत. एवढं चांगल काम साळुंके साहेबांनी केलेलं आहे. आणि कुलकर्णी साहेबांची खातेनिहाय चौकशी करुन त्यांना शिक्षा केलीच पाहिजे. हे जनतेचे पैसे आहेत आम्हांला याठिकाणी जनतेनी निवडुन दिलेले आहे ते या शहराची कामे करण्यासाठी आणि हे जर होणार नसेल आणि हे यांच्याच पध्दतीने मनमानी करुन करणार असतील तर या सभागृहात तुम्हांला विनंती करतो की, या लोकांना शासन करणं गरजेचं आहे खातेनिहाय चौकशी करुन जो माणुस दोषी आढळेल त्याला सस्पेन्शन करुन घ्या. आयुक्त साहेब, तुम्हांला अडीच वर्ष झाली आहेत अजुन पुढची अडीच वर्ष रहावे अशी माझी इच्छा आहे एवढं बोलून थांबतो. जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.संगीता (नानी) ताम्हाणे** - मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आज जो याठिकाणी विषय आलेला आहे त्याच्या संदर्भात मला थोडक्यात सांगायचं आहे. आपण जे इंद्रायणी नदीमध्ये गटारीच पाणी सोडलेलं आहे तुम्हांला माहिती आहे स्मशानभूमीच्या वरच्या साईडनं या पाण्याची आपण सोय का करीत नाही. आणि त्यानंतर मोई याठिकाणी आपण ज्या पुलाच्या कडेने जातोय त्याठिकाणचं पण पाणी पहा आणि त्या रस्त्यांनी जो कचरा असतोय आपण चिखली पासून ते मोई पुलापर्यंत आलो तर त्याठिकाणचा जो संपुर्ण

,

कचरा आहे तो कचरा कायम फेकुन दिलेला असतो. हा कचरा आपण का उचलत नाही आणि त्याठिकाणी जी दुर्गंधी पसरतेय त्याठिकाणी आम्ही जाताना बघितलंय त्याठिकाणी वास खुप येतोय मग तो कचरा आपण उचलंत नाही का आणि त्याठिकाणी ड्रेनेजच पाणी सोडलेलं आहे. त्या भागामध्ये एवढा घाण वास येतोय. मला एवढंच सांगायचं आहे की, आपण जो प्लॅन्ट करतो आहोत त्यामध्ये या पाण्याची सोय आपण केली पाहिजे. एवढंच सांगते आणि थांबते.

**मा.सुलक्षणा धर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पर्यावरणाचा विषय आला आणि पुन्हा एकदा वायसीएम विषय समोर आणतो. वायसीएममध्ये पास्को सारखा अतीशय घातक प्रकल्प आपण राबवतो. त्याच्यामध्ये संपुर्ण शहरातील हॉस्पिटलमधुन जे आपण हयुमन बॉडी पार्टस जे बायोमेडीकल वेस्ट आणून जे तीथे आपण जाळतो. त्यामुळे आपल्या शहरामध्ये खुप जास्त प्रमाणात प्रदुषण होतं त्याच्यावर आपल्या एन्व्हायरमेंटल विभागाची कुठल्याही प्रकारची पाहणी होते की नाही हे माहिती नाही. वायसीएमला लागूनच अगदी घनदाट झोपडपट्टी आहे फुलेनगर आणि संततुकारामनगर. हा अतीशय व्याप्त ऐरीया आहे, खुप घनदाट लोकसंख्या आहे आणि या प्रकल्पामुळे आपण सगळया शहरातले म्हणजे प्रत्येक प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये अगदी ते वेस्ट कॉटन, ब्लडशी हे झालेल कॉटन पासून ते अगदी मानवी आवयव जे ऑपरेट करुन आपण काढलेले आहेत ते जाळण्यासाठी आपण वायसीएम मध्ये आणतो आणि त्याच्यासाठी आपली जी प्रणाली आहे, आपण जी यंत्रणा वापरतो ती शास्त्रशुध्द पध्दतीने वापरतो का. कारण त्याच्यातन जो धुर तयार होतो आणि त्याची जी काजळी पडते ती काजळी लोकांच्या घरावर पडते. मा.महापौर साहेब, आपण हॉस्पिटलच्या टेरेसवर कधी गेलाततर, कधी योग आलातर कृपया आपण जाऊन या आणि तिथे ज्या पध्दतीने आपले सोलर पॅनल्स आहेत आणि त्या सोलर पॅनल्सवर एवढा जाड थर त्या काजळीचा पडलेला आहे. त्याच्यामुळ आपल्या एसी पॅनलवर सुध्दा इम्पॅक्ट होतो. प्रत्येकवेळेस आपल्या वायसीएमच्या आयसीयूचे एसी ऑलवेज बंदच असतात. आयुक्त साहेब आपल्याला हे जे वारंवार एसी बंद आहेत, आयसीयूच टेम्परेचर मेन्टेन असणं गरजेच आहे हे आपण सांगतो आणि मग ते पाहण्यासाठी जेव्हा टेरेसवर गेले तेव्हा एवढ भयंकर दृष्य आढळलं की त्याची जी चिमणी आहे त्याची हाईट एवढी वाढवलेली असताना सुध्दा त्याची जी काजळी आहे ती खाली पडते, लोकांच्या घरावर पडते याच्यावर आपल एन्व्हायरमेंटल डिपार्टमेंट काय करतं. कशा पध्दतीनी त्यांनी रहीवासी ऐरीयामध्ये त्यांना परमीशन दिली.

,

त्यांना खरच ती जागा योग्य आहे का याचा विचार करणं गरजेच आहे. माझ्या ऐरीयामधील अशाप्रकारचा प्रकल्प हा त्वरीत बंद करण्यात यावा. त्यांना जी जी पर्यायी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे तीथे त्यांना जागा मिळत नसेलतर आपण पर्यायी कुठलीही त्यांना जागा शोधून कुठेही त्यांना शिफ्ट करावं. परंतु रहिवासी ऐरीयामध्ये अशाप्रकारचे घातक प्रकल्प हे लवकरात लवकर बंद करावेत अशी या निमीत्ताने विनंती करते आणि आपण बोलण्यास संधी दिल्याबद्दल पुन्हा एकदा आपले आभार मानते, धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पर्यावरणाचा अहवाल, खरतर पर्यावरणाची व्याख्या आणि त्या त्या पध्दतीचे अधिकारी म्हणजे एक अधिकारी या पर्यावरणावर काम करु शकतो किंवा नाही. मला कोणत्याही अधिका-यांना दोष दयायचा नाही. परंतु एकटा अधिकारी हा पर्यावरणावर काम करु शकतो का, पहीला हा प्रश्न आहे. कारण पर्यावरण हे किती वेगवेगळया प्रकरातून येणार आहे हे बघीतल गेल पाहीजे. म्हणजे नदीमध्ये असणारी जलपर्णी, ट्रिटमेंट प्लॉन्ट मधल पाणी, कंपन्यामधून सोडलेल पाणी, आपण जो रोजचा कचरा करतो तो कचरा डेपोमध्ये गेल्यानंतरचा पर्यावरणाचा विषय. माझ्या सहकारी भगीनीनी सांगीतल की जो राडारोडा टाकला जातो तो राडारोडा नदीमध्ये टाकून नदीच्या पर्यावरणाची दुरावस्था, आपले प्रकल्प मोठमोठे असतीलतर त्या प्रकल्पाना कमीत कमी हिरव नेट लावणे. माझ्या सहका-र्यानी सांगीतल आयुक्त साहेब त्यांनी आदि पण सांगीतल होततर लगेच तुम्ही ॲक्शन घ्यायला पाहीजे होती. आज मोठमोठे प्रकल्प केलेतर तिथ हिरव नेट लावतात. एक बंगला जरी बांधायचा असेलतर पत्रे लावतात. आमचे एकनाथदादांनी केलं, विचारा त्यांना. शेजारच्या बंगल्याला त्रास होवू नये म्हणून, शेजारच्या शाळेत धुळ जाऊ नये म्हणून पत्रे लावले, मग आपण का नाही करत. जर कोणीतरी सांगीतल असेल की या रोडवर जाताना धुळ खुप प्रमाणावर आहेतर त्याच्यासाठी आपण काहीतरी केल गेल पाहीजे. मागच्या एक दोन दिवसापुर्वी टिव्हीवर आल की प्लास्टीक बंदी. आपण सभागृहामध्ये किती वर्षे प्लास्टीक बंदी केली. शहरामध्ये तशी काही परिस्थिती आहे का. प्लास्टीक बंदी हा पर्यावरणाचाच विषय आहे. आताच सांगीतल की इंद्रायणीमध्ये मासे मेले. मग तिथे कशामुळे मासे मेले, ही एक व्यक्ती करु शकत नाही. एक व्यक्ती हे सगळ बघु शकत नाही. याच्यावर आपल्याला लक्ष केंद्रीत कराव लागेल. पर्यावरणाचा ट्रिटमेन्ट प्लान्ट असेल, बाकीच्या सगळया गोष्टी असतील अगदी आपण सोसायटयावाईज ज्यावेळेला काम करतो त्यावेळेला राडारोडा टाकतात. तो राडारोडा आपल्या गटरमध्ये जातो त्यामुळ गटर

,

बुजवून जातं. याच्यावर कोण लक्ष देणार आहे. बीट निरीक्षक आहेत त्यांना तुम्ही सांगीतल गेल पाहीजे. सोसायटीच्या बाहेर राडारोडा टाकलातर तुम्ही त्यांना कल्पना दिली पाहीजे की तुम्ही तो गटारीत टाकू नका. पर्यावरण हा नुसता एक विषय होवू शकत नाही एक व्यक्ती हा विषय सांभाळू शकत नाही. आम्ही मा.मंत्री महोदय रामदास कदम यांच्याकडे गेलो होतो. आपला अहवाल दयायला अगदी थोडक्यासाठी दोन तीन दिवस उशिर झाला. प्लॅनिंग डिपार्टमेंट कडे पर्यावरण विभागच काही आहे का. बिल्डींग परमीशनला तुम्ही पर्यावरणाच सर्टिफिकेट घ्या. परवाच्या दिवशी जवळ जवळ ८० लोक मोठमोठया प्रोजेक्टसाठी पिंपरी चिंचवड पुण्यामध्ये आली होती की पर्यावरणाच तुमच्याकडे सर्टिफिकेट आहे का. मग आपण हे बंधन प्लॅन पास करत असताना का नाही ठेवल पाहीजे. तुमच्याकडे पर्यावरणाचा अहवाल आहे का किंवा पर्यावरणाच सर्टिफिकेट आहे का. प्लॅन पास झाला, लोकांनी ताबे घेतले त्याच्यानंतर वरुन कमिटी आली. ती कशासाठी आली मला नाही माहिती. प्रत्येक बिल्डर्सकडे जाते आणि तुम्ही आम्हांला पर्यावरणाचे सर्टिफिकेट दाखवा. वेगवेगळया पध्दतीची स्क्रूटीनी चालू आहे त्यांच्यावर बाकीचे आरोप चालू आहेत, मग मोठमोठया जिथे स्किम चालू आहेत तिथे पर्यावरणाचा दाखला त्यांनी जोडला आहे का. कुठे कुठे नाही पर्यावरण, कंपनीमध्ये व्हिजीट केली का. डॉ.नागकुमार होते अक्षरशः त्यांनी कंपन्यांना सिल ठोकलेले आहेत. पहील्यांदा थेरगावला ज्यावेळेस मासे मेले त्यावेळेस तिथ तीन चार कंपन्याला सिल ठोकल होतं. कारण त्यांच्या कंपनीतून केमीकलच पाणी नदीला आलं, म्हणजे करणार कोण दुसर, भोगणार कोण आपण. आपला अहवाल जाणार महाराष्ट्र शासनाकडे आणि ते आपल्याला दंड मारणार. कोणकोणत्या कंपन्याकडे ट्रिटमेंट प्लान्ट नाही. त्यांच रासायनीक द्रव्य,पाणी हे सगळ याची व्यवस्था लावण्यासाठी कोणाकडे ट्रिटमेंट प्लान्ट नाही हे पण बघीतल पाहीजे. आता राहूल बोलले प्लास्टीकच फाडून टाकायच होतंना, या छोटया छोटया गोष्टी आहेत आणि या गोष्टी जपल्या गेल्या पाहीजेत. जर आपण दुर्गादेवी टेकडी असेल, आपले गार्डन असतील, आपले बर्ड व्हॅली सारखे प्रोजेक्ट असतील, आपली नदी असेल, आपले बोटक्लब असतील याठिकाणी कोणीही प्लास्टीक वापरता कामा नये. आता सगळ निर्माल्य आपल्या नदीतच आहे. कागदी गणपती बनवायला सुध्दा पर्यावरणाची परवानगी नाही. कारण पेपरचा गणपती बनविलातर याच्या इन्क मध्ये येणारा वायू विषारी आहे. त्याच्यामुळे हे पर्यावरणपुरक कागदी गणपती नाही. इतक्या बारीक बारीक गोष्टी आहेत मग हे एक अधिकारी कुलकर्णी काय करणार आहेत. त्याच्यामध्ये तुम्ही चांगले अधिकारी घ्या. आणखीन त्यांच्या कामाला

,

चालना दया. आपल्याला महाराष्ट्र शासनाकडून दंड येतो, टीव्हीवर बातम्या दाखवतात. त्याच्यासाठी आपल्याला दुस-यांना पाणी दयाव लागतं. कारण तुमच असं घाणेरड पाणी आम्ही प्यायच का हा प्रश्न येतो. पाणी पिण्यासाठी देवू देत त्याच्याबद्दल माझा विरोध नाही, देवाची आळंदी आहे. त्याविषई मला काही बोलायच नाही परंतु कशामुळे दयायच, या सगळया कंपन्या असतील बाकीच्या काही गोष्टी असतील, लोकांनी टाकलेला राडारोडा असेल हे सगळ गेल्यानंतर ते पाणी प्रदुषीत होणार. साहेब, ट्रिटमेंट प्लान्टतर सोडा पण आपले ड्रेनेज व्यवस्थीत नाल्याला जोडले आहेत का ते बघा. हे पाणी नीट जातय का, आपल्या ट्रिटमेंट प्लान्टची कपॅसिटी आहे का. परवाच्या दिवशी मी चिखलीमध्ये ट्रिटमेंट प्लान्ट बघायला गेले होते त्यावेळेला असं समजल आमचा जुना ट्रिटमेंट प्लान्ट रेन्यू करणार आहेत. मी म्हणाले, छान बचत केली. पण त्याची खरच कपॅसिटी आहे का, किती वर्षापासूनचे सुरवातीचे ट्रिटमेंट प्लान्ट आहेत आणि तेच ट्रिटमेंट प्लान्ट तुम्ही करता, त्याच्यासाठी रिन्यू करतात. म्हणजे एका ठिकाणी किती लोकांनी त्रास सहन करायचा. त्या ट्रिटमेंट प्लान्टच्या अजूबाजूला लोकांची वस्ती आहे. त्या ट्रिटमेंट प्लान्टमध्ये त्यांनी कितीही केमीकल टाकू देत दोन तास लोकांना वास हा येतोच. जैवविवीधता कमिटी जी आहे त्याचा मला अर्थ सांगावा. नदीमध्ये जी जलपर्णी येते ती उगवू नये याच्यासाठी कोणती झाड लावायची हे सुध्दा त्याच्यात आहे. जैव विवीधता कमिटीमध्ये अशी लोक आहेत टेक्निकल की ते जर झाड लावलेतर जलपर्णी येत नाही, हे आपण कधी समजून घेणार. मागे एकदा एक माणूस आला होता, त्याच्याकडे प्लास्टीक खाणारा किडा आहे, आम्ही म्हणल लगेच माझ्या कडे त्याच सॅंपल दाखव. मध्ये टिव्हीवर सुध्दा बातमी दाखवली. म्हणून आयुक्त साहेब, नुसता हे एक माणुस करु शकणार नाही. आम्ही फक्त संजय कुलकर्णीला दर वेळेला टार्गेट करतो. संजय कुलकर्णीला टार्गेट करण्यापेक्षा आपण याच्यावर किती लोक नेमली पाहीजेत. जेवढे विषय आहेत तेवढे करानां. आमच्याकडे मोशीवाल्यांनी काही मक्ता घेतला आहे का मोशीलाच फक्त कचरा टाकायचा. त्याचा वास प्राधिकरणापर्यंत येतो पण त्याच काहीतरी झाल पाहीजेनां. पर्यावरण विभागामध्ये किती लोक आपण अपॉईंट केली पाहीजेत हे बघीतल पाहीजेनां. दरवेळेला आपण गणपती विसर्जनासाठी हौद बनवतो. यंदाच्या वर्षी आपण हौद बनवले का. एका उदघाटनाला आम्ही काल पिंपरीमध्ये गेलो होतो. पंधरा फुटी गणपती असलातरी सुध्दा तीथे प्लॉस्टीकचे तळे बनवलेत, तीथ तुम्ही पण उदघाटनाला गेला होतात साहेब. सुंदर बनवल आहे तो माणूस राजकीय आहे की नाही हे मला माहित नाही परंतु त्यांनी सुंदर

,

बनवल आहे, आपली नदी प्रदुषीत होवू नये म्हणून. आम्ही त्यांना विचारल मुर्त्या नंतर तरंगतील त्याच काय करणार, त्यांनी सांगीतल की तुम्ही हे सगळ झाल्यानंतर या मुर्त्या ज्यावेळेला शिल्ल्क राहणार त्यावेळेला आम्ही कोणाला बोलवणार कुठल केमीकल वापरणार, काय करणार हे सगळ आम्ही तुम्हांला दाखवतो, त्याच्यापासून आम्ही कुंडया बनवणार. मग एखादी शहरातील व्यक्ती हे करु शकते तर मग आपण नाही करु शकणार का. आपण पण करु शकतोना. जीथ खाणी आहेत, जीथ गणपती विसर्जन करणार तीथ आपण तळी बनवली आहेत का, नाही बनवली. आळंदीला तुम्ही जा तेथे आता आस्थी विसर्जन करु देत नाहीत. आस्थी कुंड वेगळ आहे. नदीमध्ये आस्थी विसर्जन करायच्या नाहीत. आपण सगळया स्मशानभूमीतील राख आणून त्या नदीच्या पात्रात टाकतो, पाणी असू देत किंवा नसूदेत. मग हे पर्यावरणाच कोण बघणार. हे आपल्याला बघताच येत नाही. पर्यावरण सगळया गोष्टीत येतं. पर्यावरण हा विषय इतका मोठा आहे की नुसत एकाने बोलून काही होणार नाही. याच्यावर आपण खरोखरच काम केल गेल पाहीजे. प्रत्येक गोष्ट घेतलीतर त्यात पर्यावरण आहे आणि मग पर्यावरणाच काम करत असताना एवढ सोप नाही. मगाशी माझी सहकारी वायसीएम बद्दल बोलत होती. मध्ये एकाची मयत झाली होती डेड हाऊसला जाण्याचा प्रसंग आला होता. म्हणजे आपल कॉर्पोरेशन खरच किती अवघड परिस्थितीतून चालल आहे. मी त्यांना विचारल की मागच्या पंधरा दिवसापूर्वी तुमच कुलींग कमी होतय आता कुलींग आहे का, तर आहे म्हणाले, मग मी म्हणाली डेड हाऊसे ट्रे तर तुमचे सगळे बाहेर दिसतात. ते म्हणाले आम्ही आता सगळे खालीच टाकतो. आता काय झाल आहे आपण दाखले दयायचे नाहीत. दाखले दयायचे नाही दाखले दयायचे नाही म्हणजे प्रत्येक बॉडी पोस्टमार्टेमला जाते. एका दिवशीतर साठ बॉडया एका ठिकाणी होत्या. मग ती तेवढी रुम आहे का, नाही. मडिगेरीनी निर्णय घेतला त्याच्याबद्दल मला दुमत नाही. पण तेवढया पध्दतीची उपाययोजना पण आपण शहरामध्ये केली गेली पाहीजे. डेडबॉडी मध्ये जर गेलातर बॉडया एकावर एक ठेवायच्या का. आहो, मेल्यानंतर सुध्दा तीथ जाऊन भांडत बसायच का. म्हणजे तेवढया हॉलमध्ये अशी एकही बॉडी कम्फरटेबल ठेवू शकत नाही. मग तुम्ही तेथे स्टोअरेज वाढवल पाहीजे. जर तुम्ही तसा निर्णय घेणार असालतर काम पण तशा पध्दतीच केल गेल पाहीजे. मी म्हणाले आमच्या बॉडया तुम्ही अशा कच-या सारख्या टाकणार असालतर मी चालले दुसरीकडे बॉडी घेवून. असं चालणार नाही. आम्ही इतके वर्षे सभागृहामध्ये काम करतो, इतके वर्षे पिंपरी चिंचवडमध्ये काम करतो तरी हा निर्णय सगळयांसाठी घेतला गेला पाहीजे. मी

,

ज्या कार्यकर्त्याचे वडीलांची डेथ झाली होती त्यांच्यासाठी गेले होते. ते म्हणाले ताई इथ कपॅसिटी चांगली नाही, आपण इथे पोस्टमार्टेम करु आणि बॉडी ताब्यात घेवू आणि आपण दुसरीकडे नेऊ. जर आपण निर्णय घेणार असूतर त्याची व्यवस्थाही व्यवस्थित केली गेली पाहीजे. हे जरी विषयांतर थोड होत असेलतरी हा विषय सभागृहात झाला नाही व त्याच्या नंतर सभाच झाली नाही. पुर्वी साठ वर्षा पर्यंत दाखले देवू शकत होतो. साहेब, वायसीएमला मिटींग झाली परंतु त्याच्यानंतर अशी मिटींग झाली नाही. त्याच्यावर अशी मिटींग झाली की कमीत कमी तुमच्या हॉस्पिटलला माणूस चोवीस तास असलाच पाहीजे, त्या शिवाय तुम्ही डेथ सर्टिफिकेट देवूच शकत नाही. म्हणजे माणसानी घरी मरायचच नाही का. किती प्रश्न आहेत, जर एका विषयाचा निर्णय घेणार असालतर त्याच्या मागे किती गोष्टी आहेत याचाही विचार केला गेला पाहीजे. या सगळया पर्यावरणाशी संलग्न आहेत जस आता सांगीतल की एक चिमणी, धरनी सांगीतल आहे तो तीच्या वॉर्डातील आहे तीला नकोय तो माझा विषय येत नाही परंतु आज आपण जेवढया स्मशानभूमी आहेत त्याच किती प्रदुषण आहे म्हणजे आपण डेथबॉडी जाळायच्या नाहीत का असाही विषय येतो पण मला तस नाही म्हणायच परंतु हे जे पर्यावरणपुरक विषय आहेत. प्रत्येक गोष्ट ही पर्यावरणाला लागून आहे. आता मध्यंतरी अंब्याचा सीझन होता त्याला अशी कापडी बॅक परंतु आपले महापालिकेचे कर्मचारी ती कापडासारखीजर बॅक असेलतर ते म्हणायचे त्याच्यामध्ये थर्माकोल आहे ही कापडी बॅग नाही पाच हजार दंड करा. मी पुराव्याशिवाय बोलतच नाही. कापडासारखी दिसणारी बॅग कापडाची बॅग नाही तर ती बॅक आहे म्हणे थर्माकोलची आणि मग लोकांना पाच पाच हजार रुपये दंड. मी म्हणणार नाही याला दंड करु नका मग आपले नियम लावा लोकांना, कापडाचीच पाहीजे, मांजरपाठचीच पाहीजे जशी पाहीजे तशी आपण लोकांना सांगीतल पाहीजेनां. जिथ दुकानामधुन येणारी वस्तु आहे तीथ तुम्ही सांगीतल पाहीजे की हे पिंपरी चिंचवड शहरामध्ये आल नाही पाहीजे म्हणून. हे आपण करु शकतो का नाही. पिंपरी चिंचवडमध्ये येणारा जो माल आहे तो थांबवू शकतो का  नाही, शंभर टक्के थांबवू शकतो. प्लास्टिक बंदी पण आमच्या सिंग्नलला सगळी लोक प्लास्टिकच्या पिशव्या घेवून उभे राहतात त्यावर पण काही कारवाई करत नाहीत. निगडीचा चौक अक्षरशः प्राधिकरणासारखा चौक आहे. पोलीसांमध्ये, तुम्ही सांगा, तक्रार केलेली दाखवा. सर्व काम हे कार्पोरेशनचच आहे. त्या निगडीच्या चौकाची तर अवस्था एवढी भयंकर, भयानक किती अवघड झालेली आहे की विचारायचीच सोय नाही. म्हणजे लोकांनी नुसत प्राधिकरण म्हणायच फोटो काढून

,

फ्लेक्स लावल पाहीजे की असं आमच सुंदर पिंपरी चिंचवड प्राधिकरण असे फोटो टाकले पाहीजेत. कुठून आली ही मंडळी बघानां. आपण सर्वाना स्मार्ट सिटीमध्ये घर देवून टाका. आमच्याकड या आम्ही तुम्हांला घर देतो असं एकदाच डिक्लेअरच करुन टाका. अक्षरशः त्या चौकामध्ये गेलना तर भितीच वाटते. मला वाटत नाही रात्री एकटी दुकटी बाई त्या प्राधिकरणाच्या चौकातून चालू शकेल, इतकी अवघड परिस्थिती आहे. किती पर्यावरणाला घातक आहे, पाईपलाईन तीथ फोडलेत. बघीतलेत तीथ कोणी, ते नैसर्गिक विधीला कुठे जातात, बघीतल आहे का कुणी. पाण्याच्या लाईन फोडतात, वॉल लूज करतात. ते पाणी घेतात तेच आपण पितो. हे पर्यावरण नाहीतर काय आहे, म्हणून साहेब आज तुम्ही मिटींग तहकूब केलीतरी चालेल परंतु तुम्ही पर्यावरणाची पहीली व्याख्या काढा. पर्यावरणावर किती काम केल गेल पाहीजे याचा विचार आपण केला गेला पाहीजे. माझा कोणत्याही अधिका-यावर दोष नाही. ज्या ज्या अधिका-यांना जेवढे अधिकार दिले आहेत तीतकच तो काम करणार आहे. आहो, माती येणार कुठून आता एक सहकारी बोलले मातीचा डोंगर लावायचा आणि त्याच्यावर बसून स्वार्गात, साळूंके स्वार्गात जावू शकत नाहीत त्यांच्याकड मातीच नाही. आणि म्हणून कुठल्याही अधिका-याला आपण टार्गेट करण्यापेक्षा शहराचा प्रश्न सोडवा. आणि म्हणून पर्यावरण हा गंभीर विषय आहे आणि त्याच्यासाठी आपली दरवेळेला पिंपरी चिंचवड शहराची इज्जत जाते. आता तुम्ही बघा आपल्या नदीच पाणी आटल की पर्यावरणाची लक्तरे कशी लोंबकळत असतात. त्याच्यासाठी आपण काही केल आहे का, काहीच केलेल नाही आणि म्हणून पर्यावरणाचा अहवाल एवढा सोपा नाही. आणि मंजुरीतर एवढी सहज सोपी त्या पर्यावरणालातर नाहीच. ट्रिटमेंट प्लान्टच फक्त पर्यावरण होवू शकत नाही. बिल्डर लोकांना, कंपनीवाल्याना तुम्हांला घ्यायला पाहीजे. प्रत्यक अधिका-याला तुम्ही दहा दहा कंपन्या वाटून दया, त्यांचे ट्रिटमेंट प्लान्ट चेक करा. आता माझ्या सहकारीन सांगीतल की ट्रिटमेंट प्लान्टच पाणी ज्यावेळेला नीट करुन सोडल जात नाही त्यामुळे एकदम काळ आणि घाण पाणी बाहेर येतं. बाहेर पाऊस धो धो आहे आणि आजही आमच्याकडे पाण्याची कपात आहे. मग तुम्ही जेवढ ट्रिट केलेल पाणी आहे तेवढ शहराला पुरवल गेल पाहीजे. अशा कामाला आमची तयारी आहे दया अजून उपसूचना. शहरामध्ये जर तुम्हांला पाणी कपात करायची असेलतर शहरामध्ये तुम्ही ट्रिट केलेल वॉटर प्रत्येक व्यक्तिला दिल गेल पाहीजे. आज एका घरामध्ये कमीत कमी चार गाडया आहेत त्या चार गाडया धुण्यासाठी हे ट्रिट केलेल पाणी मिळाल पाहीजे. माझ्या वॉर्डात मी केल आहे. मेन्टेनंन्सच

,

नाही, आपले लोक बघतच नाहीत, लाईन कट झालीतर पाणी पुढे जाणारच नाही. त्याचे मेन्टेनन्स झाल पाहीजे, त्याच टेंडर निघाले पाहीजेत. शहरामध्ये जेवढे जेवढे ट्रिटमेंट प्लान्ट आहेत तीथून तुम्ही पाणी लोकांना दिल गेल पाहीजे. आज तुम्ही आठवडयात एक दिवस पाणी बंद केलं अजून चार महीन्यानी आठवडयातून तुम्ही दोनदा पाणी बंद कराल. सहा महीन्यानंतर आठवडयातून तीनदा पाणी बंद कराल. त्याच्यानंतर आल्टरनेट पाणी देणार. ग्लोबल वॉर्मीगच संकट एवढ मोठ आहे या संकटामुळे आमची जी पुरपरिस्थिती आहे म्हणजे नुसती आपल्यावरच नाहीतर आख्या महाराष्ट्रावर आहे, आख्या देशावर आहे आख्या वर्डवर आहे. ही जी ग्लोबल वॉर्मीगची संकट आहेत ती कोण सोडवणार. एकटे संजय कुलकर्णी सोडू शकतात का, नाही सोडवू शकत, याच्यावर तुम्ही चिकार अधिकारी नेमा. दहा अधिकारी नेमलेतरी तुम्हांला ही कमिटी कमी पडेल. आणि याच्या प्रमाणे प्रत्येकाला काम वाटून दया आणि मग एकत्रीत अहवाल बनवा. मागच पान पुढे पुढच पान मागे हे अस नको साहेब. याच्यासाठी आपण खुप चांगल्या पध्दतीने काम केल गेल पाहीजे. मा.महापौर साहेब, तुम्हांला वाटत असेल मी बोलते पण सत्यता ही खरी सत्यता अशीच आहे. तुम्ही घाटावर गेलातर हीच परिस्थिती आहे. आज आळंदीने त्यांचे दहाव्याचे घाट आता बंद केले आहेत, आपल्यालाही करावेच लागणार. आपल्यालाही अस्थी टाकायला, राख टाकायला ही बंदी केलीच पाहीजे. झाड लावा, झाडाना घाला. हे आपल्याला लोकांना शिकवलच पाहीजे. पर्यावरण अहवालाला मंजुरीला माझा काहीही विरोध नाही, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर खुप छान चर्चा मा.महापौर साहेब, आपल्या माध्यमातून झाली आणि ताईनीं जी पर्यावरणाच्या संदर्भामधल भाषण केल खुप मलाही आनंद वाटला. मागची आपण जीबी घेतली आणि दुस-या दिवशी बातमी आली की आपण सभा चालवत नाहीत. कुठलाही विषय नसताना सुध्दा पाणी या विषयावरती सात तास सभा चालली. ताई तुमच म्हणण शंभर टक्के बरोबर आहे की पर्यावरण विषय हा खरोखरच काळाची गरज आहे. ही वस्तुस्थिती आहे की कुणीतरी कमी पडतोय, काही अडचणी असतील. आपली यंत्रणा आपूरी आहे पण कुणीतरी बोलता बोलता डॉ. नागकुमार यांच उदा. दिलं. डॉ.नागकुमार एखादया कंपनीला सिल करु शकतात ही ताकद जर एखादया अधिका-यामध्ये आहेतर अशा पध्दतीची परिस्थिती आपल्याला आपल्या शहरामध्ये करण्याची गरज आहे. ज्या पध्दतीने आपण पाण्यासाठी वेगळी कमिटी करायची, पुढच्या पंचवीस तीस वर्षाची भूक आपली कशा पध्दतीने भागेल हे बघायच आणि

,

मला असं वाटत की पर्यावरणाच्या संबंधी अशा पध्दतीची, हे खर आहे की एखादा जरी विषय कमी झाला की तीथ पर्यावरण हे येतेच. मा.महापौर साहेब, मी तुम्हांला विनंती करतो की पर्यावरणाचा हा एखादया राजकीय पक्षाचा विषय नाही. ही परिस्थिती पुढच्या काळामध्ये चांगल्या पध्दतीची व्हावी यासाठी एक सर्वपक्षीय चांगले काम करणा-या त्या पध्दतीची तज्ञ समिती व्हावी. मा.महापौर साहेब, पर्यावरणाच्या संदर्भामधल पुढच्या काळातल धोरण ठरविण्यासाठी एक चांगली समिती करुन या पुढच्या काळामध्ये आपण काम कराव आणि हा विषय मंजूर करुन पुढचा विषय घ्यावा, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४४५ विषय क्रमांक – ६

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.लेखा/०८/कावि/७६१/२०१९
दि.२९/०७/२०१९

मा.सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षण रायगड भवन, सातवा मजला, नवी मुंबई-४००६१४ (शासकीय ऑडीट) यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाचे सन २०१४-१५ या कालावधीचे लेखापरिक्षण पूर्ण केलेले असून सदर लेखापरिक्षणाचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर अहवालात एकूण १६९ परिच्छेद उपस्थित केलेले आहेत. त्याकामी संबधित विभागांना परिच्छेदाची पूर्तता करून घेणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर लेखापरिक्षण अहवाल अवलोकनार्थ नगरसचिव विभागात ठेवणेत आला आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम १० (१) अन्वये मा. सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मुंबई यांचेकडे अनुपालनाचे पूर्तता अहवाल सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

,

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ७

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/२५७/२०१९ दि.०२/०८/२०१९

उपरोक्त विषयाबाबत मौजे चिखली ता. हवेली येथील देहू – आळंदी ३० मी. रस्ता रुंदीकरणा बाबत भूसंपादन करणेचा निवाडा भू.सं.अ.वि.घ.क्र.१, पिंपरी यांनी दि. ३१/०८/२०१३ रोजी जाहीर केलेला आहे. सदर भूसंपादना मधिल गट नं. १११ पै. चे मिळकतधारक श्री. शिवाजी नामदेव आल्हाट यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये त्यांचे मिळकती मधील जादा क्षेत्र संपादनाखाली आलेले असताना निवाड्यामध्ये कमी क्षेत्र दर्शविले बाबत याचीका क्र. २७४७ / २०१५ दाखल केलेली होती.

मा. उच्च न्यायालयाने मौजे चिखली मधिल गट नं. १११ पै. या मिळकतीची मोजणी करणेचे आदेश उपअधिक्षक, भूमि अभिलेख, हवेली यांना दिलेले होते. त्यानुसार मोजणी मध्ये गट नं. १११ पै. चे बाधित क्षेत्र २७०० चौ. मी. असून ७०० चौ. मी. क्षेत्राचे पूर्वीच संपादन झालेले आहे. म्हणजेच सदर गट नं. १११ पै. चे अतिरिक्त २००० चौ. मी. क्षेत्र बाधित असल्याचे आढळून आलेले आहे. २००० चौ. मी. क्षेत्रा मधून दि. ३१/०८/२०१३ चे निवाड्यानुसार संपादन केलेले ३८ चौ. मी. वजा जाता उर्वरित १९६२ चौ. मी. क्षेत्र जादा बाधित झाल्याचे दिसून मा. उच्च न्यायालयानाने श्री. शिवाजी आल्हाट यांचे जादा घेण्यात आलेल्या क्षेत्राबद्दल त्यांचे समवेत वाटाघाटी करून महानगरपालिकेने योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दि. ०६ मार्च २०१९ रोजी दिलेले आहेत.

,

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री. शिवाजी आल्हाट यांना महानगरपालिके मार्फत दि. २५/०४/२०१९ अन्वये वाढीव १९६२ चौ. मी. क्षेत्राची नुकसान भरपाई महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने / टीडीआर / एफएसआय / जिल्हाधिकारी यांचे मार्फत यापैकी आपणास कोणता पर्याय स्विकारावयाचा आहे याबाबत कळविणेत आले. त्यास अनुसरुन श्री. शिवाजी आल्हाट यांनी दिनांक २१/०५/२०१९ चे पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत नुकसान भरपाई चालू बाजारभावाप्रमाणे देणेची विनंती केलेली आहे.

शासन निर्णय दि. १२/०५/२०१५ नुसार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिटीने खाजगी वाटाघाटी द्वारे नुकसान भरपाई कोणत्या दराने द्यावयाची हे ठरवून देणेत येते. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन विषयांकित बाबत प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणेसाठी शासन पत्र क्र.बिसिआ २०१८/(३९१/१८) सि.व्य.(धो), दि.२४/१०/२०१८ नुसार आंद्रा धरणात १०० एम.एल.डी. पाण्याचे आरक्षण मंजूर असून सदर पाणी देहू बंधारा येथून उचलणेस मंजूरी मिळालेली आहे. सदर योजना राबविणेसाठी देहू बंधा-याच्या बाजूला जॅकवेल पंप हाऊससाठी एक एकर जागा आवश्यक आहे. सदर जागा म.न.पा. हद्दीबाहेर आहे. सदर प्रकल्प राबविणेसाठी या ठिकाणी जागेची आवश्यकता लक्षात घेता सदर बंधा-याच्या बाजूची सर्वे नं.९८/३ येथील योग्य जागा खाजगी वाटाघाटीने संपादन करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुवर्णा बुर्डे** –मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन आवश्यक तरतूद करणेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

,

अ)

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१९-२० तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०१९-२० एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ च-होली येथील पुणे आळंदी रस्ता ते च-होली गाव रस्त्यावर प्रवेशद्वार बांधणे. | - | | ३००००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ च-होली येथील आरक्षण क्र. २९२ सिमाभिंत बांधणे. | | | ७५०००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| ३ | प्रभाग क्र. ३ येथील सर्व्हे ५१९ ते ४७५ पर्यंतचा ३० मी.डि.पी.रस्ता विकसित करणे. | | | ४५०००००००० | ७०००००००० | ० | ५०००००० | ६५०००००० |
| | एकूण | | | ४८७५००००० | ७००००००० | ५०००००० | ५०००००० | ७००००००० |

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -४४६ विषय क्रमांक – ७

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/२५७/२०१९
दि.०२/०८/२०१९

उपरोक्त विषयाबाबत मौजे चिखली ता. हवेली येथील देहू – आळंदी ३० मी. रस्ता रुंदीकरणा बाबत भूसंपादन करणेचा निवाडा भू.सं.अ.वि.घ.क्र.१, पिंपरी यांनी दि.

,

३१/०८/२०१३ रोजी जाहीर केलेला आहे. सदर भूसंपादना मधिल गट नं. १११ पै. चे मिळकतधारक श्री. शिवाजी नामदेव आल्हाट यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये त्यांचे मिळकती मधील जादा क्षेत्र संपादनाखाली आलेले असताना निवाड्यामध्ये कमी क्षेत्र दर्शविले बाबत याचीका क्र. २७४७ / २०१५ दाखल केलेली होती.

मा. उच्च न्यायालयाने मौजे चिखली मधिल गट नं. १११ पै. या मिळकतीची मोजणी करणेचे आदेश उपअधिक्षक, भूमि अभिलेख, हवेली यांना दिलेले होते. त्यानुसार मोजणी मध्ये गट नं. १११ पै. चे बाधित क्षेत्र २७०० चौ. मी. असून ७०० चौ. मी. क्षेत्राचे पूर्वीच संपादन झालेले आहे. म्हणजेच सदर गट नं. १११ पै. चे अतिरिक्त २००० चौ. मी. क्षेत्र बाधित असल्याचे आढळून आलेले आहे. २००० चौ. मी. क्षेत्रा मधून दि. ३१/०८/२०१३ चे निवाड्यानुसार संपादन केलेले ३८ चौ. मी. वजा जाता उर्वरित १९६२ चौ. मी. क्षेत्र जादा बाधित झाल्याचे दिसून मा. उच्च न्यायालयानाने श्री. शिवाजी आल्हाट यांचे जादा घेण्यात आलेल्या क्षेत्राबद्दल त्यांचे समवेत वाटाघाटी करुन महानगरपालिकेने योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दि. ०६ मार्च २०१९ रोजी दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री. शिवाजी आल्हाट यांना महानगरपालिके मार्फत दि. २५/०४/२०१९ अन्वये वाढीव १९६२ चौ. मी. क्षेत्राची नुकसान भरपाई महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने / टीडीआर / एफएसआय / जिल्हाधिकारी यांचे मार्फत यापैकी आपणास कोणता पर्याय स्विकारावयाचा आहे याबाबत कळविणेत आले. त्यास अनुसरुन श्री. शिवाजी आल्हाट यांनी दिनांक २१/०५/२०१९ चे पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत नुकसान भरपाई चालू बाजारभावाप्रमाणे देणेची विनंती केलेली आहे.

शासन निर्णय दि. १२/०५/२०१५ नुसार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिटीने खाजगी वाटाघाटी द्वारे नुकसान भरपाई कोणत्या दराने द्यावयाची हे ठरवून देणेत येते. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन विषयांकित बाबत प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणेसाठी शासन पत्र क्र.बिसिआ २०१८/(३९१/१८) सि.व्य.(धो), दि.२४/१०/२०१८ नुसार आंद्रा धरणात १०० एम.एल.डी. पाण्याचे आरक्षण मंजूर असून सदर पाणी देहू बंधारा येथून उचलणेस मंजूरी मिळालेली आहे. सदर योजना राबविणेसाठी देहू बंधा-याच्या बाजूला जॅकवेल पंप हाऊससाठी एक एकर जागा आवश्यक

,

आहे. सदर जागा म.न.पा. हद्दीबाहेर आहे. सदर प्रकल्प राबविणेसाठी या ठिकाणी जागेची आवश्यकता लक्षात घेता सदर बंधा-याच्या बाजूची सर्वे नं.९८/३ येथील योग्य जागा खाजगी वाटाघाटीने संपादन करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मान्यता देणेत येत आहे. तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन आवश्यक तरतूद करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अ)

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१९-२० तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०१९-२० एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ च-होली येथील पुणे आळंदी रस्ता ते च-होली गाव रस्त्यावर प्रवेशद्वार बांधणे. | - | | ३००००००० | ० | २५००००० | ० | २५०००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ च-होली येथील आरक्षण क्र. २९२ सिमाभिंत बांधणे. | | | ७५०००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| ३ | प्रभाग क्र. ३ येथील सर्व्हे ५१९ ते ४७५ पर्यंतचा ३० मी.डि.पी.रस्ता विकसित करणे. | | | ४५०००००००० | ७००००००० | ० | ५०००००० | ६५०००००० |
| | एकूण | | | ४८७५०००००० | ७००००००० | ५०००००० | ५०००००० | ७००००००० |

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

,

विषय क्रमांक – ८

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/१६०/२०१९ दिनांक ६/०८/२०१९

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु. १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०७/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र"अ"**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | १७३२२ | |

,

| | | | |
|---|---|---|---|
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १७३२२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १४८७४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१४७१५ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- १००५१ सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४६६४ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १०५८७ लाभार्थी | GOI+GOM=६३५.२२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = २११.७४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८४६.९६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ९८२५ लाभार्थी | GOI+GOM=५८९.५०लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१९६.५० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७८६.० लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत यावा.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो- मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ३१९ दिनांक २६/७/२०१३ अन्वये “मनपा हद्दीबाहेर ५ किलोमीटर अंतर परिसरात वृक्षारोपण मा.आयुक्त सो.आणि मा.स्थायी समितीचे मान्यतेने करण्यास मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार “मिलीटरी हद्दीतील स्टेशन हेडक्वार्टर देहुरोड येथील तळवडे रुपीनगर हद्दीमध्ये वृक्षारोपण करण्याची बाब प्रस्तावतीत करण्यात आली होती. सदर ठिकाणी जागा उपलब्ध होत नसल्याने सदर ठिकाणा ऐवजी गट नं. १ ब तळवडे गायराण',

,

महापालिका हद्दीतील मोकळया जागा, अन्य कोठेही जागा उपलब्ध होईल (दिघी, औंध मिलीटरी हद्दीत) ई. ठिकाणी वृक्षारोपण करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ४४७ विषय क्रमांक – ८

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/१६०/२०१९ दिनांक ६/०८/२०१९

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु. १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदाकरणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०७/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे-

,

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १७३२२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १७३२२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १४८७४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१४७१५ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-१००५१ सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४६६४ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १०५८७ लाभार्थी | GOI+GOM=६३५.२२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = २११.७४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८४६.९६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ९८२५ लाभार्थी | GOI+GOM=५८९.५०लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१९६.५० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७८६.० लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ३१९ दिनांक २६/७/२०१३ अन्वये “मनपा हद्दीबाहेर ५ किलोमीटर अंतर परिसरात वृक्षारोपण

,

मा.आयुक्त सो.आणि मा.स्थायी समितीचे मान्यतेने करण्यास मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार “मिलीटरी हद्दीतील स्टेशन हेडक्वार्टर देहुरोड येथील तळवडे रुपीनगर हद्दीमध्ये वृक्षारोपण करण्याची बाब प्रस्तावतीत करण्यात आली होती. सदर ठिकाणी जागा उपलब्ध होत नसल्याने सदर ठिकाणा ऐवजी गट नं. १ ब तळवडे गायराण', महापालिका हद्दीतील मोकळया जागा, अन्य कोठेही जागा उपलब्ध होईल (दिघी, औंध मिलीटरी हद्दीत) ई. ठिकाणी वृक्षारोपण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, विषय कमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४४८ विषय क्रमांक – ९
दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

<u>विधी समिती</u>

अ) दिनांक ३/५/२०१९ व २१/६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक १४/६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दिनांक २१/६/२०१९, ५/७/२०१९ व १९/७/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ड) दिनांक ५/७/२०१९ व १९/७/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नायर प्रेमकुमार शंकर उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

,

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, विषय कमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४४९ विषय क्रमांक – १०

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दिनांक २२/३/२०१९, १२/४/२०१९, २६/४/२०१९ व २८/६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २८/०६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक १२/७/२०१९ व १८/७/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. नायर प्रेमकुमार शंकर उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, विषय कमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४५० विषय क्रमांक – ११

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

दिनांक १०/७/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नायर प्रेमकुमार शंकर उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, विषय कमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

,

ठराव क्रमांक -४५१ विषय क्रमांक – १२

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

<u>**मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती**</u>

**अ**) दिनांक २२/३/२०१९,१२/४/२०१९,२६/४/२०१९ व २८/६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २८/६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नायर प्रेमकुमार शंकर उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात** - मा.महापौर साहेब, विषय कमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४५२ विषय क्रमांक – १३

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.आरती चोंधे, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५२१३ दि.१४/८/२०१९

३) मा.सभापती, स्थायी समिती यांचे दि.२०/८/२०१९ चे पत्र.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरुन राष्ट्रीय लोकअदालमध्ये दिवाणी/फौजदारी आणि तत्सम प्रलंबित तडजोड योग्य प्रकरणे, तसेच घरपट्टी, पाणीपट्टी संबंधातील प्रकरणी मा.न्यायालयामार्फत निवाडा करण्यात येतो. दि.१४/०९/२०१९ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले असून अशा प्रकारे वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय लोक अदालतीचा नागरिकांना लाभ व्हावा याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील अनुसूची ड प्रकरण ८ नियम ५१ अन्वये शास्ती/दंड फी किंवा वसूलीचा

,

खर्च आयुक्तास आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसूलीचा खर्च पूर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल अशी तरतूद आहे. सबब दि.१४/०९/२०१९ रोजी तसेच सन २०१९-२० मध्ये वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये मिळकत कर वसूलीची दाखलपूर्व प्रकरणी मनपा शास्ती/दंड करामध्ये खालील प्रमाणे सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | थकबाकीसह संपूर्ण मिळकतकराची एक रकमी भरणेकामी कालावधी | मनपा कर शास्तीमध्ये देणेची माफी / सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| १ | दि. १४/०९/२०१९ रोजी तसेच सन २०१९-२० मध्ये वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकर शास्ती / दंड रक्कमेचे ९०% |

उक्त नमूद प्रमाणे राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी थकीत रक्कम एक रकमी वसूल होण्याचे दृष्टीने मनपा शास्ती/दंड करामध्ये सवलत देणेस व सध्याचे मिळकतकर संगणक प्रणालीमध्ये आवश्यक बदल करणेस मान्यता देणेस तसेच पाणीबील थकबाकी वसुलीस चालना मिळणेसाठी जे ग्राहक दिनांक १४/०९/२०१९ पर्यंत तसेच सन २०१९-२० मध्ये वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी पाणी बीलाचे संपुर्ण थकबाकी भरतील त्या ग्राहकांना दि.१४/०९/२०१९ रोजीच्या तसेच वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या मा.लोकअदालतीच्या माध्यमातून थकबाकीच्या रकमेवर १०% सवलत देणेस व थकबाकी वरील १०% रक्कम ही दंडाच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास केवळ दंडाची रक्कम माफ करणेस तसेच लोकअदालतीच्या माध्यमातून थकबाकीची रक्कम ४ समान हप्त्यामध्ये भरणेस जे थकबाकीदार तयारी दर्शवितील त्यांना थकबाकी वरील रकमेवर ५% सवलत देण्यास व थकबाकीवरील ५% रक्कम ही दंडाच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास केवळ दंडाची रक्कम माफ करणेस आणि वरील प्रमाणे करसंकलन, पाणीपुरवठा विभागा प्रमाणेच स्थानिक संस्था कर (LBT), आकाशचिन्ह व परवाना इ. विभागांकडील देखील अशी थकीत प्रकरणे असल्यास मा.लोकअदालतीच्या माध्यमातून त्यांना व्याजाच्या रकमेमध्ये १०% पर्यंत सुट

,

देण्याचे निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८ यांना प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरुन राष्ट्रीय लोकअदालतमध्ये दिवाणी / फौजदारी आणि तत्सम प्रलंबित तडजोड योग्य प्रकरणे, तसेच घरपट्टी, पाणीपट्टी संबंधातील प्रकरणे, तसेच घरपट्टी, पाणीपट्टी संबंधातील प्रकरणी मा. न्यायालयामार्फत निवाडा करण्यात येतो, दि.१४/०९/२०१९ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले असून अशा प्रकारे वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय लोक अदालतीचा नागरिकांना लाभ व्हावा याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांमधील अनुसुचि ड प्रकरण ८ नियम ५१ अन्वये शास्ती/दंड फी किंवा वसुलीचा खर्च आयुक्तास आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसूलीचा खर्च पूर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल अशी तरतूद आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र. ५२१३, दि. १४/०८/२०१९ नुसार मा.महापालिका सभेकडे अनुसूची प्रकरण २ मधील नियम १(के) अन्वये दाखल करणेत आलेल्या विषया संदर्भातील दि. १४/०९/२०१९ रोजी होणा-या लोकअदालत मधील मिळकत कर व पाणीपट्टी संदर्भात पुढील प्रमाणे उपसुचना देण्यात येत आहे.

दि. १४/०९/२०१९ रोजी तसेच सन २०१९-२० मध्ये वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये मिळकत करवसुलीची दाखलपुर्व प्रकरणी म.न.पा. कराचे विलंब दंडामध्ये (मनपा कर शास्ती) खालीलप्रमाणे सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | थकबाकीसह संपूर्ण मिळकतकराची एक रक्कमी भरणेकामी कालावधी | मनपा कर मध्ये माफी / सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| १ | दि. १४/०९/२०१९ रोजी तसेच सन २०१९-२० मध्ये वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकराचे विलंब दंड रक्कमेचे ९० % सवलत |

तथापी ज्या मिळकतधारकांना अवैध बांधकाम शास्ती करणेत आलेली आहे. अशा अवैध बांधकाम शास्ती मध्ये कोणतीही सुट मिळणार नाही.

,

उक्त नमूद प्रमाणे राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी थकीत रक्कम एक रकमी वसुल होण्याचे दृष्टीने मनपा शास्ती / दंड करामध्ये सवलत देणेस व सध्याचे मिळकतकर संगणक प्रणालीमध्ये आवश्यक बदल करणेस मान्यता देणेस तसेच पाणीपट्टी वसूलीस चालना मिळण्याच्या दृष्टीने जे ग्राहक दि. १४/०९/२०१९ पर्यंत संपुर्ण थकबाकीची रक्कम भरतील त्या ग्राहकांना दि. १४/०९/२०१९ रोजी होणा-या लोकअदालतीच्या अनुषंगाने दि. ०१/०४/२०१९ रोजी असणा-या दंडाच्या रकमेच्या ९० % रकमेची सवलत देण्यास मान्यता देणेत येत आहे या संधीचा नागरीकांनी फायदा घ्यावा. तसेच वरील प्रमाणे करसंकलन, पाणीपुरवठा विभागाप्रमाणेच स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.), आकाशचिन्ह व परवाना इ. विभागाकडील देखील अशी थकीत प्रकरणे असल्यास मा.लोकअदालतीच्या माध्यमातून त्यांना व्याजाच्या रकमेमध्ये ९० % पर्यंत सूट देण्याचे निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८ यांना प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ज्ञानदेव थोरात** - मा.महापौर साहेब, विषय कमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४५३ विषय क्रमांक – १४

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.नरवि/१७/२२/ २०१९ दि.१४/०८/२०१९

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.नरवि/१७/२१/ २०१९ दि.१४/०८/२०१९

पिंपरी चिंचवड मनपाची मंजुर विकास योजना सुधारित करणे या कामासाठी सर्वेक्षण करुन विद्यमान जमिन वापर नकाशा व इतर कामे खाजगी संस्थेमार्फत करुन घेणे ,याकामी निविदा प्रसिध्द करणेस मा.महापालिका सभा ठराव क्र.४०८ दि.२१.११.२०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे, तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र.११८ दि.०५.०२.२०१८ अन्वये पिंपरी

,

चिंचवड महापालिकेच्या संपुर्ण क्षेत्राची (जुन्या व वाढीव हद्दीसाठी) विकास योजना तयार करणेचा ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार निविदा कार्यवाही करुन खाजगी संस्थेची नेमणुक करण्यात आली आहे. सदर संस्थेस दि.०८.०३.२०१९ रोजी कामाचे आदेश दिलेले आहेत.

शासनाच्या नगर विकास विभागाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मंजूर विकास योजना सुधारित (दुसऱ्यांदा) करण्याकरिता उपसंचालक, नगररचना यांच्या अधिपत्याखालील विकास योजना विशेष घटक कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका, व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण घटक या अभिनामाने स्थापन झालेले आहे

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ ते कलम ३१ प्रामुख्याने सुधारीत विकास योजना तयार करण्याशी निगडीत आहेत.त्यानुसार प्रथमतः महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ ते कलम २३ सह कलम ३८ अन्वये मंजूर विकास योजना सुधारीत करणे बाबतचा, इरादा जाहीर करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. सदर विकास योजनेत समाविष्ठ असलेल्या क्षेत्राचा हद्दी दर्शवणारा व मा.आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी स्वाक्षांकीत केलेला नकाशा, महापालिकेच्या कार्यालयात,कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळी नागरीकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात येईल.

सुधारित विकास योजना तयार करण्याचा महापालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस मा.महापालिका सभेची मान्यता मिळावी. सदरची सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ६० दिवसाच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या नागरीकांच्या सुचना।हरकतीचा विचार विकास योजना तयार करतांना करण्यास तसेच

२) तसेच विकास योजनेचे सर्व वैधानिक कामकाज करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २४ नुसार उपसंचालक,पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण घटक, पिंपरी-पुणे यांची "नगररचना अधिकारी" म्हणुन नेमणुक करण्यास तसेच तदनतंर "नगररचना अधिकारी" नेमणुकीस मा.सहसंचालक,नगररचना, पुणे विभाग,पुणे यांची पुर्व मंजुरी घेऊन "नगररचना

,

अधिकारी” यांचे नियुक्तीचे आदेश मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे मार्फत पारित करण्यास तसेच

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मंजुर विकास योजना सूधारित करण्याची सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त, पिपंरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास व त्याअनुषंगीक येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय कमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १५

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.
क्र.आमुका/२/कावि/४२९/२०१९ दि.१९/०८/२०१९
२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.
क्र.आमुका/२/कावि/४३०/२०१९ दि.१९/०८/२०१९

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत राज्यातील महानगरपालिका /नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत दि.११ जूलै २०१९ रोजी शासन निर्णय निर्गत करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्य शासनामार्फत तयार करण्यात आलेले उपविधी आदेशाचे दिनांकापासून राज्यातील सर्व महानगरपालिका /नगरपरिषदा/नगरपंचायतींसाठी लागू झालेले असून त्याकरिता महापालिका सभा ठरावाची अथवा स्वतंत्र मान्यता घेण्याची आवश्यक नसल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार दि.१ जुलै २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेची अंमलबावणी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

,

सदर उपविधीमध्ये अनुसूची – १, भाग अ मध्ये उपयोगकर्ता शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| | | | **महानगरपालिका** |
|---|---|---|---|
| **क्र.** | **वर्गवारी** | **अ व ब वर्ग** | **क व ड वर्ग** |
| | घनकचरा निर्मिती १०० किलोग्राम पेक्षा कमी | **(रक्कम रुपये प्रतिमहा)** | |
| १ | प्रति घर | ६० | ५० |
| | **व्यावसायिक आस्थापना** | | |
| २ | दुकाने, दवाखाने इत्यादी | ९० | ६० |
| ३ | शोरुम<br>(उपकरणे / फर्निचर / ऑटोमोबाईल / इलेक्टॉनिक्स इ.) | १६० | १२० |
| ४ | गोदामे | १६० | १२० |
| ५ | उपहारगृहे व हॉटेल | १६० | १२० |
| ६ | राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | २०० | १६० |
| | **रुग्णालये** | | |
| ७ | पन्नास खाटांपेक्षा कमी | १६० | १२० |
| ८ | पन्नास खाटांपेक्षा जास्त | २४० | १८० |
| | **संस्था** | | |
| ९ | शैक्षणिक संस्था, वसतीगृहे | १२० | ९० |
| १० | धार्मिक संस्था | १२० | ९० |
| ११ | शासकीय / निमशासकीय कार्यालये | १२० | ९० |
| १२ | विवाह कार्यालये / मनोजरंजन सभागृहे / एकपडदा चित्रपटगृहे | २००० | १००० |
| १३ | खरेदी केंद्र / बहुपडदा चित्रपटगृहे | २००० | १००० |
| १४ | फेरीवाले | १८० | १५० |
| १५ | हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा / सत्संग / खाद्य महोत्सव / फटाक्याचे दुकान | स्थानिक स्वराज्य संस्थांनी मासिक शुल्क न आकारता एक वेळ शुल्क निर्धारित करावे | |

तसेच सदर उपविधीमध्ये अनुसूची – १, भाग ब (शास्तीची अनुसूची) मध्ये कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी शास्ती निर्धारित करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

,

| कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी शास्ती (किमान शास्ती रुपयांमध्ये) | | | |
|---|---|---|---|
| | | | **महानगरपालिका** |
| **क्र.** | **तपशिल** | **अ व ब वर्ग** | **क व ड वर्ग** |
| **विलगीकरण, साठवणुक, कचरा सुपुर्द करणे व संकलन याबाबतचे उल्लंघन** | | | |
| १ | विलगीकरण न केलेला व वेगळया डब्यांमध्ये साठवण न केलेला कचरा सोपविल्याबद्दल | | |
| | अ) घरातुन / व्यवसायिक आस्थापना | | |
| | पहिला प्रसंग | ३०० | २०० |
| | नंतरचा प्रत्येक प्रसंगी | ५०० | ३०० |
| | ब) मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक | | |
| | पहिला प्रसंग | ५००० | ३००० |
| | नंतरचा प्रत्येक प्रसंगी | १५००० | ९००० |
| २ | कचरा जाळण्याबद्दल | ५००० | ५००० |
| **विशिष्ठ वर्गवारी परिस्थिती /** | | | |
| ३ | सार्वजनिक सभा समारंभ संपल्यावर चार तासांच्या आत स्वच्छता / न केल्याबद्दल | स्वच्छता अनामत रक्कम जप्त करणे | |

वरील अनुसूची - १, भाग अ, उपयोगकर्ता शुल्क तक्त्याचे अवलोकन करता अ व ब वर्ग महानगरपालिकांसाठी निर्धारित करण्यात आलेल्या शुल्कानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्येदेखील सदर शुल्क लागू करणे तसेच कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी शास्ती म्हणून निर्धारित करण्यात आलेले शुल्क लागू करणे आवश्यक असल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत आदेश क्र. आमुका/२/कावि/४२०/२०१९ दि.१६/०८/२०१९ अन्वये सदर शासन निर्णय लागू करण्याचा आदेश निर्गत करण्यात आलेले आहे.

सदर शुल्क व शास्ती लागू झाल्यानंतर जमा होणारी शुल्काची रक्कम भरणा करण्याकरिता विभागाकडे लेखाशिर्ष उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य मुख्य कार्यालयामध्ये उपयोगकर्ता शुल्क वसुली साठी नविन लेखाशिर्ष तयार करणे आवश्यक आहे.

सबब नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत दि.११ जुलै २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), अन्वये लागू करण्यात आलेले स्वच्छता व आरोग्य उपविधी

,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता लागू करणेकामी तसेच कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी निर्धारित शास्तीच्या रकमेचा भरणा करणेकामी "उपयोगकर्ता शुल्क वसुली व शास्ती " या नावाने नविन लेखाशिर्ष निर्माण करणेकामी तसेच सदर शासन निर्णयाची अंमलबावणीकामी निर्गत करण्यात आलेला आदेशाचे अवलोकन करणे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. टॅक्स पावतीमधुन आरोग्य कर तुम्ही कमी करणार आहेत का. तुम्ही आरोग्य कर टॅक्स पावतीमधुन कमी करणार नाहीत आणि परत हा कर घेणार. हा विषय सभासदाना कितपत माहिती आहे. प्रति घर ६० रु., दुकानदाराकडून ९० रु. आणि शोरुम कडून १६० रु.घेणार आहेत.

**मा.महापौर-** हा शासनाने जीआर पाठविला तो विषय आहे. तुमचा विरोध नोदंवा आपण मंजूर करुन घेवू.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खुलासा करु दयाना. टॅक्स पावतीमधला आरोग्यकर कमी होणार आहे का. डबल डबल कर आम्ही देणार नाहीत. आम्ही नागरीकांना स्पष्ट सांगणार, आरोग्य कर देवू नका. प्रती घरटी ६० रु. आहे. आम्ही लोकांना पत्रक वाटणार की ६० रु. प्रतीघरटी लोकांनी देवू नये.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नायर प्रेमकुमार शंकर उर्फ बाबू –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** विषय क्रमांक १५ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ४५४ विषय क्रमांक – १५

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.
क्र.आमुका/२/कावि/४२९/२०१९ दि.१९/०८/२०१९

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.
क्र.आमुका/२/कावि/४३०/२०१९ दि.१९/०८/२०१९

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

,

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १६

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/मुका/तां-वि/१३५/२०१९ दि.१६/८/२०१९

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/मुका/तां-वि/१३६/२०१९ दि.१६/८/२०१९

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८३/नवि-२०, दि. १२.०१.२०१८ व दि. ०४.०६.२०१८ अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात ईईएसएलच्या माध्यमातून एस्को तत्वावर एलईडी पथदिवे बसविण्यासाठी करारनामा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने ईईएसल सोबत करारनामा करून मनपा रस्त्यावरील सोडियम/एम.एच/टी-5 इ. दिवे बदलून एलईडी बसविणेबाबतचा प्रस्ताव मा. शहर सुधारणा समितीमार्फत मा. महापालिका सभेच्या मंजूरीसाठी पाठविणेत आला होता. सदर प्रस्ताव मा. महापालिका सभा ठराव क्र. ३२७, दि. २०-१२-२०१८ अन्वये दफ्तरी दाखल करणेत आला. सदरबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनास कळविणेत आले होते.

शासन निर्णय क्रमांक पीसीसी-३०१९/प्र.क्र.७५/नवि-२२, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. २-८-२०१९ अन्वये मा. महापालिका सभा ठराव क्र. ३२७, दि.२०-१२-२०१८ निलंबित करण्यात आला आहे. कलम ४५१ नुसार ठराव निलंबित करण्यात आल्यानंतर सदर बाब मा. महापालिका सभेच्या नजरेस आणून त्याबाबत मा. महापालिका सभेने अभिवेदन सादर केल्यास मा. आयुक्त यांचे अभिप्रायासह शासनास सादर करणे आवश्यक आहे. तसेच मा. महापालिका सभेने अभिवेदन सादर केले नसल्यास त्याप्रमाणे शासनास ३० दिवसांत कळविणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त विषयपत्र मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेत आले.

,

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- भारत सरकार विदयुत (POM) व उर्जा दक्षता ब्युरो (BEE) चा राष्ट्रीय उपक्रमांतर्गत उर्जा संवर्धन व वाढ करणे, अंमलबजावणी करणेकरीता ईईएसएल कंपनीच्या माध्यमातून शासनाच्या नगरविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक १२/०१/२०१८ व दिनांक ४/०६/२०१८ अन्वये एस्को तत्वावर स्थानिक स्वराज्य संस्थांनी पथदिव्यांकरीता फक्त एल.ई.डी. पथदिवे बसविणे व त्यासाठी ईईएसएल सोबत करारनामा करणे बंधनकारक केलेले महाराष्ट्र शासनाच्या उर्जा संवर्धन धोरणानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रस्त्यावर पारंपारीत दिवे बदलनेच्या कामास केंद्र शासनाने अधिकृत केलेले मे. ई.ई.एस.एल. या संस्थेमार्फत महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयानुसार मे. ई.ई.एस.एल. समवेत करारनामा करणेस व त्यांचेकडून संयुक्तीक पाहणीनंतर अंतिम अहवालानुसार काम करुन घेणेस व त्यापोटी करारनाम्यानुसार निर्धारीत होणारी रक्कम ऍन्युटी बेसीसवर पुढील सात वर्षाकरीता ईस्क्रो खाते उघडून त्यामधून अदा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ४५५ विषय क्रमांक – १६

दिनांक- ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/मुका/तां-वि/१३५/२०१९ दि.१६/८/२०१९

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/मुका/तां-वि/१३६/२०१९ दि.१६/८/२०१९

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८३/नवि-२०, दि. १२.०१.२०१८ व दि. ०४.०६.२०१८ अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात ईईएसएलच्या माध्यमातून एस्को तत्वावर एलईडी पथदिवे बसविण्यासाठी करारनामा

,

करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने ईईएसल सोबत करारनामा करून मनपा रस्त्यावरील सोडियम/एम.एच/टी-5 इ. दिवे बदलून एलईडी बसविणेबाबतचा प्रस्ताव मा. शहर सुधारणा समितीमार्फत मा. महापालिका सभेच्या मंजूरीसाठी पाठविणेत आला होता. सदर प्रस्ताव मा. महापालिका सभा ठराव क्र. ३२७, दि. २०-१२-२०१८ अन्वये दफ्तरी दाखल करणेत आला. सदरबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनास कळविणेत आले होते.

शासन निर्णय क्रमांक पीसीसी-३०१९/प्र.क्र.७५/नवि-२२, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. २-८-२०१९ अन्वये मा. महापालिका सभा ठराव क्र. ३२७, दि.२०-१२-२०१८ निलंबित करण्यात आला आहे. कलम ४५१ नुसार ठराव निलंबित करण्यात आल्यानंतर सदर बाब मा. महापालिका सभेच्या नजरेस आणून त्याबाबत मा. महापालिका सभेने अभिवेदन सादर केल्यास मा. आयुक्त यांचे अभिप्रायासह शासनास सादर करणे आवश्यक आहे. तसेच मा. महापालिका सभेने अभिवेदन सादर केले नसल्यास त्याप्रमाणे शासनास ३० दिवसांत कळविणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त विषयपत्र मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेत आले.

तसेच भारत सरकार विदयुत (POM) व उर्जा दक्षता ब्युरो (BEE) चा राष्ट्रीय उपक्रमांतर्गत उर्जा संवर्धन व वाढ करणे, अंमलबजावणी करणेकरीता ईईएसएल कंपनीच्या माध्यमातून शासनाच्या नगरविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक १२/०१/२०१८ व दिनांक ४/०६/२०१८ अन्वये एस्को तत्वावर स्थानिक स्वराज्य संस्थांनी पथदिव्यांकरीता फक्त एल.ई.डी. पथदिवे बसविणे व त्यासाठी ईईएसएल सोबत करारनामा करणे बंधनकारक केलेले महाराष्ट्र शासनाच्या उर्जा संवर्धन धोरणानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रस्त्यावर पारंपारीत दिवे बदलनेच्या कामास केंद्र शासनाने अधिकृत केलेले मे. ई.ई.एस.एल. या संस्थेमार्फत महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयानुसार मे. ई.ई.एस.एल. समवेत करारनामा करणेस व त्यांचेकडून संयुक्तीक पाहणीनंतर अंतिम अहवालानुसार काम करुन घेणेस व त्यापोटी करारनाम्यानुसार निर्धारीत होणारी रक्कम ॲन्युटी बेसीसवर पुढील सात वर्षाकरीता ईस्क्रो खाते उघडून त्यामधून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

,

**मा.महापौर -** सर्वांना सार्वजनिक गणेश उत्सवाच्या शुभेच्छा देवून सर्वांच्या पुढील इच्छा, आकांक्षा पुर्ण होओ ही गणरायाच्या चरणी प्रार्थना व्यक्त करुन सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

----

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/२१/२०२०
दिनांक - २४/१/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

,